CMYK




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १ मार्च २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ९४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, १ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राजकारण स्वच्छ करण्याचा, त्याला योग्य दिशेने नेण्याचा मार्ग राजकारणाबाहेर आहे. राजकीय शक्तींचा प्रभाव असतानाही या देशात आपल्या मूल्यांचा अर्थ प्रस्थापित करणे अत्यावश्यक आहे. स्वार्थाचा लवलेशही नसलेली, आध्यात्मिक आधार असलेली देशप्रेमाची शक्ती निर्माण करणे आवश्यक आहे. अशा लोकांची शक्ती जरी राजकारणाबाहेर उभी राहिली, तरी त्याचा योग्य प्रभाव पडू शकेल.

**एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## महत्त्वाचे

### कूनोच्या जंगलात नऊ चित्ते दाखल

**श्योपुर** : भारतातील कूनो नॅशनल पार्कमध्ये शनिवारी सकाळी बोत्स्वाना येथून आणलेल्या नऊ चित्त्यांचे आगमन झाले. १२ तासांच्या १२ तासांच्या हवाई प्रवासानंतर त्यांना थेट कुनोत आणले विलगीकरणासाठी राखीव भागात पाठविण्यात आले. यामुळे भारतातील चित्यांची एकूण संख्या ३९ वरून ४८ वर पोहोचली आहे. नवीन खेपेत सहा मादी आणि तीन नर चित्ते आहेत. कूनोमध्ये नर चित्यांचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रजनन गती तुलनेने कमी होती. मादींच्या संख्येत वाढ झाल्याने येत्या महिन्यांत प्रजननाची गती वाढेल, असे मत तज्ज्ञांचे आहे. चित्यांचे स्वागत करण्यासाठी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव कूनोत पोहोचले. त्यांनी क्रेटचा हँडल फिरवून दोन चित्यांना क्वारंटाइन बाड्यांमध्ये सोडले, तर उर्वरित चित्यांची रवानगी वन विभागाच्या प्रशिक्षित संघाने ठराविक नियमानुसार केली. कूनोमध्ये १२ महिन्यांपेक्षा जास्त वयाच्या चित्यांची संख्या वाढली आहे. याआधी येथे २६ प्रौढ चिते होते. यात १४ नर आणि १२ मादींचा समावेश होता.

# मध्य-पूर्वेत युद्धाचा भडका

## अमेरिका-इस्त्रायलचे इराणवर हवाई हल्ले

## इराणचा अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा मारा

## हल्ल्यात इराणचा लष्करप्रमुख ठार

**◆ तेहरान, २८ फेब्रुवारी**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावाचे रूपांतर अखेर संघर्षात झाले असून शनिवारी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर जोरदार हल्ले चढविले. पहिल्याच धडाक्यात इराणच्या ३० ठिकाणांवर बॉम्ब आणि क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात इराणचे मोठे नुकसान झाले आहे. इराणनेही जोरदार प्रत्युत्तर देताना इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा प्रचंड मारा केला. सोबतच मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या तब्बल आठ देशांमधील लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले करीत दाणादाण उडविली. संघर्षात इराणचे संरक्षणमंत्री अमीर नसीर जादेह आणि लष्करप्रमुख मोहम्मद पकपूर ठार झालेत. इस्रायलने शाळेवर केलेल्या हल्ल्यात ८५ विद्यार्थी ठार झाल्याचा दावा इराणने केला आहे.**

गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि इराणमध्ये सुरू असलेल्या तणावपूर्व परिस्थितीनंतर शनिवारी अखेरीस अमेरिका, इस्रायलने संयुक्तपणे इराणची राजधानी तेहरानसह सहा शहरात ३० ठिकाणांवर हवाई हल्ले चढविले. इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनेई आणि राष्ट्रपतींच्या कार्यालयाजवळ ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करण्यात आले. यात अनेक इमारतींचे नुकसान झाले.

शनिवार उजाडल्यानंतर इस्रायल-अमेरिकेने इराणच्या तेहरानशिवाय कॉम, तबरेज, करमनशहा, कराज, इस्फहान या शहरांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा केला. तेहरानमधील संरक्षण विभागाचे कार्यालय, गुप्तचर विभागाचे मुख्यालय, अणुऊर्जा कार्यालयाच्या इमारतीवर हल्ले करण्यात आले. यात अनेक नागरिक ठार तर शेकडो जखमी झाल्याची माहिती आहे. मात्र, इराणकडून जखमी आणि मृतकांच्या आकडा जाहीर करण्यात आलेला नाही. हल्ल्यात इराणची अनेक लष्करी प्रतिष्ठाने उद्ध्वस्त झाल्याची माहिती आहे. हल्ल्यानंतर तेहरान स्फोटांच्या आवाजाने हादरला तर आकाशात सगळीकडे धुराचे लोट होते. इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी हल्ल्याला दुजोरा दिला आहे तसेच प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून हा हल्ला करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. इराणकडून प्रत्युत्तराच्या शक्यतेने इस्रायलमध्ये शाळा, महाविद्यालये बंद करण्यात आली आहे. तसेच लोकांना सुरक्षितस्थळी आश्रय घेण्याची सूचना देण्यात आली आहे. इराण, इस्रायलने हवाई क्षेत्र बंद केले आहे.

◀(वृत्तसंस्था)











### हुती, हिजबुल्ला इराणच्या मदतीला

इराणच्या समर्थनार्थ येमेनमधून हुती बंडखोरांनी लाल समुद्रातून इस्रायली नौदल आणि लष्करावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. याशिवाय लेबनॉनमधून हिजबुल्लानेही इस्रायली लष्करावर हल्ले सुरू केले आहे.

### हल्ल्यात ८५ विद्यार्थी ठार

इराणमधील मिनाब शहरातील मुलींच्या प्राथमिक शाळेवर इस्रायलने केलेल्या कथित हल्ल्यात शिक्षक, विद्यार्थिनींसह ८५ जणांचा मृत्यू झाला तर ६० जखमी आहे. हल्ल्याच्या वेळी शाळेत १७० विद्यार्थी होते.

### अमेरिकन लष्करी तळ लक्ष्य

आमच्यावर हल्ला झाल्यास मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करण्याचा दिलेला इशारा इराणने खरा करून दाखविला. अमेरिकेच्या धमक्यांना न घाबरता इराणने इराक, जॉर्डन, सौदी अरेबिया, कतार, कुवैत, संयुक्त अरब अमिरात, बहरीन या देशांमधील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे डागली.


### ३० ठिकाणी अचूक हल्ले

अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या विविध शहरांवर ३० ठिकाणी अचूक हल्ले केले. इराणने प्रत्युत्तर दिल्यास त्यांना विध्वंसाला सामोरे जावा लागेल. इराणी सरकारकडून अमेरिकन नागरिकांचे संरक्षण करणे हा आमचा हेतू आहे. या हल्ल्यात आमच्याही नागरिकांचे जीव जाऊ शकतात, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.



क्षेपणास्त्र हल्ल्यात जमीनदोस्त झालेले खामेनेई यांचे निवासस्थान

## शरण या, अन्यथा मृत्यूला सामोरे जा



**वॉशिंग्टन** : इराण आपला अणुकार्यक्रम पुन्हा उभारण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळेच अमेरिका आणि इस्रायलला संयुक्त लष्करी कारवाई करावी लागली. इराणचे सत्ताधारी आणि लष्कराने शस्त्र खाली ठेवावी अन्यथा त्यांचा मृत्यू अटळ आहे, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये संयुक्त हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, इराणला अणुकार्यक्रमापासून दूर ठेवण्यासाठी कारवाई आवश्यक होती. इराण कधीही अण्वस्त्र बाळगू शकत नाही आणि गरज पडल्यास अमेरिका त्यांच्या अणुसुविधांचा पूर्णपणे नाश करेल. इराणच्या सुरक्षा दलाने शस्त्रे खाली ठेवावी आणि शरणागती पत्करावी अन्यथा तुम्हाला निश्चित मृत्यूला सामोरे जावे लागेल. शरणागती स्वीकारल्यास तुमच्याशी सहानुभूती बाळगली जाईल. हे हल्ले इराणच्या अणुकार्यक्रमाचा पूर्णपणे नायनाट करण्याच्या उद्देशाने करण्यात आले. मध्य पूर्वेत संघर्षाची परिस्थिती इराणविरुद्ध सुरू असलेल्या इस्त्रायली हल्ल्यांमध्ये अमेरिका देखील सहभागी असल्यामुळे मध्य पूर्वेत संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.

## ८९ अफगाण चौक्या उद्ध्वस्त; २९७ तालिबानी दहशतवादी ठार

**इस्लामाबाद, २८ फेब्रुवारी**

अफगाणिस्तानात आमचे हल्ले सुरूच असून आतापर्यंत ८९ चौक्या उद्ध्वस्त करण्यात आल्या तर २९७ तालिबानी दहशतवादी ठार झाल्याची माहिती पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी दिली.

कारवाईत अफगाण तालिबान आणि त्यांच्या सहयोगी दहशतवादी गटांना लक्ष्य करीत हल्ले चढविण्यात आले. सुरक्षा दलांनी २९७ दहशतवादी ठार केले आणि ४५० हून अधिक अफगाण सैनिक जखमी आहेत. ऑपरेशन गझ्ब- लिल-हक अंतर्गत सीमेवर आमचे हल्ले सुरूच आहेत. तालिबानी लष्कराशी संबंधित १८ जणांना ताब्यात घेतले. सुमारे १३५ टँक आणि चिलखती वाहने उद्ध्वस्त करण्यात आली. अफगाणिस्तानने एकाच वेळी सीमेवरील ५३ ठिकाणी हल्ला केल्यानंतर पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून ऑपरेशन गझ्ब-लिल-हक मोहीम सुरू केली.

तालिबान सरकारने तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान, बलुच लिबरेशन आर्मी, दाएश, अल-कायदा आणि पाकिस्तान यापैकी एक निवडावे. पाकिस्तानविरोधात दहशतवाद्यांना पाठिंबा दिल्यास त्यांना किंमत चुकवावी लागेल, असे चौधरी यांनी सांगितले.





## युध्द भारताला पडणार महाग

**नवी दिल्ली, २८ फेब्रुवारी**

इराण आणि अमेरिकाइस्रायलमध्ये भडकलेल्या युद्धामुळे तेल, शेअर बाजार, सोने-चांदीवर परिणाम होणार आहे. मध्य-पूर्वेतील हे युद्ध भारताला महागात पडणार असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. या युद्धामुळे भारतासाह जगभरातील गुंतवणूकदार घाबरलेले आहेत. या हल्ल्यांमुळे कच्च्या तेलाच्या किमती निश्चितपणे उसळणार असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. यामुळे महागाई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भारतासह कित्येक देश होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून कच्च्या तेलाची आयात करतात. या युद्धामुळे हा परिसर बंद होण्याची शक्यता आहे. यामुळे निश्चितपणे कच्च्या तेलाचे दर उसळतील. शुक्रवारी कच्च्या तेलाचे दर २.७ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ६७.०२ डॉलर्सवर बंद झाले. सोमवारी कमोडिटी बाजार उघडेल, त्यावेळी युद्धाचा परिणाम त्यावर दिसून येईल. शेअर बाजारात मोठ्या घसरणीची शक्यता हे युद्ध अत्यंत भीषण झाल्याने सोमवारी भारतासह जगभरातील शेअर बाजारांत मोठ्या प्रमाणात घसरण होईल, अशी शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली. ही घसरण किती असेल, गुंतवणूकदारांच्या भावना काय असतील आणि विक्रीचा दबाव कितपत राहील, यावर ही घसरण अवलंबून राहील.

**सोने-चांदीवर होणार परिणाम**

जगात प्रत्यक्ष युद्ध किंवा युद्धाची स्थिती उद्‌भवते, त्यावेळी सुरक्षित संपत्ती म्हणून पाहिले जाणारे सोने-चांदीचे दर उसळतात.मध्यपूर्वेत युद्ध पेटल्यामुळे पुन्हा एकदा सोनेचांदीत तेजी येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कमोडिटी बाजारात सध्या १० ग्रॅम सोन्याचे मूल्य १,६१,९७१ रुपये आहे आणि चांदीचे मूल्य २,७४,३८९ रुपये प्रति किलो आहे.

## वर्षभरात २३७६ बांगलादेशी हद्दपार

**मुंबई** : राज्यातील बांगलादेशी घुसखोरीच्या वाढत्या प्रश्नावर सरकारने कडक कारवाईचा निर्णय घेतला आहे. मुंबईसह संपूर्ण राज्यात संशयित बांगलादेशी घुसखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष 'कोम्बिंग ऑपरेशन' राबविण्यात येणार असल्याची घोषणा गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत केली. वर्षभरात २३७६ बांगलादेशी घुसखोरांना हद्दपार करण्यात आले. मुंबईतील झोपडपट्‌ट्या, दाट वस्त्या, संवेदनशील भाग, गृहप्रकल्प परिसरात मोहीम राबविण्यात येणार आहे.

## प्राथमिक अहवाल : अजित पवारांचे विमान कोसळण्यापूर्वी झाडाला धडकले

**नवी दिल्ली, २८ फेब्रुवारी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला महिना पूर्ण होत असतानाच, हवाई उड्डाण मंत्रालयाच्या 'एएआयबी' तपास यंत्रणेने या घटनेचा २२ पानांचा प्राथमिक तपास अहवाल प्रसिद्ध केला आहे. विमान जमिनीवर कोसळण्यापूर्वी ते एका झाडाला धडकले होते, अशी माहिती या अहवालातून समोर आली आहे. या प्राथमिक अहवालात अपघाताचे नेमके कारण स्पष्ट नसले तरी, अपघाताला कारणीभूत ठरू शकणाऱ्या अनेक गंभीर त्रुटींवर बोट ठेवण्यात आले आहे.



गत २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. या दुर्घटनेत एकूण पाच जणांचा मृत्यू झाला होता. जवळपास एक महिन्यानंतर डीजीसीएकडून या अपघाताचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. अहवालानुसार, मुंबईहून बारामतीकडे येणाऱ्या या व्हीआयपी फ्लाईटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला होता. मात्र, पहिल्या प्रयत्नात वैमानिकाला लँडिंग करता आले नाही, त्यामुळे त्यांनी 'गो-अराउंड' केला. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने असा संदेश दिला. परंतु, एअर ट्रॅफिक कंट्रोलने त्यावेळी ३ किलोमीटर इतकी दृश्यमानता नोंदवली होती, जी 'व्हीएफआर' (व्हिज्युअल फ्लाईट रूल्स) नियमांनुसार आवश्यक असलेल्या ५ किलो मीटरपेक्षा खूपच कमी होती. लँडिंग क्लिअरन्स मिळाल्यानंतर काही क्षणांतच विमान रनवेच्या डावीकडे ५० मीटर अंतरावर असलेल्या झाडांवर आदळले आणि त्यानंतर लागलेल्या भीषण आगीत विमान जळून खाक झाले.

**अहवालातील धक्कादायक निष्कर्ष:**

प्राथमिक अहवालातून बारामती विमानतळाच्या सुरक्षा व्यवस्थेवर अनेक गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. सुरक्षा त्रुटी: बारामती हे 'अनकंट्रोल्ड एअरफिल्ड' असून तिथे नियमित एटीसी सुविधा नाही. रनवेवर बारीक खडी आढळली असून, रनवेला परिपूर्ण कुंपण नाही.

**हवामानाचा अंदाज**

बारामतीमध्ये अधिकृत 'मेट' सुविधा उपलब्ध नाही. उपग्रह चित्रांनुसार परिसरात हलके धुके होते, तरीही लँडिंगचा प्रयत्न झाला. नेव्हिगेशन अभाव: विमानतळावरील रनवे मार्किंग स्पष्ट नसल्यामुळे वैमानिकांना लँडिंगमध्ये अडचणी आल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे.

**अमेरिकन कंपनीची मदत घेणार**

विमानाचा ब्लॅक बॉक्स आणि कॉकपीट मधील संभाषण तपासण्यासाठी आता ज्या अमेरिकन कंपनीने ही यंत्रणा बनवली आहे, त्यांची मदत घेतली जाणार आहे. या यंत्रणेतील 'रॉ डेटा' सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी अमेरिकेतून तज्ज्ञांची एक विशेष टीम भारतात येणार आहे. त्यानंतरच वैमानिक आणि एअर ट्रॅफिक कंट्रोल मधील शेवटच्या क्षणांचे संभाषण समोर येऊ शकेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# हे आव्हान सोपे नाही...!



राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजात दुसऱ्या दिवशी, २४ फेब्रुवारीला प्रश्नोत्तरांच्या तासातील चर्चेत उघड झालेल्या एका समस्येने पुन्हा एका आव्हानाचे गांभीर्य स्पष्ट केले आहे. एकट्या मुंबई शहरात जानेवारी ते ११ फेब्रुवारी या जेमतेम दीड महिन्याच्या काळात सुमारे आठ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. गेल्या वर्षभरात अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी ११४१ गुन्हे दाखल करण्यात आले, १४५४ व्यक्तींना अटक करण्यात आली आणि सुमारे साडेआठशे कोटी रुपये किमतीचा अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. एमडी (मेफॅड्रॉन) नावाच्या अमली पदार्थाचा ३१३ किलो वजनाचा साठा जप्त करून ३९४ व्यक्तींना अटक करण्यात आली. मस्जिद बंदर परिसरात सुमारे ३२५ ग्रॅम वजनाची गर्द पावडर जप्त करण्यात आली. अमली पदार्थांच्या अवैध धंद्याचे हे जाळे एकट्या मुंबईत नव्हे तर नाशिक, त्र्यंबकेवर, जव्हार, रायगड, नवी मुंबई अशा अनेक ठिकाणी पसरलेले आहे. गेल्या वर्षभरात पाच हजारांहून अधिक व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. १३०० कोटींहून अधिक किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आणि अमली पदार्थविरोधी मोहिमा अधिक तीव्र करण्यात आल्या. एका वर्षभरातील या कारवाया आणि हस्तगत करण्यात आलेला साठा पाहता, अमली पदार्थांच्या विरोधातील लढाई आणि या धंद्याला वेसण घालण्याचे आव्हान यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचल्याचे स्पष्ट होतेच; पण हे आव्हान सोपे नाही, याचीही जाणीव अधोरेखित होते.

अमली पदार्थांच्या नशेचा तरुण पिढीवरील विळखा हा आजची समस्या नाही. देशातील हजारो कुटुंबांतील नवी पिढी या व्यसनांच्या आहारी जाऊन अंधाराच्या गर्तेत चाचपडू लागली आहे. धनिकांच्या जगात अशा व्यसनांना प्रतिष्ठेने मिरविले जात असल्याने उच्चभ्रूंच्या पार्ट्यांमधील अमली पदार्थांचे सेवन हा अधूनमधून चर्चेचा विषय होत असला, तरी सामान्य कुटुंबातील तरुणाईला पडणारा विळखा हा केवळ चर्चेचा नव्हे, तर गंभीर चिंतेचा विषय असतो. गेल्या काही वर्षांत या नशेच्या आहारी जाणाऱ्यांची संख्या वाढतच चालली असल्याचे, जागोजागी उभ्या असलेल्या नशामुक्ती केंद्रांतील गर्दीवरून स्पष्ट दिसते. या समस्येला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी, 'नशामुक्त भारत' नावाची एक मोहीम सुरू केली, तेव्हा या व्यसनांच्या विळख्याने देशाचा केवढा मोठा भाग व्यापला आहे, तेदेखील उघड झाले. देशातील तब्बल पावणेतीनशे जिल्ह्यांत अमली पदार्थांचा व्यापार होत असून त्याच्या आहारी जाणाऱ्या तरुणाईची संख्या वाढत असल्याचे केंद्र सरकारच्या एका पाहणीत स्पष्ट झाले होते. नशेच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना त्यातून सोडविण्यासाठी आठ हजार स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. या कार्यकर्त्यांनी या जिल्ह्यांतील तब्बल ८० लाख स्त्री-पुरुष आणि तरुणांवरील या समस्येचे गारुड उतरविण्यासाठी धडपड केली होती. नशेच्या विळख्यातून सोडविण्यासाठी या जिल्ह्यांत जवळपास ४०० नशामुक्ती केंद्रांतून उपचार आणि मानसोपचारांची सोय करण्यात आली. देशभरातील १८ ते ७५ वयोगटांतील १७ टक्के जनता दारूचे सेवन करते, जवळपास तीन टक्के लोक भांगेच्या नशेत बुडवून घेतात, दोन कोटी लोकांना अफूची चटक लागलेली आहे तर एक कोटींहून अधिक व्यक्ती नशा करण्यासाठी औषधांचाही वापर करतात, असे उघडकीस आले आहे. जवळपास ५० लाख व्यक्ती नशिले पदार्थ हुंगून आपली व्यसने भागवितात तर जवळपास १० लाखांना कोकेनचा विळखा पडला आहे. याच पाहणीचा आणखी एक निष्कर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने चिंताजनक आहे. या कोकेन नशाबाजांपैकी जवळपास निम्मे नशेबाज एकट्या महाराष्ट्रात आहेत, असे केंद्र सरकारच्या एका अधिकृत आकडेवारीवरून दिसते. उत्तेजक औषधांचे सेवन करणाऱ्या सुमारे १५ लाखांपैकी सुमारे साडेचार लाख लोक महाराष्ट्रात आहेत. अर्थात ही अधिकृत आकडेवारी असली, तरी अनधिकृतांचा आणि छुप्या नशेबाजांचा आकडा याहून कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे.

वरकरणी सहज वाटणाऱ्या एखाद्या गोष्टीकडे अधिक गांभीर्याने पाहिले तर त्यामागचे अनेक कंगोरे एकामागून एक उलगडत जातात आणि ती सहज गोष्टदेखील जटिल असल्याचे लक्षात येते. सुमारे तीन दशकांपूर्वीच्या एका नोंदीमुळे अशाच एका वरकरणी सहज वाटणाऱ्या गोष्टीमागील गांभीर्य स्पष्ट झाले होते. समाजाची स्मृती अल्प असते या समजुतीनुसार आता त्याचा विसर सर्वांस पडला असेल. पण नुकत्याच उजेडात येऊ लागलेल्या काही घडामोडींमुळे त्या गोष्टीच्या आठवणीस उजाळा देणे आवश्यक आहे. बाबरीची वादग्रस्त वास्तू उद्ध्वस्त झाल्यानंतर मुंबईत उफाळलेल्या भीषण दंगली, हिंसाचार, दहशतवादी कारवाया, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार अशा असंख्य समस्यांमुळे पिचून गेलेल्या जनतेला पर्याय मिळाला आणि काँग्रेसी वर्चस्वाखालील प्रस्थापित सत्ता उलथवून टाकून महाराष्ट्रातील जनतेने शिवसेना-भाजपा युतीला सत्तास्थापनेचा कौल दिला, तेव्हाची ही गोष्ट आहे. युतीच्या त्या सरकारचे पहिले बिगरकाँग्रेसी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राच्या प्रस्थापित जातवर्चस्वाच्या राजकारणास बगल देऊन सत्तेच्या सर्वोच्च पदावर आरूढ झालेले मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या पदग्रहणानंतरच्या पहिल्याच वर्षातील अर्थसंकल्पीय अधिवेशनातील काही प्रकाशनांपैकी एका प्रकाशनाने ही गोष्ट अधोरेखित केली होती. कारण ज्या समजुतीपायी आपण दानधर्माच्या संस्कृतीचा भाग म्हणून भिकाऱ्यांच्या झोळीत पैसे टाकतो, त्या पैशाचे पुढे काय होत असावे, याचा विचार करावयास लावणारे काही सूक्ष्म संकेतच त्यातून दिले गेले होते. मुंबईच्या लोकल ट्रेनमध्ये दररोज शेकडो भिकारी त्यांच्या कमावलेल्या व्यावसायिक केविलवाण्या चेहऱ्याने प्रवाशांसमोर हात पसरतात. गरिबास दान केल्याने पुण्य पदरी पडते, या समजुतीतून हजारो प्रवासी आपल्या कमाईचा काही वाटा त्या झोळीत टाकून पुण्य कमावल्याच्या भावनेने समाधान पावतात. युती सरकारच्या त्या पहिल्या अर्थसंकल्पीय कागदपत्रांतून मात्र, या पुण्याच्या समजुतीमागील प्रथेवरच प्रश्नचिन्ह उभे केले गेले होते. भिकाऱ्यांच्या झोळीत पैसे टाकण्याऐवजी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ते पैसे पाठवा आणि समाजातील गरजूंना त्याचा लाभ व्हावा यासाठी हातभार लावा, अशा आशयाचे थेट विधान त्या प्रकाशनात करण्यात आल्याने तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या, टीकेचे सूरही उमटू लागले आणि प्रश्नचिन्हेही उभी राहिली. ही चर्चा तेव्हा फार काळ चालली नाही, पण त्या विधानाच्या समर्थनार्थ दिले गेलेले स्पष्टीकरण मात्र बोलके होते. भीक मागणे हा एक संघटित व्यवसाय असून गुन्हेगारी विश्व किंवा अमली पदार्थांच्या व्यापाराशी या व्यवसायाचे नाते असल्याचा संशय व्यक्त होत असल्याने, पुण्य मिळविण्याच्या भावनेतून दान केलेला पैसा दिवसाअखेरीस कोणत्या तरी अड्ड्यावरील अमली पदार्थाच्या खरेदीत खर्च होत असल्याने, असा पैसा खऱ्या अर्थाने सत्कार्याकडे वळविण्याच्या हेतूने हे आवाहन केले गेल्याचा खुलासाही तेव्हा करण्यात आला होता. मनोहर जोशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील या मुद्याने अनेकांना भीक मागण्याच्या व्यवसायाकडे पाहण्याची नवी नजर मिळाली, हे नाकारता येणार नाही. अशा दानधर्माच्या पैशापैकी किती पैसा त्यांच्या आवाहनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे वळला हे पुढे स्पष्ट झाले नसले, तरी भीक मागून मिळालेला पैसा हा अमली पदार्थांच्या धंद्याचा मोठा आधार ठरत असल्याची बाब मात्र गुपित राहिली नाही. म्हणूनच अमली पदार्थांच्या धंद्याला बळ देणाऱ्या साऱ्या वाटा बुजविण्याच्या मोहिमेचा एक प्रयत्न म्हणून त्या नोंदीकडे पाहणे आवश्यक ठरते.

आज पुन्हा ही नोंद समोर येण्याचे कारण स्पष्ट आहे. महाराष्ट्रात अमली पदार्थांच्या अवैध धंद्याविरोधातील कारवाया तीव्र होऊ लागल्या आहेत. सध्याच्या कारवायांमधून हस्तगत होत असलेले हे अमली पदार्थांचे शेकडो कोटी रुपये किमतीचे साठे भीक मागणाऱ्या व्यसनाधीन व्यक्तींच्या आर्थिक आवाक्याबाहेरील आहेत आणि आता या धंद्याने धनदांडग्या वर्गाभोवतीही आपला विळखा घट्ट करण्यास सुरुवात केल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. अमली पदार्थांचा व्यापार किंवा धंदा ही केवळ एखाद्या विशिष्ट क्षेत्रापुरती समस्या राहिलेली नाही, तर या व्यवसायाने आंतरराज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले हातपाय पसरले आहेत. त्याला पुष्टी देणारे असंख्य धागेदोरे आता तीव्र करण्यात आलेल्या कारवायांतून समोर येऊ लागले आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वीच्या एका पाहणीनुसार, मुंबईत वेगवेगळ्या मार्गाने भीक मागणाऱ्यांची लोकसंख्या गेल्या दशकभरात एक लाखांनी वाढली होती. एकट्या मुंबईत जवळपास तीन लाख व्यक्ती भीक मागण्याचा व्यवसाय करतात, असे निष्पन्न झाले होते. यापैकी अनेक भिकारी केवळ दारिद्र्यामुळे भीक मागण्याचा मार्ग पत्करत असले, तरी अनेक भिकारी व्यसनांची गरज भागविण्याकरिता लोकांसमोर हात पसरतात, हेही स्पष्ट झाले होते. वेगवेगळ्या मार्गाने भिकेच्या माध्यमातून होणारी प्रत्येक भिकाऱ्याची किमान कमाई दिवसाकाठी ५० रुपयांहून अधिक असल्याचे गृहीत धरले, तरी तीन लाख भिकाऱ्यांच्या झोळीत मुंबईकरांकडून दिवसाकाठी किती रक्कम पडत असेल आणि त्यापैकी किती रक्कम व्यसनांवर खर्च होत असेल, याचा साधारण अंदाज बांधणे फारसे अवघड नाही. मनोहर जोशी यांच्या आवाहनाचा तोच रोख होता. अमली पदार्थांचे अवैध धंदे पोसण्यास ज्या काही बाबींचा हातभार लागतो, त्यामध्ये आता अधिक भर पडली आहे. उच्चभ्रूंच्या पार्ट्यांतही अमली पदार्थांचा शिरकाव झाल्याच्या कहाण्या आता समाजाच्या सवयीच्या झाल्या आहेत आणि या समस्येपायी अनेक कुटुंबे आपल्या घरातील कोणा तरुणाच्या भविष्याच्या काळजीने काळवंडली आहेत.

या समस्येविरुद्ध केंद्र सरकारने कंबर कसली आणि अमली पदार्थांच्या धंद्याचे कंबरडे मोडण्याच्या मोहिमा तीव्र झाल्या. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरात अमली पदार्थांच्या अवैध धंद्याने आपली पाळेमुळे रुजविली असल्याचे ललित पाटील प्रकरणावरून उघड झाले होतेच; पण अजूनही ती पुरती उखडली गेलेली नाहीत, हेही आता नव्या कारवायांतून समोर येऊ लागले आहे. मेफेड्रोन हा जगातील सर्वात महागडा मानला जाणारा अमली पदार्थ महाराष्ट्रात 'म्याऊ म्याऊ' म्हणून नशेखोरांच्या दुनियेत ओळखला जातो. हा पदार्थ खाद्यपदार्थांच्या वेष्टनातून विदेशात पाठविण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आणि त्यांनी जाळे पसरल्यावर हाती आलेले धागेदोरे दिल्लीपर्यंत पोहोचले.

याच धागेदोऱ्यांच्या आधाराने दिल्ली गाठून केलेल्या कारवाईतही मेफेड्रोनचा मोठा साठ जप्त करण्यात आला. त्या एकाच कारवाईत मेफेड्रोनचा सुमारे १७०० किलो साठा जप्त करण्यात आला होता. यापैकी सुमारे ६०० किलो मेफेड्रोनचे उत्पादन पुणे-सोलापूर मार्गावरील एका औद्योगिक वसाहतीतील कारखान्यात होत असल्याचेही पोलिसांनी उघड केले. या साठ्याची किंमत साडेतीन हजार कोटींच्या घरात असावी, असा अंदाज असल्याने या व्यवसायातील उलाढालीने अर्थव्यवहार कसा पोखरला आहे, याचा अंदाज करता येणेही अवघड नाही. मांजराचा विशिष्ट आवाज काढून सांकेतिकरीत्या या पदार्थाची विक्री करणाऱ्या टोळ्या ग्राहकास आकृष्ट करीत असल्याने त्यास 'म्याऊ म्याऊ' असे म्हटले जात असावे. अलिकडच्या कारवायांतून उघड झालेल्या या नव्या गुपितामुळे समाजासही सावध राहणे आता शक्य होणार आहे.

अमली पदार्थमुक्त भारत ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असून याबाबत केंद्र सरकारने शून्य सहनशीलता धोरण स्वीकारले आहे. तीन वर्षांपूर्वी गृहमंत्र्यांच्या उपस्थितीत सुमारे ९३०० किलो वजनाचे १२३५ कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट करण्यात आले. त्याआधी देशात वेगवेगळ्या कारवायांत ७५ हजार किलो अमली पदार्थ नष्ट करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. ते उद्दिष्ट तर पार झालेच; पण त्याहून कितीतरी पुढचा टप्पा गाठून ५ लाख ९५ हजार किलो अमली पदार्थांचा साठा नष्ट करण्यात आला. त्याची किंमत सुमारे साडेआठ हजार कोटींच्या घरात होती. अस्थिर जगण्याला सुरक्षिततेची ग्वाही देणारे काही आसपास घडले की, साहजिकच समाजाला मोठा मानसिक आधार मिळतो आणि मानसिकदृष्ट्या स्वस्थ असलेल्या समाजात शांतता प्रस्थापित होते. अस्वस्थ, संतप्त किंवा असुरक्षित समाजामुळे सार्वजनिक स्वास्थ्य संपते आणि अस्थिरता निर्माण होते. या अस्थितरतेची मुळे अशाच अवैध धंद्यांच्या खतपाण्यावर पोसली जात असतात.

अमली पदार्थांपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा हा लढा सोपा नाही. ही समस्या देशाच्या भौगोलिक सीमांपुरती मर्यादितही नाही. या समस्येने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडल्या असून भारताच्या नव्या पिढ्यांना बरबाद करण्याचे आणि भारतातील पैसा परदेशांत पळविण्याचे एक आंतरराष्ट्रीय षडयंत्र अधोरेखित झाले आहे. याआधीही गुजरातच्या बंदरांवरून महसूल गुप्तचर खात्याने केलेल्या आठ कारवायांमध्ये हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. नौदलाच्या एका कारवाईत कोची बंदराजवळ तीन हजार कोटींचा साठा हस्तगत करण्यात आला. कोरोना काळात अमली पदार्थांचे सेवन आणि अवैध व्यापारात तिप्पट वाढ झाल्याची नोंद आहे. गेल्या दशकभरात अमली पदार्थांचा व्यापार, मानवी तस्करीसारख्या समस्यांनी अनेक कुटुंबांच्या स्वातंत्र्याच्या आनंदावर काजळी धरली आहे. कित्येक कुटुंबे अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहेत आणि कित्येकांचे भविष्य टांगणीला लागले आहे. महाराष्ट्रात या अवैध धंद्याचे कंबरडे मोडले जात आहे, ही आश्वासक बाब विधिमंडळातील ताज्या माहितीवरून स्पष्ट झाली आहे.

dineshgune@gmail.com


## रविवारची पत्रे

### कुटुंब प्रबोधन, जनजागरणाचा विषय

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पंच परिवर्तनच्या विषयांवर जनजागरण करण्याचे आवाहन केले आहे. त्यातील एक विषय आहे कुटुंब प्रबोधन. विद्यमान पारिवारिक, सामाजिक परिस्थिती लक्षात घेता कुटुंब प्रबोधन करणे गरजेचे आहे. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी समस्या चार भिंतीच्या आत सोडवल्या जात. त्यात घरातील ज्येष्ठांची भूमिका महत्त्वाची होती. ते समस्यांवर तोडगा काढत असत. त्यांनी घेतलेल्या निर्णयावर वादविवाद होत नसत. त्यामुळे घरातील वातावरण सुदृढ, आनंदी राहत असे. ज्येष्ठांचा मान राखला जात असे. त्यांच्या शब्दाला, कृतीला वजन होते. जसजसा काळ बदलत गेला परिस्थितीत बदल होत गेला. परिवारची परिभाषा बदलली. असे बरेच परिवार आहेत जिथे ज्येष्ठांना आपले स्थान शोधावे लागत आहे. 'हम दो हमारा एक या दो' इतकाच सीमित परिवार आता राहिला आहे. त्यामुळे अनेक समस्यांनी जन्म घेतला आहे. मी अशा परिवाराच्या संपर्कात असतो जिथे ती माउली आपल्या ९७ वर्षांच्या सासूला आधार देत काळजीने, गोडीगुलाबीने आपली जबाबदारी सांभाळत आहे. एक मुलगा अमेरिकेला तर दुसरा बंगळुरूला आहे, पण आपल्या आजीचे आणि आईचे संगोपन करण्यात कसूर करीत नाही. आवश्यक सर्व वस्तू ऑनलाईन पाठविण्याची व्यवस्था ही मुलं करीत असतात. सकाळ-संध्याकाळ संपर्कात असतात. त्यामुळे त्या माउलीला एकटेपणाची जाणीव होत नाही. याला आपण आदर्श कुटुंब म्हणू शकतो. दुसरीकडे असाही परिवार बघितला जिथे जन्म देणारे आई-वडील नकोसे वाटतात. दुर्दैवाने अशा परिवारांची संख्या अधिक आहे. पंच परिवर्तनमध्ये कुटुंब संस्कृतीला प्राधान्य देण्याचे हे एक कारण असू शकतं. काळ बदलला की व्यवस्था परिवर्तन होणारच असे बोलले जाते. परिवर्तन म्हणजे कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त करणे नव्हे. नाती जोपासल्या गेली पाहिजे; मग ती रक्ताची असो अथवा नसो. युवा पिढीमध्ये सहनशीलतेचा अभाव आहे. सामाजिक समस्या निर्माण होण्याचे ते एक कारण असावे. विवाह व्यवस्था मोडकळीस येत चालली आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. समजूतदारपणाचा अभाव आहे. जुळवून घेणे यावर विश्वास राहिला नाही. कुटुंब प्रबोधनच्या माध्यमातून या परिस्थितीत बदल होऊ शकतो; नव्हे अपेक्षित बदल व्हायला पाहिजे. यातच कुटुंबाचे हित सामावले आहे.

**वसंत पिंपळापुरे** /९४२२८०७०१३

### जीवघेणे रस्ते अपघात : गंभीर समस्या



जवळपास रोज वर्तमानपत्रात 'हिट अँड रन' तसेच इतर प्रकारचे गंभीर रस्ते अपघात घडल्याचे वाचण्यात येते. नुकताच असा एक अपघात प्रतापनगर रोडदरम्यान राधे मंगलम कार्यालय ते स्वरूप नगर/स्वावलंबी नगरच्या रस्त्यावर झाला. एका होतकरू महिलेला कारने धडक देऊन ठार केले. कार चालक व त्याचा साथी पकडला गेला. चालक नशेत होता असे बोलले जाते. तसेच त्याने या महिलेला धडक देण्याआधी अजून दोन जणांना ठोस मारली होती. त्यामुळे घाबरून त्याने बेभान होऊन गाडी दामटली.

सिमेंट रोड जसे रुंद होत आहेत तसेच वाहन चालकांचा वेग अनियंत्रित होत आहे. पालकांच्या दुर्लक्षपणामुळे अल्पवयीन मुळे बेभान होऊन गाड्या हाकत आहेत. आज शहराची स्थिती अशी आहे की, रस्ते रुंद होत आहेत व फूटपाथ गायब होत आहेत. जिथे व्यवस्थित फूटपाथ आहेत ते अधिकतर दुकानदारांनी गिळंकृत केले आहे; ज्याला राजाश्रय असल्यामुळे कोणी काही करू शकत नाही. पादचाऱ्यांना नाईलाजाने रस्त्यावरूनच चालावे लागते. याचे ज्वलंत उदाहरण सावरकर नगर चौक ते खामला, प्रतापनगर, देवनगर येथे बघता येईल. हे सर्व फूटपाथ मोकळे करून त्याला समोर कठडे करून पादचाऱ्यांना दिलासा देणे आवश्यक झाले आहे. लहान गल्ल्यांमधील रस्ते सिमेंटचे केले; पण ते मुख्य रस्त्याला जोडताना कुठेही गतिरोधक नाही. सदरहू अपघाताबद्दल लिहायचे म्हणजे हा रस्ता बराच रुंद झाला असून पायी चालण्याच्या दृष्टीने भीतिदायक आहे. तिथे फूटपाथ नाही. रस्त्याला लागून मोठमोठ्या फ्लॅट स्कीम व उच्चभ्रूंचे बंगले आहेत. शासनाच्या गलथान कारभाराचा फटका सामान्य नागरिकांना बसतो आहे. वास्तविकता ही आहे की, जीवघेणे अपघात दिवसेंदिवस वाढत आहेत. हा विषय गंभीरपणे विचारात घेऊन शासनाने प्रभावी पावले उचलावी हीच अपेक्षा? नुसते सिग्नल लावून समस्या सुटणार नाही, सिग्नल तोडणारे व वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक शिक्षा होणार नाही तोपर्यंत हे निरर्थक आहे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### व्यावहारिक प्रगल्भता हवी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी भाषेबद्दल एक फेसबुक पोस्ट शेअर केली होती. एका जपानी तरुणीचा संदर्भ देत त्यांनी परदेशी पाहुण्यांना मराठीबद्दल असणाऱ्या कुतूहलाचं कौतुक करत स्वकीयांच्या मराठी भाषेविषयी असणाऱ्या अनास्थेबाबत खंत व्यक्त केली होती. यावरून एक मराठीतील अत्यंत मार्मिक म्हण आठवली 'अर्थावाचून पाठांतर, काय कामाचे?' जोपर्यंत आपल्याला एखाद्या शब्दातील मूळ भाव किंवा विचार समजत नाही, तोपर्यंत केवळ पोपटपंची करण्याला काहीच अर्थ नसतो. संत तुकाराम महाराजांनीही याच भूमिकेतून सांगितले आहे की, अर्थ माहीत नसताना केलेली घोकंपट्टी म्हणजे वेळ वाया घालवणे आहे.

राष्टीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्त विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमाचा मुख्य उद्देश संघाची ध्येयधोरणे आणि उद्दिष्टे स्पष्ट करणे, शंका-कुशंका दूर करणे हा होता. अशा मोठ्या राष्ट्रीय व्यासपीठावर, जिथे देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले श्रोते असतात, तिथे संवादाची भाषा 'सर्वसमावेशक' असणे ही व्यावहारिक गरज असते. केवळ दोन-चार शब्द मराठीत बोलल्याने संघाचे शंभर वर्षांचे कार्य किंवा त्यांचे उदात्त विचार सर्वांपर्यंत पोहोचले असते असे नाही. त्यामुळे एका परदेशी तरुणीचे कौतुक आणि एका राष्ट्रीय संघटनेची प्रामुख्याच्या संवाद शैलीची तुलना करणे एकतर तांत्रिकदृष्ट्या विसंगत ठरते. यावरून आपली संकुचित वृत्ती मात्र स्पष्ट होते. शेवटी, भाषा हे संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे, पण त्यातून व्यक्त होणारे विचार आणि राष्ट्रहिताची उद्दिष्टे त्याहूनही महत्त्वाची असतात. एखाद्या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेचा प्रवास मांडताना, भाषेच्या सीमा ओलांडून तो विचार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविणे काळाची गरज असते. केवळ भावनिक अस्मितेत अडकून न राहता, आपण कोणत्या व्यासपीठावर आहोत आणि आपला मुख्य उद्देश काय आहे, याचे भान राखणे यावेळी जास्त महत्त्वाचे आहे. भाषेचा आदर असायलाच हवा, पण तो विचारांच्या देवाणघेवाणीत अडथळा ठरू नये, हेच व्यावहारिक सत्य आहे. 'मराठी' असण्याचा अभिमान बाळगतानाच, जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर संवाद साधताना लवचीकता असणे हेच प्रगल्भतेचे लक्षण आहे. अस्मिता जपलीच पाहिजे, पण ती प्रगतीच्या किंवा विचारांच्या प्रसाराच्या आड येता कामा नये.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### संस्कार आणि घड्याळासारखे जीवन

मुलांवर वयाच्या आठव्या वर्षापर्यंत उत्तम संस्कार घडवले तर ती प्रजा उत्तम व बुद्धिमान होते, हा निसर्गनियम आहे. परंतु सध्या काही वेगळेच चित्र बघायला मिळते. ज्यात द्वेष नावाचा (कु)संस्कार पदोपदी दिसतो आहे. सहजपणे सजीव (त्यात बॅटरी असलेले) घड्याळाच्या काट्यांकडे पाहिले तर किती ज्ञान मिळते, हे एक नवल आहे. प्रत्येक दिशेला ते नमस्कार करीत असतात आणि आपले जीवन दुसऱ्यांकरिता सत्कारणी लावतात. हे ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच संस्कार आहेत. ते काटे कर्म करायला शिकवितात. ऊर्जा, चैतन्य, श्वास आणि उच्छवास दुसऱ्यांसाठी खर्च कर असेच ते काटे बोध करताना दिसतात. घड्याळ बघून जन्म आणि मरण होत नसते, परंतु संपूर्ण आयुष्य घड्याळाच्या काट्यांवरच केंद्रित असते. स्वतःसाठी ते जगत नाहीत. मुद्दा एवढाच आहे की, अजित पवारांच्यासाठी वरळी धील डोम सभागृहात जी शोकसभा झाली त्यावेळी असंख्य मान्यवर उपस्थित होते. जेव्हा सभागृहात माननीय व्यक्ती प्रवेश करते तेव्हा तिचा आदर प्रत्येक जण उभे राहून करतोच हा पायंडा (प्रोटोकोल) आहे.

असे असताना माजी आमदार व कॅबिनेट मंत्री आदित्य ठाकरे एकनाथ शिंदेंच्या आगमनाच्या वेळी मठ्ठपणे बसून होते. कदाचित आपण त्यांचा अपमान केला हीच भावना त्यांच्या मनात असणार; परंतु अशा द्वेषी वागण्याने आदित्यवर घरचे संस्कार नाहीत, हेच जगाने पाहिले असेल. दुसरीकडे रोहित पवार स्वतःजवळ कोणताच पुरावा नसताना रोजच्या रोज पत्रकार परिषद घेऊन करमणुकीचा खेळ करताना दिसतात, पण अजूनपर्यंत एकही एफआयआर दाखल करता आला नाही. जो मुख्य विषय आहे तो बाजूला ठेवून जनता मूर्ख आहे, या भावनेत वावरताना दिसतात. त्यामुळे आपल्या आजोबांच्या पक्षाची जी पूर्व निशाणी घड्याळ होती तिच्याकडून ते कोणतेच संस्कार आत्मसात करू शकले नाहीत, याचे दुःख आहे. आयुष्य हे द्वेषी विचारांनी जगण्यासाठी नाही तर कोणतीही अपेक्षा न करता जगण्यासाठीच असते, हेच प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पालकांची जबाबदारी महत्त्वाची

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे आणि ही स्पर्धा प्रत्येक क्षेत्रात आहे. स्पर्धा म्हटले की यश-अपयश आलेच; मागोमाग तणाव आलाच. आज पालकांना आपली मुले प्रत्येक क्षेत्रात अव्वल असावीत असे वाटते आणि मग मुलांवर अपेक्षांचे ओझे लादले जाते. मात्र, अव्वल स्थानावर असण्याच्या नादात मुलांचे बालपण हरवून गेले आहे. खेळ मुलांच्या आयुष्यातून कालबाह्य झाले आहे. शाळा आणि विविध वर्गांसाठी मुलांना वेळ नाही. त्यामुळे शारीरिक आणि मानसिक विकास होण्यास आडकाठी निर्माण होते. यश आणि अपयश यांचा सामना करता यायला हवा आणि हे संस्कार मनावर लहानपणापासून व्हायला हवे. यशाने हुरळून जाऊ नये, अपयशाने खचून जाऊ नये इतके मार्गदर्शन पालकांनी केले तरी मुलांचे भविष्य चांगले होणार. जीवनात प्रत्येक क्षेत्रात काही उणे-अधिक राहणार. त्यासाठी मनाची तयारी केली पाहिजे. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, हे लक्षात घेऊन त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. कुठे चुकले त्याचा अभ्यास करून पुढच्या प्रयत्नात यश नक्की मिळेल, असा विश्वास त्यांच्या ठायी निर्माण व्हायला हवा. आज भ्रमणध्वनी, दूरदर्शन यासारख्या माध्यमांचा पगडा मुलांच्याच नव्हे तर पालकांच्या मनावरही आहे. याला वेळीच सांभाळले पाहिजे. मुले पालकांचे अनुकरण करतात. त्यांना सांगण्याआधी आपले वर्तन सुधारले पाहिजे. लहान लहान गोष्टीत आक्रस्ताळेपणा आणि अतिहट्ट घातक आहे, याचा परिणाम अत्यंत क्लेशदायक आहे. अपशब्द उच्चारणे, घरातून निघून जाणे, मारणे, हात उगारणे, अयोग्य वर्तन करणे, आत्महत्येचा प्रयत्न करणे यामुळे घराघरातील वातावरण काळजीचे झाले आहे. फक्त परीक्षा काळात मुलांकडे लक्ष देण्याऐवजी वर्षभर लक्ष देणे गरजेचे आहे. शाळा आणि घर यातून संस्कार केले जातात. अति शिस्त आणि त्यांचे दोषांवर लक्ष देताना मुलांची आवड लक्षात घेऊन तसे मार्गदर्शन केले तर आयुष्यात चांगले साध्य होईल. शिक्षक-पालक संवाद साधला जावा. यातून मुलांच्या प्रश्नांची उकल केली गेली पाहिजे. छंद, खेळ, वाचन, संगीत यातून ताणतणाव कमी करून मुलांच्या प्रगतीचा आलेख उंचावता येईल. मुले म्हणजे आपले आणि देशाचे भविष्य आहे. केवळ दहावी-बारावी परीक्षांचा निकाल हेच आयुष्य नाही. यशस्वी जीवनाचे अंतिम सूत्र नाही. मुलांना आणि पालकांना योग्य मार्गदर्शनाची नितांत गरज आहे.

**संगीता वाईकर** /९९२२५०४७९४



### मॉरिशस : एक सुखद अनुभव

हिंद महासागरातील आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जवळपास दोन हजार किलोमीटर क्षेत्रामध्ये व्यापलेलं, अवघी १२,६६,५७३ लोकसंख्या असलेलं मॉरिशस हे एक बेट आहे. पोर्ट लुईस ही या देशाची राजधानी. इंग्रजी ही कार्यालयीन भाषा असून मुख्यत्वे फ्रेंच बेस्ड 'क्रिऑल' ही भाषा बोलली जाते. मॉरिशियन रूपी ही या देशाची करन्सी आहे. अशा या भौगोलिक इतिहास असलेल्या मॉरिशस बेटाला भेट देण्याचा योग जुळून आला. पोर्ट लुईसच्या दक्षिण-पूर्व दिशेकडे साधारणतः ४८ कि. मी. वर सर सिवुसागर रामगुलम या आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्याबरोबरच बेटामध्ये नांदणाऱ्या शांततेची जाणीव झाली. कुठेही गोंधळ नाही, गडबड नाही. येथे 'व्हिसा ऑन अरायव्हल' आहे. हॉटेल 'तमासा'मध्ये दाखल झाले. समुद्र किनारा लाभलेलं, अतिशय सुंदर हॉटेलचं खरंच अप्रूप वाटलं. हॉटेलचा स्टाफ अगदी नम्र. भारतीयसह बऱ्याच व्यंजनांचा आस्वाद दररोज घेता येत होता. सकाळी बसमधून निरनिराळ्या स्थळांना देणे हा नित्यक्रम होता. विविध पर्यटनस्थळे बघताना एक स्थळ विशेष आवडलं. आफ्रिकेमधील सर्वांत मोठं हिंदू धर्म असणारं हे राष्ट्र भगवान शिवाची उपासना मोठ्या भक्तिभावानं करतं. गंगा तलाव म्हणून प्रसिद्ध तलावाच्या काठी भगवान शिवाचं मंदिर दिमाखात उभं आहे. १०८ फूट उंचीची भगवान शिवाची व दुर्गा मातेची मूर्ती लक्ष वेधून घेतले. मार्च २०२५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी तिथे गेले होते. मोदींनी भारतामधील गंगेचं पाणी मॉरिशसमधील गंगा तलावात प्रवाहित केलं होतं, अशी माहिती तेथील स्थानिक गाईडने दिली. सौहार्दपूर्ण वातावरणात राजकीय सलोखा वृद्धिंगत करण्याचं कसब राजकारण्यांनी मोदींकडून शिकावं. असो, अशी ही मॉरिशसची संस्कृती बघून धन्य वाटलं. सात लाख वर्षांपूर्वी 'क्यूरपाईप' या शहराजवळ ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर आज त्या ठिकाणी सुंदर हिरवीगार झाडं बघताना आश्चर्यचकित व्हायला होतं. असा हा विविधतेने नटलेला देश बघायला एकदा तरी जरूर जावं.

**कीर्ती गाडगे** /९९२११९९९२२

### होळी (हुताशनी पौर्णिमा) सणामागील शास्त्र

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात साजरा केला जातो. दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सत्प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. होळी सणाचे महत्त्व, सण साजरा करण्याची पद्धत याविषयीची शास्त्रीय माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. देशपरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या पाच-सहा दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. होळी सणाला अनेक समानार्थी शब्द असले, तरी 'वसंतोत्सव' अथवा 'वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नावही देता येईल. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या पृथ्वीवरील प्रथम महायज्ञाची स्मृती म्हणून प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भारतात 'होली' या नावाने यज्ञ होऊ लागले. विकारांची होळी करून जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण. 'विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिद्ध आहोत' याचे जणू तो प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म-अहंकार होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुद्ध सात्त्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. आपले दोष, व्यसने आणि वाईट सवयी यांना घालवण्याची सुसंधी म्हणजे होळी आहे. सद्गुण ग्रहण करण्याची, अंगीकारण्याची संधी आहे. देशभरात सर्वत्र साजरा केला जाणाऱ्या 'होळी' या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण उत्साहाने सहभागी होतात. सर्वसाधारणपणे देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवायची असते. बहुधा ग्रामदेवतेसमोर होळी उभी केली जाते. श्री होलिकापूजनाचे स्थान शेणाने सारवून रांगोळी घालून सुशोभित करतात. मधोमध एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करतात. त्याच्या भोवती गोवऱ्या आणि सुकी लाकडे रचतात. घरातील कर्त्या पुरुषाने शुचिर्भूत होऊन आणि देशकालाचा उच्चार करून 'सकुटुम्बस्य मम ढुण्ढाराक्षसीप्रीत्यर्थं तत्पीडापरिहारार्थं होलिकापूजनमहं करिष्ये।' असा संकल्प करावा आणि नंतर पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्यानंतर 'होलिकायै नमः।' म्हणून होळी पेटवावी. होळीला प्रदक्षिणा घालावी आणि पालथ्या हाताने बोंब मारावी. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध-तूप शिंपडून शांत करावी. श्री होलिकादेवतेला पुरणपोळीचा नैवेद्य तसेच नारळ अर्पण करावा. मग जमलेल्यांना प्रसाद द्यावा. होलिकेची पूजा



करताना म्हणायचा मंत्र-

'अस्माभिर्भयसन्त्रस्तैः कृता
त्वं होलिके यतः ।
अतस्त्वां पूजयिष्यामो भूते
भूतिप्रदा भव ॥'- स्मृतिकौस्तुभ

आयुर्वेदानुसार होळीचे लाभ - थंडीच्या दिवसांत शरीरात साठलेला कफ दोष होळीच्या काळात सूर्याच्या उष्णतेमुळे पातळ होतो आणि त्याच्यामुळे विकार उत्पन्न होतात. होळीच्या औषधी धुरामुळे कफ न्यून होण्यास साहाय्य होते. सूर्याच्या उष्णतेमुळे पित्त काही प्रमाणात वाढते. गाणे, हसणे आदींनी मन प्रसन्न होते आणि पित्त शांत होते. होळीच्या वेळी म्हटलेल्या रक्षोघ्न मंत्रांनी वाईट शक्तींचा त्रासही न्यून होतो, असे वैद्य मेघराज माधव पराडकर यांनी म्हटले आहे. धर्मविरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता पर्यावरणपूरक, अपप्रकार विरहित; मात्र धर्मशास्त्र सुसंगत अशी होळी साजरी करा.

**विद्याधर जोशी** /९०११०८४४५०

## महत्वाचे...



## सोलापूर जिल्हा काँग्रेसतर्फे जिल्हाधिकारी यांना निवेदन


**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते, लोकसभेतील विरोधी पक्षनेते, खा.राहुल गांधी व काँग्रेस पक्षाच्या खासदारांना विरोधकाशी संबंधित कार्यकर्त्याकडून घरात घुसून गोळ्या घालण्याची उघड धमकी देण्यात येणे ही घटना गंभीर आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर पुणे येथे भ्याड हल्ला करण्यात आला. हा संतापजनक आणि लोकशाही मूल्यांवर थेट आघात करणारा प्रकार आहे. लोकशाही व्यवस्थेत हिंसेला कोणतेही स्थान नाही. या प्रकरणातील सर्व दोषींना अटक करून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच अशा घटनांना अप्रत्यक्ष वा प्रत्यक्ष संरक्षण देणाऱ्यांचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी केली. यावेळी सुभाष चव्हाण, मोतीराम चव्हाण, शिवानंद बिराजदार, रोहित शटगार, सरचिटणीस जहीर मणेर, महंमद शेख, सचिन खैरे-पाटील, श्रीशैल रणखांबे, रमेश नामदास, प्रशांत कांबळे, महादेव जाधव (गंगेवाडी), मिजाज जहांगीरदार, राजकुमार राठोड, उत्तमकुमार वाघमारे उपस्थित होते.

## इंदिरा गांधी पार्क स्टेडियमसमोर माकडाची 'एन्ट्री'

### मुक्तछंद वावर पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**



शहरातील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम समोरील आवारात आज एक माकड मुक्तछंदपणे फिरताना दिसल्याने नागरिकांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले. काही वेळ ते समोरील कंपाउंडवर बसून हात खाजवत तसेच विविध हालचाली करत होते. हा अनोखा पाहुणा पाहण्यासाठी नागरिकांनी परिसरात गर्दी केली होती. .कुतूहलापोटी काही नागरिकांनी माकडाला चॉकलेट व सफरचंद देण्याचाही प्रयत्न केला. मात्र, एका व्यक्तीने अगदी जवळ जाऊन सफरचंद देण्याचा प्रयत्न करताच माकड त्याच्या अंगावर धावून आले. त्यामुळे संबंधित व्यक्ती काही क्षण घाबरली व पळायचेही कळले नाही. या प्रकारामुळे परिसरात क्षणिक गोंधळ निर्माण झाला.पळापळ झाली. त्यामुळे गर्दी आणखी वाढली. सुदैवाने कोणतीही दुखापत झाली नाही. दरम्यान, काही वेळ माकडाने परिसरात फेरफटका मारत झाडांवर उड्या घेतल्या.मोबाईलमध्ये व्हिडिओ व फोटो काढण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली. त्या माकडानेही वेगवेगळ्या हालचाली करत जणू विविध पोज दिल्याचे पाहायला मिळाले. माकड काही काळ थांबल्यानंतर झाडांच्या दिशेने निघून गेले. सुदैवाने कोणतीही मोठी अनुचित घटना घडली नाही. या घटनेमुळे नागरिकांमध्ये कुतूहल दिसून आले.



## राज स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

जूनी मिल कंपाऊंड मूरारजी पेठ येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूल मध्ये ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमग्राज यांचा जन्म दिवस अर्थात मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांच्या हस्ते विष्णुपंत कोठे, स्व. राजेश कोठे, स्व. महेश कोठे, देवी सरस्वती तसेच वि. वा. शिरवाडकर, यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण तसेच ग्रंथ पालखी पूजन करून मराठी भाषा गौरव दिवसञ्ची सुरवात करण्यात आली. सूत्रसंचालन मराठी सहशिक्षिका सुरेखा काळे व दिपाली भोईटे तर सायरा मोगल यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्था अध्यक्ष सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष देवेंद्र कोठे, सचिव प्रथमेश कोठे, डॉक्टर राधिका चिलका यांचे मार्गदर्शन लाभले.

# धार्मिक स्थळावरील अनाधिकृत भोंगे उतरवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**



सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश तसेच शासनाने वेळोवेळी धार्मीक स्थळावरील भोंगे उतरवण्यासाठी दिलेले मार्गदर्शक तत्वे यानुसार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत सकाळी ११ ते १६ वा. दरम्यान अनाधीकृत भोंगे, काढून घेण्याबाबत अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली.

यामध्ये अशोक सायकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी उपविभाग, बालाजी कुकडे, पोलीस निरीक्षक, बार्शी शहर यांच्या नेतृत्वाखील बार्शी शहर पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांनी शहरातील बारंगुळे प्लॉट, मंगळवार पेठ, ४२२ खाजा नगर, अमन चौक, एकविरा आई चौक या मिश्रवस्ती मधील मस्जिद, दर्गा, मदरसा, मंदिर व इतर धार्मिक स्थळांवरील अनाधिकृत भोंगे काढून घेण्यात आले.

बार्शी शहरातील ११ मस्जिद चेक करून ०८ मस्जित वरील १४ भोंगे काढण्यात आले. ०५ मंदिरांवरील ०८ भोंगे असे सर्व एकूण २२ भोंगे काढण्यात आले. तसेच संबंधित धार्मिक स्थळांच्या ट्रस्टी यांना सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनी प्रदूषणाच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे व शासनाने ध्वनी प्रदूषणच्या संदर्भात केलेल्या नियमा प्रमाणे सोबत स्पीकर परवाना घेऊनच व आवाजाची मर्यादा ठेवून स्पीकर बॉक्स धार्मिक स्थळाच्या आत मध्ये बसविण्याची समज दिली.

बार्शी शहर पोलीसांकडून धार्मिक स्थळाचे ट्रस्टी यांना विश्वासामध्ये घेऊन धार्मिक स्थळावरील भोंगे काढण्यात आले आहेत. ही कारवाई शांततापूर्ण वातावरणात व कोणताही अनुचित प्रकार घडू न देता पार पडली. सर्व समाजघटकांनी प्रशासनास सहकार्य केले असून शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यात प्रशासनास यश आले आहे.

### नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करू

ध्वनीप्रदूषणा संदर्भातील नियमांचे पालन करावे व कोणतेही ध्वनीवर्धक यंत्र वापरण्यापूर्वी आवश्यक ती वैध परवानगी घेणे बंधनकारक आहे अशी परवानगी घेवून ध्वनीवर्धक यंत्र बसवावीत. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. **- अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक**

# 'हाय-टेक' बसस्थानकाचा मार्ग मोकळा

**बार्शीकरांचे स्वप्न साकार!**
**वैराग, दि.२८ फेब्रुवारी -**



बार्शी शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या आणि गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या नूतन भव्य बसस्थानकाच्या कामाला आता मोठी गती मिळाली आहे. आमदार महोदयांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून आणि महायुती सरकारच्या सहकार्यातून या आधुनिक बसस्थानकाचे 'आर्किटेक्चरल इन्फ्रास्ट्रक्चरल डिझाईन' महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रसिद्ध केले आहे.

**कसं असेल नवं बसस्थानक?**

हे केवळ एक बसस्थानक नसून बार्शीच्या विकासाचे एक नवे प्रतीक ठरणार आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या डिझाईननुसार, हे बसस्थानक खालील वैशिष्ट्यांनी सुसज्ज असेल:

भव्य आणि सुसज्ज इमारत : प्रवाशांच्या सोयीसाठी प्रशस्त वेटिंग रूम्स आणि अद्ययावत सोयीसुविधा. आधुनिक आर्किटेक्चर : शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे जागतिक दर्जाचे डिझाईन. डिजिटल सुविधा : बसचे वेळापत्रक आणि माहितीसाठी आधुनिक डिस्प्ले सिस्टम. प्रवाशांची सुरक्षा व सोय : पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छतागृहे आणि अपंगांसाठी विशेष सुविधा.

### पाठपुराव्याला यश, 'वर्क ऑर्डर' लवकरच!

आमदार कार्यकाळात या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यापासून ते तांत्रिक मंजुरी मिळवण्यापर्यंतचा प्रवास आव्हानात्मक होता. मात्र, महायुती सरकारने या लोकहिताच्या कामाला प्राधान्य दिले. आता या कामाची 'वर्क ऑर्डर' अंतिम टप्प्यात असून, लवकरच बार्शीच्या भूमीत या दिमाखदार इमारतीचे बांधकाम सुरू होणार आहे.

बार्शीमध्ये एक भव्य आणि दिव्य बसस्थानक असावे, हे केवळ बार्शीकरांचेच नाही तर माझेही स्वप्न होते. म हायुती सरकारच्या माध्यमातून या कामाला मंजुरी मिळवून घेतली आणि आज याचे डिझाईन समोर येताना मनाला अत्यंत समाधान वाटत आहे. लवकरच वर्क ऑर्डर निघून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

**-माजी आमदार राजाभाऊ राऊत**

## स्वप्नील सपना मंडळाच्यावतीने आज सांस्कृतिक कार्यक्रम

**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

स्वप्नील सपना लोककला विकास मंडळ मानेगांव (ता. माढा) या संस्थेच्यावतीने हा खेळ कुणाला दैवाचा कळला ह बालविवाह मुक्त भारत या विषयावर नाटिका सादर होणार आहे. रविवार, दि.१ मार्च रोजी दुपार तन वाजता बालविवाह मुक्त भारत या संकल्पनेच शोभा यात्रा बैलगाडीतून सवाद्य निघणार असून डॉ. निर्मलकुमार फडकुले संकुल येथे पोहोचेल. दुपारी ४ वाजता हा खेळ कुणाला दैवाचा कळला ही नाटिका होईल. या कार्यक्रमासाठी रजनीगंधा गायकवाड, सुजाता कांबळे परिश्रम घेत आहेत. हा कार्यक्रम करमाळा येथल महात्मा फुले समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रमोद झिंजाडे यांच्या सहकार्यातून संपन्न होत आहे. कार्यक्रमाचा रसिकांन लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष वामन बावळे (९८५०४६४४०८) यांन केले आहे. रंगमंच सजावट नागेश विटे करणार आहे. नाटकाचे व्यवस्थापन सुरज आतार व शुभांगी मिरजकर करीत आहेत.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my name has been changed from "Hasina Jakatadar" (as per my old passport) to "Hasina Mahibubsab Jakatdar" for passport issuance and all other purposes.

Address: Plot No. 32, Siddheshwar Nagar-2, Majrewadi, Solapur, Maharashtra – 413003.

**मुळ रजि. खरेदीखत हरवले बाबतची जाहीर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः धाराशिव शहर तथा **देवळाली**, ता - **भूम**, जि. धाराशिव व शहर बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, **श्री. सुनिल दिपक भगत,** याच्या कडून **बार्शी येथील बिनशेती प्लॉट याचा गट नं. ११७७/३/२८ याचे क्षेत्र १००.२६ चौमी. याबाबतचे रजि. खरेदीदस्त नं. ५२३/२०२०/बरस, दि. ३०/०१/२०२० हा मूळ दस्त व त्याची पावती आणि सूची २ बस स्थानक धाराशिव, शिवाजी चौक** येथील परिसरात डी.सी.बी. बँकेच्या कामासाठी जात असताना दि. २५/०२/२०२६ रोजी दुपारी ०१ - ०५ वा. ते ०१-४५ वा. च्या सुमारास हरवलेले आहे. त्याबाबत त्यांनी धाराशिव सिटी पोलीस स्टेशन, येथे **दि. २८/०२/२०२६** रोजी ऑनलाईन पद्धतीने तक्रार केली आहे. **त्याचा गहाळ रजि. क्र. १९३९१०२२०७२६०००१९** असा आहे.

**श्री. सुनिल दिपक भगत यांना सदर जागा कर्ज प्रकरण करून बँकेकडे तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीदस्त नं. ५२३/२०२०/ बरस, दि. ३०/०१/२०२० हा मूळ दस्त व त्याची सूची २ आणि पावती आवश्यक आहे. परंतु सदर खरेदीखत मूळ दस्त व त्याची सूची २ आणि पावती** हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्यावरती संपर्क साधून आणून द्यावेत, अथवा आमचे अशील हे मूळ रजि. खरेदीखत दस्त आणि सूची २ ऐवजी दुय्यमप्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉट बाबत हक्क, हितसंबंध लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा. अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीहि हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत/फसवणूक होऊ नये या करिता हि जाहीर नोटीस दिली. दि. २८/०२/२०२६.

**आमचे अशील**
**श्री. सुनिल दिपक भगत**

**सही/-**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :-** ''कुलदीप लिगल असोसिएट''
गाळा नं.५१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)



# विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या हस्ते फॉरेन्सीक व्हॅनचे लोकार्पण

## आपत्ती व्यवस्थापन किटचे देखील वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

ग्रामीण पोलीस दलातील ७ उपविभागास प्रत्येकी १ प्रमाणे ७ फॉरेन्सीक व्हॅन शासनाकडून मिळाले आहेत. त्यातील ४ फॉरेन्सीक व्हॅनची शेवटची तुकडी प्राप्त झाली. या फॉरेन्सीक व्हॅनचे उद्घाटन व लोकार्पण सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचे हस्ते करण्यात आले. आधुनिक गुन्हे तपासामध्ये फॉरेन्सिक विज्ञानाचे वाढते महत्त्व व घटनास्थळी वैज्ञानिक पद्धतीने पुरावे संकलित केल्यास गुन्ह्यांचा तपास अधिक अचूक, जलद व परिणामकारक होण्यास मदत होते, त्याचा अचुक व कार्यक्षम वापर पोलीस घटकांनी करावा, असे पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी सांगितले.

सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षत्र, हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. या बैठकीत अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांची प्रमुख उपस्थितीत होती. जिल्ह्यातील गुन्हे, गुन्हेगारावर प्रतिबंधक कारवाई तसेच आगामी काळीतील बंदोबस्त याचा आढावा घेतला.

यावेळी एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर ग्रामीण तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील शाखा प्रभारी अधिकारी हजर होते.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Nirmala Vishwasrao Barbole** HAS BEEN CHANGED TO **Nirmala Vishwas Barbole**

Resi. - Kasarwadi Road, Barshi dist Soalpur M. No. 9850232062

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Ajinkya Vishwasrao Barbole** HAS BEEN CHANGED TO **Ajinkya Vishwas Barbole**

Resi. - Kasarwadi Road, Barshi dist Soalpur M. No. 9850232062

**श्रीराम देव व मारूती देव देवस्थान माळशिरस**
**ता. माळशिरस जिल्हा सोलापूर**
**जाहीर निवेदन**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की श्री राम देव व मारूतीदेव देवस्थान माळशिरस यांचे मालकीच्या मौजे माळशिरस येथील खालील शेत जमिनी १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ पर्यन्त खंडाने करण्यासाठी देण्याच्या आहेत.

| | गट नं | क्षेत्र हे. आ |
|---|---|---|
| १. | १०२०/१ | ४-४८ |
| २. | १०२०/२ | ३४५ |
| ३. | १०२०/३ | ४-६३ |

वर नमुद केलेल्या जमिनी ३ वर्षासाठी खंडाने वहीवाटणेसाठी देण्याच्या आहेत. तरी इच्छुकांनी दिनांक १५.३.२०२६ पुर्वी प्रत्येक गटासाठी वेगवेगळे टेंडर्स आणून द्यावीत. टेंडरमध्ये भाग घेणाऱ्यांनी रूपये १०१ ची देणगी भरून टेंडरफार्म घ्यावा व बंद पाकीटातून टेंडर्स द्यावीत. बंद पाकीटावर कोणत्या गटासाठी टेंडर आहे याचा स्पष्ट उल्लेख असावा टेंडर्स बाबतच्या अटी व नियमांबाबत विष्णुपंत कुलकर्णी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था ऑफीसमध्ये सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळात भेटावे. दि. १५.३.२०२६ नंतर विश्वस्त मंडळ टेंडर बाबत निर्णय घेईल. कोणतेही टेंडर स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणेचे अधिकार पंचकमेटीस राहतील, याची विशेष नोंद घ्यावी.

**टिपः-** देणगी देणे टेंडर फॉर्म घेणे भरलेली सीलबंद टेंडर्स जमा करणे यासाठी श्री रामभाऊ दोशी एस. टी स्टॅंडजवळ माळशिरस यांचेशी संपर्क साधावा.

**सही/-**
**ॲड. श्री मिलिंद विष्णुपंत कुलकर्णी**
चेअरमन
श्रीरामदेव श्रीमारूतीदेव देवस्थान माळशिरस

**नावांत बदल**

मी **रफिक महमदसाब शेख** (Rafik Mahamadsab Shaikh) रा. ६२२, संजयगांधी नगर झोपडपट्टी नं. २ विजापूर रोड, सोलापूर या नोटीसीने सर्व लोकांना कळविण्यात येते की,

माझे जुने नांव रफिक महमदसाब मासुलदार असे होते. माझ्या नावात बदल झाल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र (गॅझेट) मध्ये दि. मे २६ ते जून १, २०२६ ने नावात दुरुस्ती केलेली आहे. भविष्यात माझे नवीन नांव **रफिक महमदसाब शेख** असे वाचण्यात यावे.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अर्ज १०९/२०२५

**पंढरपूर येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**
**(श्रीमती पी.एस.धुमाळ)**

श्री. योगेश महादेव माळी वगैरे -- अर्जदार
विरूध्द
कोणी नाही -- सामनेवाला

यातील अर्जदार यांनी त्यांची आई मंगल महादेव माळी यात ता. १२/०८/२०२४ रोजी मयत झाल्या. त्यांना अर्जदार नं. १ श्री. योगेश महादेव माळी व अर्जदार नं. २ सौ. योगिता शिवलिंग वसेकर यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाही. म्हणून पंढरपूर येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दि.कि.अर्ज नं १०९/२०२५ हा दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील प्रकरणी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासनू ३० दिवसाचे आत अथवा मे. कोर्टाने नेमलेली ता. २०/०३/२०२६ या दिवशी न्यायालयात स्वतः अगर विधीज्ञामार्फत हजर होवून मयत मंगल महादेव माळी यांना वरील अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. तसे असल्यास त्याबाबत कोणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदपत्रानिशी व विधीज्ञामार्फत हजर होवून त्यांची बाजू मांडावी. इतीउपर वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत वेळेत आली नाही तर योग्य ते आदेश पारित केले जातील. व सदरील अर्जदाराशिवाय मयत मंगल महादेव माळी यांना अन्य कोणीही वारस नाही. म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याकरीता हे जाहीर प्रसिध्दीकरण न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसिध्द केले असे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २७/०२/२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक, पंढरपूर**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पंढरपूर**

**जाहीर समन्स**

रे.मु.नं.३२१/२०१४

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

नि.नं. ११०

नामदेव सिध्दाराम गायकवाड
रा. बोरूळ (रत्नापूर) ता. दक्षिण सोलापूर,
जि. सोलापूर दाव्याचे कामकाज चालू असताना --वादी
मयत कायदेशीर वारस -
श्रीमती सुषमा पती गौरप्पा जाधव
रा. ४१/११०, न्यु बुधवार पेठ, सोलापूर.

**विरुध्द**

पांडुरंग गोविंद जाधव, वगैरे - २३
प्रतिवादी- २ (ब) सुर्यकांत पिता सोमनिग जाधव
२(क) सौ. मुक्ताबाई पती अशोक वाघमोरे
२(ड) सौ. सुमित्रा पती लक्ष्मण माने
२(इ) सौ. भामाबाई पती सुखदेव वाघमोरे
१० (अ) श्रीमती रामाबाई पती पुंडलिक जाधव -- प्रतिवादी
१० (ब) युवराज पिता पुंडलिक जाधव
१०(क) बर्नासध्द पिता पुंडलिक जाधव
सर्व रा. बोरूळ (रत्नापूर),
तालुका दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर.
१०(ड) सौ. अनिता पती श्रीशैल रणखांबे
रा. शक्ती देवी मंदिराजवळ,
गरीबी हटाव झोपडपट्टी नं.१,
विजापुर नाका, सोलापूर.

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते २३ यांचेविरुध्द दावा सरसनिरस मनाने वाटप होऊन मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी आपण दाव्यात दिलेल्या पत्त्यावर प्रतिवादी नं. २ (ब) (क) (ड) (ई) व प्रतिवादी नं.१० अ,ब,क,ड यांचे दाव्यातील नमूद पत्त्यावर समन्स पाठवले असता. परंतू वरील प्रतिवादी हे सदर पत्त्यावर रहात असून देखील सदरील पत्त्यावर वरील प्रतिवादी राहत नाहीत, असा बेलीफ रिपोर्ट आलेला असल्यामुळे समन्सची बजावणी झालेली नाही. त्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडत आहे. दावा दाखल केला, त्यावेळी आपण दाव्यात दिलेल्या पत्त्यावरच रहात होता.

त्याअर्थी प्रतिवादी नं.२(ब) (क) (ड) (ई) व प्रतिवादी नं.१० (अ) (ब) (क) (ड) यांना या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, हे समन्स प्रसिध्द झालेपासून १ महिन्याचे आत किंवा दि. ०७/०३/२०२६ रोजी प्रतिवादी नं. २ब ते २ई व प्रतिवादी नं. १०अ ते १ड यांनी स्वतः अगर विधिज्ञामार्फत या अर्जाच्या कामी वरील न्यायालयामध्ये सकाळी ११.०० वाजता हजर रहावे. जर त्याकामी त्यादिवशी आपण गैरहजर राहिलात तर सदर दाव्याचे कामी आपले काहीही म्हणणे मांडावयाचे नाही, असे समजून आपलेविरुध्द पुढील हुकूम होईल, याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स माझे सही शिक्क्यानिशी दिले. दि. २७/२/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**मा. अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत

**१९५६ च्या वृत्तपत्र कायद्यान्वये सोलापूर तरुण भारत मिडिया लि. वृत्तपत्र मालकी विषयी निवेदन**

**१) प्रकाशन स्थळ** : १२ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३
**२) प्रकाशनाचा कालावधी** : दैनिक
**३) प्रकाशकाचे नाव व पत्ताः** श्री.दिलीप शिवमूर्ती दुलंगे १२ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर-४१३००३
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**४) मुख्य समूह संपादकाचे नाव व पत्ताः** श्री. दिलीप यशवंत पेठे, १२, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर - ४१३००३
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**५) मुख्य संपादकाचे नाव व पत्ताः** श्री. प्रशांत वसंतराव माने, बी-१९२, सिंधू विहार, विजापूर रोड, जुळे सोलापूर-४१३००४
**६) संचालक :** **श्री. विवेक कृष्णाजी घळसासी**
प्लॉट नं.७, फ्लॅट ४०१, व्यंकटेश हाईटस्, वर्धा रोड, उजनी नगर, नागपूर - ४४००२५
**श्री. दिलीप यशवंत पेठे**
११ इंडस्ट्रियल इस्टेट, होटगी रोड, सोलापूर ४१३००३
**श्री. प्रशांत सदाशिव बडवे**
५४१, उत्तर कसबा, सोलापूर ४१३००७

वृत्तपत्राची मालकी ज्यांच्याकडे आहे, अशा व्यक्ती व एकूण भांडवलात एक टक्क्याहून अधिक भाग धारण करणारे भागधारक, त्यांची नावे व पत्ते- **श्री. दिलीप यशवंत पेठे,** ११ इंडस्ट्रियल इस्टेट, होटगी रोड, सोलापूर ४१३००३.

**मी. दिलीप शिवमूर्ती दुलंगे** वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे, असे जाहीर करीत आहे.

**दिलीप शिवमूर्ती दुलंगे**
मुद्रक, प्रकाशक



# टी-२० विश्वचषकाचा थरार





## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – ४३

### एरोबिक फिटनेसची वैज्ञानिक क्रांती : ''कूपर टेस्ट''

**डॉ. केनेथ कूपर हे अमेरिकन हृदयरोगतज्ज्ञ आणि संशोधक असून त्यांना ''फादर ऑफ ऐरोबीक्स '' म्हणून ओळखले जाते. १९६०च्या दशकात त्यांनी एरोबिक व्यायामाचे**



**हृदयाच्या आरोग्यावर होणारे परिणाम वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध केले. त्या काळात वजनउचल आणि स्नायूवाढ यावर भर होता; परंतु कूपर यांनी धावणे, सायकलिंग, जलतरण यांसारख्या एरोबिक व्यायामामुळे हृदय आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते, हे ठामपणे मांडले.**

१९६८ साली त्यांच्या ऐरोबीक्स या पुस्तकाने जगभरात फिटनेस चळवळ निर्माण केली. या पुस्तकात त्यांनी नियमित, मध्यम ते उच्च तीव्रतेच्या एरोबिक व्यायामाचे फायदे सोप्या भाषेत मांडले. त्यातून सामान्य लोकांमध्ये ''जॉगिंग'' आणि रनिंगची लोकप्रियता प्रचंड वाढली.

याच संशोधनातून १९६८ मध्ये कूपर टेस्ट म्हणजेच ''१२ मिनिटांचा धावण्याचा चाचणी'' विकसित झाला. हा टेस्ट मूळतः अमेरिकन एअर फोर्ससाठी सैनिकांची कार्डिओव्हॅस्क्युलर फिटनेस मोजण्यासाठी तयार करण्यात आला होता. या चाचणीत व्यक्तीने १२ मिनिटांत जास्तीत जास्त अंतर धावायचे असते. धावलेल्या अंतराच्या आधारे $VO_2max$(कमाल ऑक्सिजन वापर क्षमता) याचा अंदाज काढला जातो. $VO_2max$ हा एरोबिक फिटनेसचा महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. जितका $VO_2max$ जास्त, तितकी सहनशक्ती आणि कामगिरी चांगली.

कूपर यांनी पुढे १९७० मध्ये डॅलस, टेक्सास येथे कूपर ऐरोबीक्स सेंटरची स्थापना केली. येथे फिटनेस मूल्यांकन, प्रतिबंधात्मक वैद्यक आणि आरोग्यविषयक संशोधन केले जाते. त्यांचे मत स्पष्ट होते ''व्यायाम हा औषधासारखाच प्रभावी आहे, परंतु त्याचे दुष्परिणाम नाहीत.''

आजही जगभरातील धावपटू, प्रशिक्षक आणि क्रीडा संस्था फिटनेस मोजण्यासाठी कूपर टेस्ट वापरतात. हा टेस्ट सोपा, कमी खर्चिक आणि वैज्ञानिकदृष्ट्या विश्वासार्ह आहे. मॅरेथॉन किंवा हाफ मॅरेथॉनसारख्या स्पर्धांसाठी तयारी करताना $VO_2max$ समजणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.थोडक्यात, डॉ. केनेथ कूपर यांनी एरोबिक व्यायामाला वैज्ञानिक आधार देऊन जागतिक फिटनेस संस्कृतीत मोठी क्रांती घडवून आणली. त्यांच्या संशोधनामुळे आज धावणे हे केवळ खेळ नसून आरोग्यदायी जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनले आहे.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# जम्मू-काश्मीरचा ऐतिहासिक विजय

● ६७ वर्षांत प्रथमच जिंकले रणजी करंडक ● आठ वेळच्या विजेत्या कर्नाटकवर वर्चस्व

♦ **हुबळी, २८ फेब्रुवारी**

शनिवारी कर्नाटकविरुद्धचा अंतिम सामना अनिर्णीत राहिल्यानंतर जम्मू-काश्मीरने पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या आधारे पहिले रणजी करंडक विजेतेपद पटकावत इतिहासात आपले नाव कोरले.

शुक्रवारी २९१ धावांची मोठी आघाडी मिळवल्यानंतर जम्मू-काश्मीरने पाचव्या व शेवटच्या दिवशी आणखी एका दमदार फलंदाजीच्या प्रदर्शनासह सामन्यावर आपली पकड मजबूत केली.

जम्मू-काश्मीरने ४ बाद १८६ धावांवरून पाचव्या दिवशी आपल्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली. ९४ धावांवर नाबाद राहिलेले कामरान इक्बाल व १६ धावांवर असलेले साहिल लोत्राने उत्तम शतके झळकावलीत. जम्मू-काश्मीरने त्यांची एकूण आघाडी ६३३ धावांवर नेली.

पाचव्या उपहाराच्या वेळी जम्मू-काश्मीर संघाची धावसंख्या ४ बाद २८५ होती. इक्बाल व साहील अनुक्रमे १६० व १०१ धावांवर फलंदाजी करीत होते व जम्मू-काश्मीरने ४ बाद ३४२ धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला, तेव्हा दोन्ही कर्णधारांनी हस्तांदोलन करीत सामना अनिर्णीत राखण्याचे मान्य केले.

तत्पूर्वी, जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात ५८४ धावांचा डोंगर रचला होता, पण कर्नाटकचा संघ ९३.३ षटकांत २९३ धावांतच गारद झाला. वेगवान गोलंदाज औकिब नबीने ५४ धावांत ५ बळी घेत संघाला सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवून दिले.

पहिल्या डावात २९१ धावांची आघाडी मिळवूनही जम्मू-काश्मीरने कर्नाटकवर फॉलो-ऑन न लादण्याचा निर्णय घेतला व त्याऐवजी दुसऱ्या डावात स्वतः फलंदाजी करून कर्नाटकला स्पर्धेतून बाहेर काढले. पाचव्या आणि शेवटच्या दिवशी दुसऱ्या डावात ४ बाद ३४२ धावा काढल्यानंतर त्यांनी ६३३ धावांचा फायदा घेतला. सलामीवीर कामरान इक्बालचे दुसरे प्रथम श्रेणी शतक (१६० नाबाद) आणि साहिल लोत्राचे पहिले प्रथम श्रेणी शतक (१०१ नाबाद) यांनी ऐतिहासिक प्रसंगी चमक वाढवली.



प्रतिष्ठेच्या रणजी करंडाकसह विजेत्या जम्मू-काश्मीरचे क्रिकेटपटू

### पुंडिर सामनावीर, नबी मालिकावीर

शुभम पुंडिरने दर्जेदार शतक झळकावले. त्यामुळे जम्मू-काश्मीरने पहिल्या डावात ५८४ अशी मोठी धावसंख्या रचून पाया भक्कम केला. २४७ चेंडूंत १२ चौकार व २ षट्कारांसह १२१ धावांची शतकी खेळी करणारा पुंडिर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

वेगवान गोलंदाज औकिब नबीने गोलंदाजीत वर्चस्व गाजवले. त्याने पाच बळी घेत कर्नाटकचे कंबरडे मोडले. त्याने केएल राहुल व मयंक अग्रवालसारख्या भारतीय खेळाडूंना बाद केले. या हंगामात सातव्यांदा पाच बळी घेतले व उपांत्य फेरी आणि अंतिम सामना जम्मू-काश्मीरच्या बाजूने वळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. जम्मू-काश्मीरचे यश सामूहिक प्रयत्नांवर आधारित आहे. या स्पर्धेत २४५ धावा व ६० बळी टिपणारा औकिब नबी मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

कर्णधार पारस डोग्राने १०,००० रणजी करंडक धावांचा टप्पा पार केला, तर यावर हसन, अब्दुल समद व कन्हैया वाधवान यांनी मौल्यवान अर्धशतके झळकावलीत.

गत पाच दिवसांत हुबळी येथील केएससीए स्टेडियमवर जम्मु-काश्मीर पहिल्यांदाच अंतिम फेरीत प्रवेशकरणाऱ्या संघांसारखा दिसला नाही, त्यांनी भारतीय स्टार खेळाडूंनी भरलेल्या संघाला सहजतेने हरवले.

हा विजय जम्मू-काश्मीरचा पहिला रणजी करंडक विजेतेपद आहे. ६७ वर्षांपूर्वी या स्पर्धेतपदार्पण केल्यापासून जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट प्रवासातील एक महत्त्वाची कामगिरी आहे. यापूर्वी, जम्मू आणि काश्मीरने २०१३-१४, २०१९-२० आणि २०२४-२५ हंगामात उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. जम्मू-काश्मीरच्या या विजयामुळे कर्नाटकचे नवव्यांदा रणजी करंडक जिंकण्याचे स्वप्न भंग झाले. खऱ्या अर्थाने सांघिक प्रयत्नांमुळे कमी कल्पित संघाला जेतेपदापर्यंत पोहोचवले.

◂(वृत्तसंस्था)



खेळाचा आनंद घेताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला व इतर

## जम्मू-काश्मीरच्या खेळाडूंना २ कोटी रुपयांचे बक्षीस

**मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची घोषणा**

**सरकारी नोकऱ्याही देणार**

♦ **हुबळी, २८ फेब्रुवारी**

रणजी करंडक स्पर्धेत संघाच्या ऐतिहासिक पहिल्या विजेतेपदानंतर खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना २ कोटी रुपयांचे रोख बक्षीस आणि सरकारी नोकरीच्या संधी देण्यात येईल, अशी घोषणा जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केली. केंद्रशासित प्रदेशातील क्रिकेटसाठी ही कामगिरी एक महत्त्वाचा क्षण असल्याचे त्यांनी म्हटले.

हुबळी येथे पाच दिवसांच्या अंतिम सामन्यात आठ वेळा विजेत्या कर्नाटकविरुद्ध पहिल्या डावात मोठी आघाडी मिळवून जेतेपद मिळवून जम्मू आणि काश्मीरने इतिहास घडविला. या विजयाने देशांतर्गत क्रिकेटमध्ये एक शक्तिशाली शक्ती म्हणून त्यांचा उदय अधोरेखित करणारी प्रभावी कामगिरी केली.

बक्षीस जाहीर करताना, मुख्यमंत्री कार्यालयाने प्रदेशाच्या क्रीडा परिसंस्थेसाठी या विजयाचे व्यापक महत्त्व अधोरेखित केले.

रणजी करंडक स्पर्धेत कर्नाटकवर त्यांच्याच घरच्या मैदानावर झालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल जम्मू-काश्मीर संघाचे अभिनंदन करताना, मुख्यमंत्र्यांनी खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना त्यांच्याच घरच्या मैदानावर मिळालेल्या विजयानंतर २ कोटी रोख बक्षीस जाहीर केले. जम्मू-काश्मीर क्रिकेटसाठी हा एक महत्त्वाचा क्षण असल्याचे सांगून, त्यांनी सांगितले की या ऐतिहासिक विजयाने संपूर्ण प्रदेश अभिमानाने आणि प्रेरणाने भरला आहे. खेळाडूंना अलीकडेच अधिसूचित केलेल्या उत्कृष्ट खेळाडूंसाठी सरकारी नियुक्त्यांचाही हक्क असेल, असे मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले.◂(वृत्तसंस्था)

# दक्षिण आफ्रिका तिसरा सुपर एट सामनाही जिंकण्यास उत्सुक

♦ **नवी दिल्ली, २८ फेब्रुवारी**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी दुपारी दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे यांच्यादरम्यान सुपर एट सामना खेळला जाणार आहे.

टी-२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिका सलग सहा विजयांसह, स्पर्धेत अपराजित राहिलेला हा एकमेव संघ आहे आणि गट टप्प्यात अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात दोन सुपर ओव्हरमधून विजय मिळविला. सुपर एट फेरीतही त्यांनी आतापर्यंत दोन सामने जिंकून ४ गुणांसह गट १ मध्ये अव्वल स्थान मिळविले आहे.





एडन मार्कराम सिकंदर रझा

आता उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित करण्यासाठी इतर कोणत्याही नेट रन रेटच्या गुंतागुंतीच्या गणितात न पडता, दक्षिण आफ्रिकेला झिम्बाब्वेविरुद्ध विजय मिळविणे आवश्यक आहे. तेव्हा एडन मार्कराम आणि चमूला आपूर्ण ताकद पणाला लावावी लागणार आहे.

एडेन मार्करामच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिका संघाचा झिम्बाब्वेविरुद्धचा विजयाचा रेकॉर्ड उत्तम आहे. झिम्बाब्वेने ५८ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेला केवळ दोनदा पराभूत केले आहे.

श्रीलंकेत ऑस्ट्रेलिया व श्रीलंकेला हरवल्यानंतर झिम्बाब्वेला भारतात सर्वत्र संघर्ष करावा लागला आहे.

वानखेडे व चेपॉक येथे खेळपट्टीवर सलग पराभव पत्करावा लागल्याने झिम्बाब्वे उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला. तरीही ते विजयाने आपल्या मोहिमेचा विजयाने शेवट करू इच्छित आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारताला उपांत्य फेरीसाठी विजयाची गरज

♦ **कोलकाता, २८ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी सायंकाळी ईडन गार्डन्स स्टेडियमवर गतविजेता भारत आणि वेस्ट इंडीजदरम्यान अखेरचा सुपर एट सामना खेळला जाणार आहे. हा सामना म्हणजे उपांत्यपूर्व सामन्याप्रमाणेच आहे, जो संघ जिंकेल त्या संघाचे उपांत्य फेरीत स्था निश्चित होईल. अर्थात, विजेता संघ अंतिम चारमध्ये पोहोचेल, तर पराभवामुळे एका संघाची मोहीम संपुष्टात येऊ शकते.

गत सामन्यात झिमाब्वेविरुद्धच्या सामन्यात अव्वल फळीतील फलंदाजांनी फॉर्म पुन्हा मिळवल्यानंतर भारताने नव्या आत्मविश्वासाने खेळ सुरू केला आहे, त्यामुळे स्पर्धेच्या महत्त्वाच्या टप्प्यावर गती मिळाली आहे.

दरम्यान, वेस्ट इंडीज संघ २०१६ च्या ऐतिहासिक विजयाच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्याच ठिकाणी पोहोचला आहे आणि त्यांच्या धडाकेबाज फलंदाजीच्या खोलीने गंभीर धोका निर्माण केला आहे. दोन्ही संघांमध्ये विसंगत कामगिरी होत आहे, त्यामुळे हा सामना दबावाने भरलेला सामना असेल. ईडन गार्डन्समध्ये फलंदाजीसाठी अनुकूल मैदान व संभाव्य ढगाळ वातावरण असण्याची अपेक्षा असल्याने, दोन मजबूत संघादरम्यान चुरशीचा व सर्वोच्च धावसंख्येचा टी-२० सामना होण्याची शक्यता आहे.

ईडन गार्डन्स येथे होणाऱ्या सामन्यासाठी कोलकातामध्ये स्वच्छ आणि उबदार हवामान अपेक्षित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सामन्याच्या वेळेत तापमान २४ ते ३० अंशा दरम्यान राहील, पावसाचा अंदाज नाही आणि बहुतेकदा आकाश स्वच्छ राहील. सायंकाळी आर्द्रतेची पातळी वाढण्याची शक्यता आहे, त्यामुळे खेळाच्या नंतर दव पडण्यास मदत होऊ शकते.

◂(वृत्तसंस्था)





सूर्यकुमार यादव शाय होप

**आजचे सुपर एट सामने**

**दक्षिण आफ्रिका वि. झिम्बाब्वे**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता
**वेळ** : सायं. ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**गट १ ची सद्यः गुण स्थिती**

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेटरनरेट |
|---|---|---|---|---|---|
| दक्षिण आफ्रिका | २ | २ | ० | ४ | २.८९० |
| वेस्ट इंडीज | २ | १ | १ | २ | १.७९० |
| भारत | २ | १ | १ | २ | ०.१०० |
| झिम्बाब्वे | २ | ० | २ | ० | -४.४७५ |

# इराणवर अमेरिकेच्या हल्ल्यानंतर आयसीसीची खेळाडूंसाठी पर्यायी विमानसेवेसाठी धडपड

♦ **दुबई, २८ फेब्रुवारी**

आयसीसी भारत आणि श्रीलंकेतील टी-२० विश्वचषकातून परतणाऱ्या खेळाडू आणि अधिकाऱ्यांसाठी पर्यायी विमान योजनांवर काम करत आहे, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) इराणवर अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे झालेल्या व्यत्ययादरम्यान शनिवारी सांगितले.

७ फेब्रुवारी रोजी सुरू झालेला या टी-२० विश्वचषकाची सांगता ८ मार्च रोजी होणार आहे. यात २० संघांचा समावेश होता, त्यापैकी सहा संघ अजूनही स्पर्धेत आहेत, यात सह-यजमान भारताचाही समावेश आहे.

आमच्या स्पर्धेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची सुरक्षितता आणि कल्याण ही आयसीसीची सर्वोच्च प्राथमिकता आहे. आम्ही आधीच आमचे प्रवास, लॉजिस्टिक्स आणि सुरक्षा पथके एकत्रित केली आहेत आणि सर्व भागधारकांना कमीत कमी व्यत्ययासह सुरक्षितपणे घरी परतता यावे यासाठी आम्ही रात्रंदिवस काम करत आहोत, असे आयसीसीच्या प्रवक्त्याने म्हटले आहे.

आम्ही आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकासाठी प्रवास केलेल्या किंवा प्रवास करण्याची योजना आखणाऱ्या चाहत्यांनाही पुढील आंतरराष्ट्रीय प्रवास करण्यापूर्वी बारकाईने निरीक्षण करण्याचे व जारी केलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आणि सर्व घटकांचा विचार करण्याचे आवाहन करतो.

खेळाडू, संघ व्यवस्थापन, सामना अधिकारी, प्रसारण संघ आणि कार्यक्रम कर्मचारी यासह मोठ्या संख्येने कर्मचारी - स्पर्धेत आपल्या वचनबद्धतेनंतर त्यांच्या मायदेशी प्रवासासाठी गल्फ हब विमानतळांवर, विशेषतः दुबईवर अवलंबून असतात.

शनिवारी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर मोठा हल्ला चढवला, यात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणी जनतेला १९७९ पासून राष्ट्रावर राज्य करणाऱ्या इस्लामिक नेतृत्वाला उलथवून टाकण्याचे आवाहन केले.

◂(वृत्तसंस्था)

### गुकेशचा फॉरेस्टकडून पराभव; अरविंदची परहमशी बरोबरी

**प्राग** : २०२६ प्राग बुद्धिबळ महोत्सव मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत शनिवारी जागतिक विजेता गुकेश डोम्मराजूला ग्रॅण्डमास्टर जॉर्डन व्हॅन फॉरेस्टकडून पराभव पत्करावा लागला.

इतर सामने अनिर्णीत राहिल्यानंतर, व्हॅन फॉरेस्टने ग्रॅण्डमास्टर नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह, नोदिरबेक याकुबबोएव आणि डेव्हिड नवारा यांच्यासह पहिल्या स्थानासाठी अंतिम चारमध्ये प्रवेश केला.

व्हॅन फॉरेस्ट आता आघाडीवर आहे, तर गुकेश शेवटच्या स्थानासाठी चार-मार्गी टायमध्ये पडला आहे. तथापि, अजूनही सहा फेऱ्या शिल्लक आहेत. या विजयासह, व्हॅन फॉरेस्टने एक दिवस आधी गमावलेले सर्व रेटिंग गुण परत मिळवले, तर गुकेश जागतिक क्रमांक १३ वर घसरला, आता तो ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदशी बरोबरीत आहे.

# आमच्याकडे हिरो नव्हते, पण सर्वच हिरो झाले

## जम्मू-काश्मीर प्रशिक्षक अजय शर्मा यांचे प्रतिपादन

♦ **हुबळी, २८ फेब्रुवारी**

हा संघ, जम्मू-काश्मीर क्रिकेट संघटना व सर्व जम्मू-काश्मीर लोकांसाठी अभिमानाचा क्षण आहे. मी कधीही विचार केला नव्हता की आम्ही रणजी करंडक जिंकू शकू, पण हे स्वप्न सत्यात उतरले आहे. आमच्या संघात आमच्याकडे हिरो नव्हते, पण या विजयाने सर्वच हिरो झाले. आम्ही खूप आनंदी आहोत. हा एक दीर्घ पण सुखद प्रवास आहे, असे जम्मू-काश्मीर क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक अजय शर्मा यांनी शनिवारी सांगितले.

रणजी करंडक विजयामुळे जम्मू-काश्मीरला नवीन क्रिकेट हिरो शोधण्यास मदत झाली आहे, असेही ते म्हणाले.

शर्मा यांच्या मार्गदर्शनाखालील संघाने येथे पहिल्या डावात २९१ धावांची आघाडी घेऊन आठ वेळा विजेत्या कर्नाटकवर मात करून प्रतिष्ठेच्या रणजी करंडक स्पर्धेत आपले पहिले विजेतेपद पटकावले.

आमचा संघ मुंबई, दिल्ली, बंगाल, मध्यप्रदेश, हैदराबाद, राजस्थान विरुद्ध खेळो. ते सर्व माजी विजेते होते, भरपूर अनुभव आणि कसोटी क्रिकेटपटू होते. आमच्याकडे त्यांच्यासारखा हिरो नव्हता, पण सगळेच हिरो झाले आहेत, असे ते म्हणाले.

या खेळाडूंनी जम्मू-काश्मीरच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, ते आता हिरो झाले आहेत. त्यांना पूर्वी केवळ आयपीएल खेळूनच आपण हिरो आहोत असे वाटायचे. पण जेव्हा तुम्ही ही ट्रॉफी जिंकता तेव्हा तुमचे नशीब उघडते. आता आकाशच मर्यादा आहे. आता, त्यांना या करंडकाचे मूल्य समजते, असे ते म्हणाले.

पण जम्मू-काश्मीर अंतिम फेरीपूर्वी काही तणावपूर्ण क्षणांमधून गेला, कारण फॉर्ममध्ये असलेल्या शुभम खजुरिया आणि वंशराज शर्मा यांना दुखापतीमुळे बेंचवर बसावे लागले. मात्र कामरान इक्बाल व विव्रांत शर्मा असे सक्षम पर्यायी खेळाडू मिळाले.




अजय शर्मा

सामन्याच्या एक दिवस आधी, आमचे दोन मुख्य खेळाडू, सातत्यपूर्ण कामगिरी करणारा शुभम व वंशराजला बाहेर काढण्यात आले. आम्ही काय करावे याबद्दल गोंधळलो होतो. पण शेवटी, आम्हाला विव्रांत व इक्बालला बोलावावे लागले, असे त्यांनी सांगितले.

इक्बाल... या खेळाडूला सलाम. त्याला रात्री ११.३० वाजता विमान पकडावे लागले आणि तो सकाळी ६ वाजता येथे आला. पण त्याने दुसऱ्या डावात संघासाठी काय करू शकतो हे दाखवून दिले. तो एक सामना जिंकणारा खेळाडू आहे. त्याची स्वतःची शैली आहे, पण ती नेहमीच आपल्यासाठी काम करते, असे त्यांनी सांगितले.

◂(वृत्तसंस्था)

# भारतीय संघाने जम्मू-काश्मीरकडून प्रेरणा घ्यावी : सैकिया

♦ **हुबळी, २८ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषकात रविवारी दोन वेळच्या विजेत्या वेस्ट इंडीजविरुद्धचा भारताचा शेवटचा सुपर एट सामना अतिशय महत्त्वाचा आहे. या सामन्यासाठी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ सज्ज असला तरी त्यांनी प्रथमच रणजी करंडक विजेत्या जम्मू-काश्मीर संघाकडून प्रेरणा घ्यावी, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव देवजित सैकिया म्हणाले.

घेण्यास सांगितले आहे, ज्यांनी त्यांचे पहिले रणजी करंडक

शनिवारी हुबळी क्रिकेट मैदानावर जम्मू-काश्मीरने आठ वेळा विजेत्या कर्नाटकविरुद्ध पहिल्या डावात मोठ्या आघाडीच्या आधारे रणजी करंडक २०२५-२६ चे विजेतेपद जिंकून इतिहास रचला.

जम्मू-काश्मीरने स्वतःवर विश्वास ठेवला व बलाढ्य कर्नाटकला



देवजित सैकिया

हरवले त्याचप्रमाणे भारत वेस्ट इंडीजविरुद्धचा त्यांचा करो या मरो सामना जिंकू शकतो व देशाला अभिमान वाटू शकतो, असेही ते म्हणाले.

रविवारचा दिवस देशासाठी मोठा आहे. आज, जम्मू-काश्मीरने कर्नाटकला, एका बलाढ्य आणि मोठ्या संघाला त्यांच्या घरच्या मैदानावर हरवले. क्रिकेटमध्ये काहीही शक्य आहे असा संदेश त्यांनी या सामन्यातून दिला. रविवारी कोलकातामध्ये, हा भारतासाठी उपांत्यपूर्व सामन्यासारखा, करा किंवा मरोचा सामना असेल. म्हणून आमचे सर्व खेळाडू आपले सर्वोत्तम प्रयत्न करतील जेणेकरून देशाला त्यांच्या कामगिरीचा अभिमान वाटेल, असे सैकिया म्हणाले. भारत आणि वेस्ट इंडिज दोघांसाठीही उपांत्य फेरीचे समीकरण सोपे आहे. या सामन्यातील विजेता दक्षिण आफ्रिकेसह पुढील फेरीत प्रवेश करेल, त्यांनी आधीच गट अ मधून आपले स्थान निश्चित केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### शाह प्रशालेत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**बार्शी दि. २८ फेब्रुवारी**

विज्ञान दिनाच्यानिमित्ताने विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करावा व विज्ञान विषयातील भविष्यातील संधीची माहिती द्यावी, असे विचार प्रा किरण देशमुख इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय बार्शी यांनी प्रशालेत आयोजित विज्ञान प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. संदेश घाडगे यांनी प्रास्ताविक केले. कु सिद्धी बोराडे, भक्ती लोलापोड, हर्षदा कसबे यांनी शास्त्रज्ञ व त्यांनी लावलेले शोध याबद्दल माहिती दिली. विद्यार्थिनींनी विज्ञान विषयातील विविध प्रतिकृती,, उपकरणे, पोस्टर्स, स्लाईडस, यांची आकर्षक मांडणी केली होती. मुख्याध्यापिका शुभदा जोशी, सोमनाथ पाटील, फातिमा महेदवी, शुभम लोकरे यांनी प्रयोग मांडणी करुन विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्था सचिव चिन्मय वालवडकर, संचालिका वैष्णवी हातोळकर यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### निंबोणीत ३५ वर्षीय महिलेचा विनयभंग; आरोपी विरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. २८ फेब्रुवारी**

तुझ्या नवऱ्याकडे असलेल्या पैशात तूच माझ्यासोबत चल असे एका ३५ वर्षीय विवाहितेस म्हणत जवळ ओढून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी ज्ञानेश्वर धोंडाप्पा येडवे (रा. निंबोणी) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार फिर्यादी ३५ वर्षीय महिला असून तिच्या पतीने आरोपीकडून पाच वर्षापूर्वी दहा हजार रुपये उसणे घेतले होते, ते त्यांना ठरलेल्या वेळेत परत केल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. दि.२५ फेब्रुवारी रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादीचे पती यांना आरोपीने फोन करुन माझे तुझ्याकडे पैसे राहिलेले आहेत ते तू मला दे असे म्हणून शिवीगाळी करुन जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत दुपारी ३.४५ वाजता मंगळवेढा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी येत असताना पोलीस ठाण्यामागील खाडे यांच्या चहा कँटीन समोर फिर्यादी व तिचा पती थांबले असता आरोपीने जवळ येवून तु माझे विरुध्द तक्रार दिली तर तुला गावाकडे आल्यानंतर दाखवतो अशी धमकी देवून फिर्यादीच्या पतीच्या अंगावर मारहाण करण्यास धावून आला. त्यावेळी फिर्यादीने आरोपीस अडविले असता आरोपीने फिर्यादीच्या उजव्या हातास पकडून तुझ्या नवऱ्याकडे असलेल्या पैशात तूच माझ्या सोबत चल असे म्हणून जवळ ओढून फिर्यादीच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### सभामंडपातील चित्रे सुरक्षित; मंदिर समितीचा खुलासा

**मंगळवेढा, दि. २८ फेब्रुवारी**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या मंदिरांचा जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासनाच्या निधीतून पुरातत्व विभागामार्फत माहे डिसेंबर २०२३ पासून हाती घेण्यात आलेली आहेत. मंजूर आराखड्यानुसार कामे टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, बाजीराव पडसाळी तसेच विठ्ठल सभामंडप येथील जतन व दुरुस्तीची कामे पूर्णत्वास आली आहेत. सध्या श्री रूक्मिणी सभामंडप तसेच इतर अनुषंगिक भागांमध्ये जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत. श्री रूक्मिणी सभामंडपामध्ये श्री रूक्मिणी स्वयंवराची ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेली चित्रे पूर्वी स्थापित करण्यात आलेली होती. तथापि, सभामंडपातील संरचनात्मक दुरुस्ती व संवर्धनाची कामे सुरू असताना चित्रांचे कोणतेही नुकसान होऊ नये, तसेच त्यांची मूळ अवस्था सुरक्षित राहावी यासाठी संबंधित चित्रे तात्पुरत्या स्वरूपात काळजीपूर्वक काढून सुरक्षित स्थळी संरक्षित करून ठेवण्यात आली आहेत. चित्रांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन, सभामंडपातील कामे पूर्ण झाल्यानंतर सदरची ऐतिहासिक चित्रे मूळ ठिकाणी पूर्ववत पद्धतीने पुन्हा स्थापित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## निधन वृत्त...

### शिवाजीराव लिगाडे



**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यातील बलवडी गावचे माजी सरपंच व सोलापूर जिल्ह्याचे माजी होमगार्ड प्रमुख शिवाजीराव नानासाहेब लिगाडे (सरकार) (वय-८१) यांचे शनिवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. स्व.शारदादेवी (काकी) साळुंखे-पाटील यांचे ते लहान बंधू तर माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांचे ते मामा होत.

### संपताबाई सुडके



**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

येथील श्रीमती संपताबाई सुडके (वय-८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर पंढरपूर येथील वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांच्या त्या मातोश्री होत.

### दाक्षायणी मेणसिनकाई



**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

विजापूर रोड, सोलापूर येथील रहिवासी डॉ. सतीश मगाई यांच्या सासू, तथा स्त्रीरोग तज्ञ डॉ. सौ. नंदा मगाई यांच्या मातोश्री, हुबळी येथील रहिवासी दाक्षायणी ईश्वरप्पा मेणसिनकाई यांचे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, दोन मुले, सून, नातवंडे असा परिवार आहे.

## मोहोळ नगरपरिषदेचा शिलकी अर्थसंकल्प सादर

# १०४ कोटी ९५ लाख ६४९ रूपयांच्या तरतुदीस मंजूरी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२८ फेब्रुवारी-**

मोहोळ नगर परिषदेच्या यंदाच्या निवडणुकीनंतरचा पहिला अर्थसंकल्प युवा नगराध्यक्षा सिद्धी वस्त्रे यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला. त्यामध्ये २०२५-२०२६ च्या सुधारित २ लाख ४७ हजार रुपये शिलकी अंदाजपत्रकासह १०४ कोटी ९५ लाख ९२ हजार ६४९ रुपयांच्या तरतुदीस मंजूरी देण्यात आली. सदरचा ठराव नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांचे मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे यांनी दिली.

मोहोळ नगर परिषदेच्या थेट नगराध्यक्षपदासह २० नगरसेवकाची निवडणूक नुकतीच पार पडली या निवडणुकीमध्ये नगराध्यक्षपदी शिंदे सेनेच्या सिद्धी वस्त्रे निवडून आल्या. २० पैकी ११ नगरसेवक हे भाजपाचे निवडून आले. उर्वरित ८ नगरसेवक शिंदे सेनेचे असून उबाठा सेनेच्या एका नगरसेवकाने शिंदे सेनेला पाठिंबा दिल्याने शिंदे सेनेचे बालबल ही आता १० झाले आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर पहिल्याच घेण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय बजेटच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सिद्धी वस्त्रे या होत्या.




यावेळी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी डॉ. योगेश डोके ,उपनगराध्यक्ष दत्तात्रेय खवळे, भाजपाचे गटनेते सतीश काळे, शिंदे सेनेचे गटनेते रमेश बारसकर, सार्वजनिक बांधकाम सभापती अझरुद्दीन कुरेशी, नगरसेवक प्रमोद डोके, चैतन्य देशमुख, कुंदन धोत्रे, विक्रम फडतरे, लखन कोळी, अजय कुर्डे, दौलतराव देशमुख, सुशीलकुमार क्षीरसागर, स्वप्नाली जाधव, सपना अष्टुळ, साखरबाई बरकडे, शाहिस्ता शेख, वंदना सुरवसे, शहनाज तलफदार, राणी गोडसे, सरताज सय्यद, आरती गाढवे, भारती बरे यांच्यासह नगर परिषदेचे कर निरीक्षक शिवरत्न अतकर,लेखापाल विनोद जोगदंड, विद्युत अभियंता विजयकुमार बोंदर, कार्यालयीन अधीक्षक प्रियांका गोरे, सहाय्यक कर निरीक्षक स्वरांजली सावंत उपस्थित होते. या अंदाजपत्रकामध्ये प्रामुख्याने नगरपालिका दर व कर यापासून मिळणारे उत्पन्न विशेष अधिनियमाखालील वसुली नगरपालिकेच्या मालमत्ता व उपयोगिता सेवा पासून प्राप्त महसूल कर व आकारणी व्यतिरिक्त उत्पन्न इतर संकीर्ण प्राप्त अनुदाने व अंशदाने राज्य सरकार व केंद्र सरकार व इतर आदी गोष्टीचा सहभाग असेल.



निवडणुकीनंतर नगरपरिषदेची मासिक मीटिंग २७ फेब्रुवारी रोजी बोलाविण्यात आली आहे. या पहिल्याच बैठकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक ते रेल्वे स्टेशन रस्ता व ड्रेनेज करणे, कै. देशमुख यांचा पुतळा नगरपालिके समोर बसविणे, मोहोळ शहरातील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील चौकातील छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसविणे बाबत चर्चा करून निर्णय घेणे आणि हा पुतळा बसविण्यासाठी नगरपरिषदेकडून ना हरकत दाखला देणे याबाबत चर्चा करून निर्णय घेणे, मोहोळ नगरपरिषद हद्दीतील जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक शाळा नगर परिषदेच्या ताब्यात घेणेबाबत विचार करणे, मोहोळ नगर परिषदेच्या इमारतीचे बांधकाम करणे या बांधकाम विभागाकडील कामाच्या निविदा दर पत्रकास मंजुरी देणे आदि विषय घेण्यात आले.



## ब्रह्माकुमारी केंद्रात राजयोग तपस्या कार्यक्रमाचे उद्घाटन

### रचनात्मक योगसाधनेला २५ कुमारांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**

सोलापूर उपक्षेत्रातील बालब्रह्मचारी तपस्वी कुमरांसाठी ब्रह्माकुमारीज बार्शी सेवा केंद्रात आयोजीत द्विदिवसीय राजयोग तपस्या कार्यक्रम (योग भट्टी) चे उद्घाटन वक्ता ब्र. कु. राजीव गुप्ता यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाले.

यावेळी सेवाकेंद्र संचालिका संगीता दिदी, सोलापूर उपक्षेत्रातील राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी भगिनी उपस्थित होते. वक्ते व सर्व राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी भगिनींचे व तपस्वी कुमारांचे संगीता दिदी व निशा दिदींनी तिलक, पुष्पगुच्छ व प्रसाद देऊन स्वागत केले. संगीता दिदी यांनी स्वागतपर मनोगत मांडले. सर्व कुमारांनी स्वतःला शक्तीच्या खजिन्यांनी संपन्न करावे. विद्यालयाचे साकार संस्थापक आदिपिता ब्रह्माबाबांसारखे जीवन बनवण्याचा निश्चय करावा असे अवाहान केले. राजीव गुप्ता म्हणाले, मनात जशा भावना असतात तशा शरीरात संवेदना निर्माण होतात.

संकल्पाची गती कमी करून शांतीचा अनुभव घेणे, मनोबल वाढवणे हा या तपस्या कार्यक्रमाचा उद्देश आहे. त्यांनी क्रिएटिव्ह मेडिटेशनचे (रचनात्मक योगसाधना) विविध प्रयोग करवून घेतले. अगदी फलाहार सेवनालाही क्रिएटिव्ह मेडिटेशनचे रूप दिले. पहिल्या दिवशी सोलापूर उपक्षेत्रातील ५० पैकी २५ कुमारांनी हजेरी लावली. राजयोग भवनातील स्वच्छता, शांत वातावरण व सुव्यवस्थित नियोजना मुळे कुमारसेना भारावली.

## तडवळच्या 'ओंकार'ने केला ६.८१ लाख मे.टन ऊस गाळप



### यंदाच्या हंगामाची झाली सांगता

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.२८ फेब्रुवारी**

तालुक्यातील तडवळ येथील ओंकार कारखान्याने यंदाच्या हंगामात ६.८१ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करत हंगामाची सांगता केली. सांगता समारंभास संचालक ओमराजे बाबुराव बोत्रे-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या हंगामात कारखान्याने उल्लेखनीय कामगिरी करत ६.८१ लाख मेट्रिक टन ऊस गाळप केला.

त्यातून १०.८६ टक्के सरासरी उतारा मिळाला. यंदा ४.४२ कोटी युनिट वीज निर्मितीसह २.८० कोटी युनिट वीज निर्यात केली आहे. सांगता कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतूक ठेकेदार, कारखान्याचे जनरल मॅनेजर व्हि.एम.गायकवाड व सर्व खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मेथवडे येथील सह्याद्री फार्मसीचे श्रमसंस्कार शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२८ फेब्रुवारी -**

मेथवडे (ता.सांगोला) येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मेडशिंगी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले.

शिबिराचे उदघाटन मेडशिंगी पीचसीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.पूनम बाबर, सरपंच उमा इंगवले, पं.स.सदस्य पूनम इंगवले, माजी सरपंच अमर गोडसे, माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष प्रभाकर कसबे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सतीश राऊत, डॉ.विजय इंगवले, डॉ. प्रमोद जाधव, पोलीस पाटील संतोष इंगवले, संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजित इंगवले, प्रमोद इंगवले, ऋतुजा कुलकर्णी, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतीश राऊत, प्रभाकर कसबे यांनी मनोगत व्यक्त केले. जनजागृती रॅली काढत विद्यार्थ्यांनी घोषणा व फलकाद्वारे सामाजिक, आरोग्य, व्यसनमुक्ती, पर्यावरण रक्षण संबंधीत जनजागृतीचा संदेश दिला. पथनाट्याद्वारे आरोग्याचे महत्व विशद केले. रॅलीनंतर मोफत आरोग्य तपासणीत उपस्थित सर्व नागरिकांचे व विद्यार्थ्यांचे संपूर्ण रक्त तपासणी, रक्त गट तपासणी, शरीर वस्तुमान निर्देशांक या तपासण्या मोफत करण्यात आल्या. सत्रात चिंच, पिंपळ, वड, आपटा, सागया रोपांचे रोपण करण्यात आले. परिसर स्वच्छतेने शिबिराची सांगता झाली. कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा.एस. पी.जोकार, प्रा.ए.व्ही.सपाटे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच महालॅबचे व पीचसी मेडशिंगीचे सर्व कर्मचारी यांचे योगदान लाभले.

## गोरमाळेत दोन गटात हाणामारी; दोन वृध्द गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.२८ फेब्रुवारी-**

गोरमाळे (ता.बार्शी) येथे शेतीच्या वादातून आणि शेळ्या पिकात गेल्याच्या कारणावरून दोन गटांत झालेल्या हाणामारीत लोखंडी गज, दगड आणि चाकू हल्ला होऊन गोरखनाथ कोरडबा कसपटे (वय ७५) आणि नवनाथ मल्हारी कसपटे (वय ७१) हे दोघे गंभीर जखमी झाले. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली.

पांगरी पोलीस ठाण्यात दोन्ही गटांनी परस्परविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही जखमींवर रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. पहिली बाजू : गोरखनाथ कसपटे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ च्या सुमारास त्यांच्या शेळीच्या पिलाचा ओरडण्याचा आवाज आला. शेजारील शेतात काम करणाऱ्या धनश्री नितीन आरगडे यांनी पिलाला दगड मारल्याचे दिसले. जाब विचारल्यावर धनश्री यांनी नवनाथ मल्हारी कसपटे यांना बोलावून घेतले. नवनाथ कसपटे हे अन्य ५-६ जणांसह पांढऱ्या रंगाच्या गाडीतून (क्रमांक-७७५७) आले. गोरख्याला जिवंत सोडायचे नाही, असे म्हणत त्यांनी गोरखनाथ यांच्या डोक्यात लोखंडी गजाने वार करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा मुलगा सुधीर याच्या हाताला दुखापत झाली. त्यानंतर माणिक हजारे आणि रवींद्र कसपटे यांनी केलेल्या मारहाणीत गोरखनाथ गंभीर जखमी झाले. सध्या त्यांच्यावर धाराशिव येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दुसरी बाजू : नवनाथ मल्हारी कसपटे यांच्या फिर्यादीनुसार, त्यांच्या शेतात सुधीर कसपटे यांच्या शेळ्या आल्याने मॅनेजर धनश्री आरगडे यांनी त्यांना हाकलले होते. त्यावरून सुधीरने शिवीगाळ केली.ही माहिती मिळताच नवनाथ कसपटे शेतात गेले. यावेळी सुधीर कसपटे याने टाकलेली विद्युत करंट असलेली केबल पाहण्यासाठी नवनाथ गेले असता सुधीर, ललिता आणि चंद्रराणी कसपटे यांनी त्यांच्यावर हल्ला केला. सुधीरने लोखंडी गजाने डोक्यात मारून गंभीर जखमी केले, तर गोरख कसपटे याने चाकूने नाकावर वार केल्याचा आरोप नवनाथ यांनी केला आहे. त्यांच्यावर बार्शी येथील जगदाळे मामा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन्ही गटांत २०१७ पासून वाद सुरू असून, आतापर्यंत त्यांच्यात २५ ते ३० कोर्ट केसेस सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. पांगरी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

## पंढरपुरात व्याख्यानांसह सांगितिक कार्यक्रमातून स्वा.सावरकरांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ फेब्रुवारी -**

स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांची पुण्यतिथी व्याख्यानमाला येथील सावरकर प्रेमी मंडळ आणि सावरकर वाचनालय यांच्या वतीने साजरी करण्यात आली. सावरकर पुण्यतिथी निमित्त येथील सावरकर चौकातील वि.दा.सावरकरांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे पूजन देखील मोठ्या भक्तीमय वातावरणात करण्यात आले. सावरकरांच्या विचाराने प्रेरित झालेली ही व्याख्यानमाला गेली ६० वर्ष त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि साहित्याचा प्रचार विविध व्याख्यानमालेच्या माध्यमातून करीत असते. यावर्षी मंगळवार (दि.२४) ते गुरुवार (दि.२६ ) दरम्यान व्याख्यानमाला झाली.



पहिले पुष्प पुण्याचे युवा व्याख्याते मयूर भावे यांनी महायोगी अरविंद या विषयावर गुंफले. अध्यक्षस्थानी मोहन मंगळवेढेकर होते. प्रास्ताविक आणि व्याख्यात्यांचा परिचय डॉ.मिलींद जोशी यांनी करुन दिला. श्री.भावे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत महायोगी अरविंद यांचे जीवनचरित्र सांगितले. व्याख्यानाचा समारोप मंडळाचे ज्येष्ठ संचालक शांताराम कुलकर्णी यांनी केला. व्याख्यात्यांचा सत्कार मोहन मंगळवेढेकर यांनी केला. दुसरे पुष्प बुधवारी (दि. २५) पुण्याच्या श्वेता काजळे यांनी प्राचीन भारतीय विद्यापीठे या विषयावर गुंफले. काजळे यांनी दृकश्राव्य माध्यमातून भारतीय प्राचीन विद्यापीठांविषयी अत्यंत अभ्यासपूर्ण माहिती दिली. प्राचीन भारतीय विद्यापीठे ही जगाची ज्ञानकेंद्रे होती. जगभरातून अनेक लोक या विद्यापीठात शिकत असत. विद्यापीठातील शिक्षण पद्धती, प्रवेश प्रक्रिया अशा अनेक बाबीवर त्यांनी आपल्या व्याख्यानातून प्रकाश पाडला. समारोपीय भाषण तुकाराम चिंचणीकर यांनी केले. त्यांनीही प्राचीन भारतीय विद्यापीठांचा आढावा घेतला. व्याख्यानासाठी पंढरपूरकरांनी गर्दी केली होती.

दरम्यान येथील सावरकर क्रांती मंदिरात सायंकाळी सहा वाजता प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक यांचा एक सर अनेक सूर हा देशभक्तीपर सांगितिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मिलिंद जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मीराताई परिचारक यांनी केले. प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक यांनी विविध सत्तावीस वाद्यांवर काही देशभक्तीपर गीत सादर केली. अनेक वाद्यावरचे त्यांचे प्रभुत्व रसिकांना पाहायला मिळाले. सुमारे दीड तास हा कर्णमधुर कार्यक्रम उस्फुर्तपणे पार पडला. सोबतीला सौ.मीराताई परिचारक यांची सुंदर अशी निवेदन शैली ऐकायला मिळाली. कार्यकमाचा समारोप मंडळाचे संचालक शांताराम कुलकर्णी यांनी अतिशय समयोचितपणे केला. प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक आणि मीरा परिचारक यांचा सत्कार करण्यात आला.

**पुण्यतिथीनिमित्त सावरकरांच्या पुतळ्याचे पुजन**

सावरकरांच्या पुण्यतिथी निमित्त सावरकर चौकातील पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी आदर्श प्राथमिक विद्यालयातर्फे जयोस्तुते हे सावरकर गीत गाऊन स्वातंत्र्यवीरांना आदरांजली वाहिली. स्वातंत्र्यवीर सावरकराच्या पूर्णकृती पुतळ्याचे पूजन मंडळाचे अध्यक्ष मोहन मंगळवेकर, हिंदू महासभेचे नेते अभय इचगावकर, सावरकर प्रेमी मंडळाचे सर्व संचालक, पंढरपूर शहरातील अनेक सावरकर भक्त, नगरसेवक ओंकार जोशी, नगरसेवक सौरभ थिटे इत्यादी मान्यवर यांच्या उपस्थितीत पुतळा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संकेत कुलकर्णी यांनी केले.

**अभ्यासकेंद्रातील विद्यार्थ्याला आर्थिक मदत**

कार्यक्रमाच्या प्रारंभी अभ्यासकेसाठी आणलेले वातानुलुकलीत यंत्रांचे पूजन प्राचार्य मिलिंद परिचारक व त्यांच्या सौभाग्यवती मीराताई परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सावरकर प्रेमी मंडळाचे हितचिंतक स.धो.कुलकर्णी यांनी सावरकर प्रेमी मंडळ चालवीत असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्रातील तुषार मोरे या होतकरू विद्यार्थ्याला त्यांनी आर्थिक मदत दिली. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.






# ‘माझी बाहुली आज वासनेची बळी पडली...’

- अकलूज येथे राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला दिमाखात प्रारंभ
- छक्कड लावणीने जिंकली प्रेक्षकांची मने
- कलाकार टाळ्यांचा भुकेला असतो

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२८ फेब्रुवारी-**

सहकार महर्षी स्व.शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०८ व्या जयंती निमित्त सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत ‘माझी बाहुली आज वासनेची बळी पडली...’ या छक्कड लावणीने प्रेक्षकांची मने जिंकली. सुलक्षणादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करुन या स्पर्धेला दिमाखात प्रारंभ करण्यात आला. शंकरनगर येथील स्मृतिभवन येथे दि.१ मार्च २०२६ पर्यंत ही स्पर्धा चालणार असल्याचे संयोजकांकडून सांगण्यात आले.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, सुमित्रादेवी खानविलकर, स्पर्धा समितीच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील, सहकार महर्षी लावणी कलावंत पुरस्कर्ते रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर, पांडुरंग घोटकर यांच्यासह सुरेखा पवार, कल्याणी घावरे, अनिता डवरी, डॉ.अशोकराव जाधव, किसनराव जाधव, सुरेश हरगुडे, भरत पालवे, संदीप चंदन, रुपा परभणीकर उपस्थित होते.

जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, कलाकार हा टाळ्यांचा भुकेला असतो. आपली सादर करा करताना कलाकाराला कष्ट घ्यावे लागतात. पूर्ण तयारी शिवाय तो स्टेजवर उतरू शकत नाही. स्वरुपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, सहकार महर्षींचे अमृत महोत्सवी जयंती वर्षापासून राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जुनी पारंपारिक कला जतन करण्याचा हा प्रयत्न आहे. यामध्ये पारंपारिक कलाकारांचे व रसिकांचे मोठे योगदान आहे.

### ‘अलंकार’ला पहिला मान

स्पर्धेच्या प्रारंभी सादरीकरणाचा पहिला मान अलंकार सांस्कृतिक कला केंद्र ग्रुप पार्टी सुपा, अहिल्यानगर या संघाला मिळाला. त्यांनी सादर केलेल्या सर्वच लावण्याला रसिकांनी दाद दिली. या पार्टीने अतिशय सुंदर मुजरा केला गवळण तर अप्रतिम केली लावणीचे सादरीकरण केले.

### दमदार सादरीकरण

गीता अश्विनी, श्रुती वाईकर, रेणुका सांस्कृतिक कला केंद्र, गोकुळ शिरगाव कोल्हापूर, अपर्णा कीर्ती नगरकर, लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र सणसवाडी पुणे, वैशाली समसापुरकर जय अंबिका सांस्कृतिक कला केंद्र सणसवाडी पुणे, बेला श्रध्दा नेटूरकर, जयभवानी सांस्कृतिक कला केंद्र, पांढरीचा पूल, अहिल्यानगर या पार्ट्यांचे दमदार सादरीकरण झाले.

### अशी आहेत पारितोषिके

प्रथम क्रमांकास रुपये तीन लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख, तृतीय क्रमांकास रुपये एक लाख अशी बक्षिसे आहेत. तर उत्कृष्ट नृत्यांगना रुपये ५ हजार व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील स्मृती चषक, उत्कृष्ट अदा (वैयक्तिक) रुपये ५ हजार, उत्कृष्ट मुजरा रुपये ३ हजार, या शिवाय उत्कृष्ट ढोलकीपटू, उत्कृष्ट पार्श्वगायिका, उत्कृष्ट पेटीवादक, व उत्कृष्ट तबलावादक यांनाही वैयक्तिक पारितोषिक देण्यात येणार आहेत.



### उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची दैनिक तरुण भारत कार्यालयास भेट

**सोलापूर महानगरपालिकेच्या नूतन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर व मनोज देवकर यांनी तरुण भारत कार्यालयास शनिवारी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या स्वागताप्रसंगी उपस्थित मुख्य समूह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, लेखापाल रंजना घोडके आदी.**

## हरभरा खरेदीला हिरवा कंदील; आजपासून नोंदणीची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

केंद्र सरकारने हरभरा खरेदीस मंजुरी दिल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. देशभरात २३ लाख ७ हजार टन हरभरा खरेदीला मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी महाराष्ट्रासाठी ७ लाख ६१ हजार टन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात रविवार, १ मार्चपासून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी दिली आहे.

यंदा हरभऱ्याला प्रतिक्विंटल ५ हजार ८७५ रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला आहे. मात्र सोलापूर बाजारात सध्या स्थानिक हरभरा ४ हजार ८०० ते ५ हजार १४० रुपये दराने विकला जात आहे. म्हणजेच हमीभावापेक्षा ८५० ते १ हजार रुपयांनी कमी दर मिळत असल्याने शेतकरी सरकारी खरेदी केंद्रांच्या प्रतीक्षेत होते. सध्या बाजारात सुमारे ५५० क्विंटल हरभऱ्याची दररोज आवक होत आहे. सोलापूर जिल्ह्यात बार्शी, मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस, अक्कलकोट, करमाळा आणि कुर्डुवाडी या सात ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांवर खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे

नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आधार कार्ड, बँक पासबुक, चालू वर्षाचा सातबारा उतारा आणि पीकपेरा नोंद ही कागदपत्रे सादर करावीत. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मोबाईलवर एसएमएस पाठवण्यात येईल.

**आजपासून प्रक्रिया नोंदणी**

१ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत नोंदणी प्रक्रिया राबवली जाणार आहे.




## श्राविका गौरवसह आदर्श माता पिता, आदर्श पत्रकार, आदर्श रिक्षाचालक, आदर्श शिक्षक, गुणवंत बालक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

येथील श्री चतुरबाई श्राविका विद्यालयच्या वतीने आयोजित हरिस्मृती कार्यक्रमांतर्गत श्राविका गौरवसह आदर्श माता पिता, आदर्श पत्रकार, आदर्श रिक्षाचालक, आदर्श वर्ग, आदर्श गुणवंत बालक, योगपटू, स्वच्छतादूत, आदर्श उपक्रमशील वर्ग, आदर्श शिक्षक आदी पुरस्कारांचे थाटात वितरण करण्यात आले.

दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक नागेश येळे, पत्रकार विनोद कामतकर, श्राविका संस्थेच्या विश्वस्ता देवई शहा, जयश्री लोकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन व पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, संस्थेच्या विश्वस्ता देवई शहा यांनी मनोगत व्यक्त केले. या सोहळ्यासाठी संस्थेचे सचिव यतिन शहा, विश्वस्त करण शहा, अंजली शहा यांचे मार्गदर्शन मिळाले. मुख्याध्यापिका राखी देशमाने यांनी प्रास्ताविकातून शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला.

सुजाता काटकर व अरिहंत माणिकशेट्टी यांनी सूत्रसंचालन केले. प्रगती गांधी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. तृप्ती शहा यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाल मंदिर विभागाच्या मुख्याध्यापिका प्रांजली काटकर, व्यवस्थापन समितीचे सदस्य डेरे, सुरज व्हसाळे, शहा, सगरशेट्टी, कोले, पोस्ते आदींनी परिश्रम घेतले.

# गोरगरिबांची जीवनदायिनी योजना अडचणीत!

- २५ लाख लाभार्थी योजनेपासून वंचित
- सॉफ्टवेअर अपडेटमुळे रुग्णांचे हाल
- शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये वाढतेय गोंधळाची परिस्थिती

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

राज्यातील सर्वसाधारण जनतेच्या जीवनदायीनी असणारी तसेच महत्त्वाची मानली जाणारी महात्मा फुले जनआरोग्य योजना सध्या सॉफ्टवेअर अपडेटमुळे अडचणीत सापडली असून याचा थेट परिणाम रुग्णांवर होत आहे. केंद्र सरकारच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या तांत्रिक बदलांमुळे रुग्ण नोंदणी आणि क्लेम प्रक्रियेत विलंब होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यामुळे अति गंभीर व गंभीर उपचारांना विलंब होत आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सुमारे ४० लाख लाभार्थ्यांपैकी केवळ १५ लाख लाभार्थ्यांचे आयुष्यमान कार्ड काढण्यात प्रशासन यशस्वी झाले आहे. तर उर्वरित २५ लाख लाभार्थ्यांकडे आयुष्यमान भारत कार्ड नसल्याने महात्मा फुले योजनेच्या लाभापासून सुमारे २५ लाख लाभार्थी वंचित राहत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अपवादात्मक परिस्थितीत योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया राबवली जात आहे. परंतु, सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आलेल्या अद्ययावत बदलांनंतर अनेक रुग्णालयांना प्रणाली लॉग-इन, कागदपत्र अपलोड आणि मंजुरी प्रक्रियेत अडथळे येत आहेत. परिणामी, तातडीच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र शहरातील शासकीय व खासगी रुग्णालयात दिसून येत आहे.

दरम्यान, महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्वच नागरिकांसाठी एक वरदान ठरत आहे. कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी आरोग्याचा ५ लाखांचा विमा या योजनेतून उतरवण्यात आल्याने विविध रोगांसाठी नागरिकांना विमा कवच मिळणार आहे. यापूर्वी रेशन कार्ड आणि आधार कार्ड या दोन कागदपत्रांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळत असे, परंतु आता केंद्र व राज्य सरकारने आयुष्मान भारत कार्ड सक्तीचे केल्याने ज्या लाभार्थ्यांकडे हे कार्ड उपलब्ध नाही. त्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजने पासून वंचित राहावे लागत आहे. या योजनेअंतर्गत रुग्णांना मार्गदर्शन करणारे आरोग्य मित्र सुद्धा या तांत्रिक समस्यांमुळे त्रस्त झाले आहेत. प्रणाली वारंवार बंद पडणे, डेटा सेव्ह न होणे आणि मंजुरी प्रक्रियेत अडथळे येणे या कारणांमुळे त्यांच्यावर रुग्ण आणि नातेवाईकांचा रोष ओढवतो आहे. ज्या रुग्णांकडे आयुष्यमान भारत कार्ड नाही त्यांना आयुष्यमान भारत कार्ड काढणे बंधनकारक आहे. अशा परिस्थितीत जे रुग्ण आयुष्यमान कार्ड काढण्यास महा-ई-सेवा केंद्र तसेच आशा वर्कर यांच्याकडे जात असताना आधार कार्ड अपडेट असणे देखील महत्त्वाचे बनले आहे. परंतु काही लाभार्थ्यांना आधार कार्ड अपडेट नसल्याचा देखील दुष्परिणाम सहन करावा लागत आहे. जोपर्यंत आधार कार्ड अपडेट होत नाही. तोपर्यंत आयुष्यमान कार्ड काढले जात नाही. आयुष्यमान कार्ड काढल्यानंतरच या योजनेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना मिळत असल्याने, अशा परिस्थितीत वृद्ध तसेच अशिक्षित रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.

अशा परिस्थितीत शासन, प्रशासन तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजना कार्यान्वित असलेल्या संबंधित हॉस्पिटल्स देखील याकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे रुग्णांची तसेच त्यांच्या नातेवाईकांची खूप मोठी परवड होताना दिसत आहे. अनेक खासगी व शासकीय रुग्णालयांनी तांत्रिक अडचणींसमोर केल्यामुळे उपचार प्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे सांगितले आहे. अपडेटपूर्वी योग्य प्रशिक्षण व चाचणी न झाल्याने हा गोंधळ निर्माण झाल्याची चर्चा आहे.

### गंभीर रुग्णांना दिली जाते तात्काळ सेवा

महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी ज्या रुग्णांना आयुष्यमान भारत कार्ड काढायचे आहे. त्या लाभार्थ्यांचे आयुष्यमान कार्ड काढले जात आहे. आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील ४० लाख रुग्णांपैकी १५ लाख रुग्णांचे आयुष्यमान भारत कार्ड काढण्यात आले आहे. तर उर्वरित २५ लाख रुग्णांचे आयुष्यमान भारत कार्ड काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील ११३ तर शहरातील २७ हॉस्पिटल्स मध्ये या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे. यापूर्वी महात्मा फुले योजनेअंतर्गत यापूर्वी १,३३६ आजारांवर उपचार केले जायचे, परंतु आता त्यामध्ये वाढ करण्यात आली असून २३,९९९ आजारांवर उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांकडे आयुष्यमान भारत कार्ड नाही. परंतु त्या रुग्णांची परिस्थिती अति गंभीर आहे अशा रुग्णांना तत्काळ आरोग्य सेवा दिली जात आहे, असे महात्मा फुले जन आरोग्य योजना सोलापूरचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य मित्र झाले हतबल

महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत वैद्यकीय मदत कक्षातील आरोग्य मित्रांची नेमणूक रुग्णांच्या देखभालीसाठी करण्यात आली होती. त्यांच्यासाठी देखील विशिष्ट लॉगिन आयडी पासवर्ड देण्यात आला होता. परंतु या नव्या अपडेटमध्ये आरोग्य मित्रांचे लॉगिन आयडी काढून टाकण्यात आल्याने आरोग्य मित्रांना देखील महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या किंवा घेत असलेल्या रुग्णांना कोणतीच मदत करता येत नसल्याचे समोर आले आहे. या नव्या अपडेटमध्ये लॉगिन नसल्याने आरोग्य मित्र हतबल झाले आहेत, असे वैद्यकीय मदत कक्षाचे शहराध्यक्ष बसवराज कोळी यांनी सांगितले.

## नम्र आवाहन!

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व माझे ज्येष्ठ बंधू बबनराव सपाटे यांचे दुःखद निधन झाले आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून पवार कुटुंबाशी माझे जवळचे संबंध असल्याने **मी १ मार्च रोजी असणारा माझा वाढदिवस यंदा साजरा करणार नाही.**

तरी या दिवशी कोणीही हारतुरे, गुच्छ आणू नये. माझ्या आयुष्यातील लहानपणापासून आजपर्यंत झालेल्या सामाजिक, राजकीय, वैयक्तिक घडामोडी **''एका भाकरीचा प्रवास''** या नावाने आत्मचरित्राचे लेखन सुरू आहे. तेव्हा कोणाला माझ्या संबंधी आलेले जे काही बरे – वाईट पण वास्तववादी अनुभव लिहावयाचे असतील तर त्यांनी जरूर लिहावेत.



विशेष म्हणजे माझ्या राजकीय विरोधकांनादेखील आपले अनुभव यामध्ये मांडण्याची खास संधी असेल. या संदर्भात अधिक माहिती व आपले लेख पाठविण्यासाठी ८२७५२ ०२९०६ आणि ९९२१४७९८६७ या मोबाइल क्रमांकांवर संपर्क साधावा.

**आपला नम्र**
**मनोहर गणपत सपाटे**
माजी महापौर, तथा अध्यक्ष मराठा समाज सेवा मंडळ आणि यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | रविवार, १ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







# सोलापुरात शेतकऱ्यांचा संताप उसळला हैद्राबाद महामार्ग रोखून धरला

- पोलिस प्रशासनाने फोडली वाहतुकीची कोंडी
- वाहनधारकांनी सोडला सुटकेचा नि:श्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने सोलापुरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कांदयाला मिळणाऱ्या कवडीमोल दराच्या विरोधात हैद्राबाद महामार्ग रोखून धरत श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर आंदोलन करण्यात आले. त्यामुळे येथील सर्व रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी झाली होती. दरम्यान, पोलिस प्रशासनाने इकडे धाव घेत वाहतुकीची कोंडी फोडल्याने वाहनधारकांतून सुटकेचा नि:श्वास सोडण्यात आला.

कांदयाला सर्वसाधारण दर ७०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आले. कमाल दर १ हजार ५०० रुपये तर किमान दर १०० रुपयांपर्यंत घसरल्याची नोंद आहे. एकीकडे उत्पादन खर्चात प्रचंड वाढ आणि दुसरीकडे बाजारात मिळणारा कवडीमोल दर. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. कांदा लागवड, खते, औषधे, मजुरी, पाणीपट्टी आणि काढणी यासाठी मोठा खर्च करावा लागतो, असे कांदा उत्पादकांकडून सांगण्यात आले.

श्रीसिध्देश्वर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासन, अडत व्यापारी आणि खरेदीदार यांच्यावर शेतकऱ्यांनी तीव्र प्रतिक्रिया देताना कांद्याचे दर पाडले जात असल्याचा दावा केला. दरम्यान, प्रशासन आणि व्यापाऱ्यांकडून सकारात्मक भूमिका घेतली गेल्यास परिस्थिती सुधारु शकते. अन्यथा शेतकऱ्यांचा आक्रोश अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रश्नावर काय तोडगा निघणार? याकडे लक्ष लागून राहिले आहे.

### वाहनांच्या रांगाच रांगा
कांदयाला मिळणाऱ्या कमी दरामुळे शेतकऱ्यांनी प्रचंड घोषणाबाजी करत सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केल्याने या मार्गावरील सर्व बाजूंनी वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या.

### लिलाव प्रक्रिया सुरळीत
परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बाजार समिती प्रशासनाने तात्काळ पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करुन परिस्थिती नियंत्रणात आणली. कांद्याच्या लिलाव प्रक्रिया सुरळीतपणे सुरु करण्यात आली.

### हमीभावासारखा मिळावा दर
उत्पादन खर्च आणि बाजारभाव यामध्ये प्रचंड तफावत आहे. कांद्याला किमान हमीभावासारखा दर मिळाला पाहिजे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून दर स्थिर ठेवावेत. अन्यथा राज्यभर आंदोलन उभारण्याचा इशारा शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे.

## सरपंच-उपसरपंच नसलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक कोण?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**



मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले असले तरी सरपंच, उपसरपंच व सदस्य नसलेल्या किंवा बरखास्त झालेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नेमणूक कोणाची करावी? याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहेफ

सोलापूर जिल्ह्यात सुमारे ६५० ग्राम पंचायतींची मुदत संपली आहे. १० हून अधिक ग्राम पंचायतींमध्ये सरपंच व उपसरपंच अपात्र ठरविण्यात आल्याने त्या बरखास्त करण्यात आल्या आहेत. काही ग्रामपंचायती नव्याने स्थापन झाल्या असल्या, तरी अद्याप त्यांची निवडणूक झालेली नाही. राज्य शासनाने विद्यमान सरपंच व उपसरपंच यांना प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, ज्या ठिकाणी सरपंच अपात्र ठरले आहेत किंवा ग्रामपंचायत बरखास्त झाली आहे. अशा परिस्थितीत प्रशासक म्हणून कोणाची नियुक्ती करावी, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

यासंदर्भात जिल्हा परिषदेने शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून, जिल्ह्यातील २० हून अधिक ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीचा निर्णय शासनाच्या मार्गदर्शनानंतरच घेतला जाणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले की, याप्रकरणी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.

## विनयभंग प्रकरणी झालेली शिक्षा अपिलात निलंबित

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

एका तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी अनिल हावळे यास सुनावण्यात आलेली एक वर्षाचा कारावास, पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सोलापूर सत्र न्यायालयाने अनिल हावळे यांची जामिनावर मुक्तता केली.

यात हकीकत अशी की, हावळे यांनी त्यांच्या घरात प्रसाद देण्याच्या कारणावरुन त्या तरुणीस बोलावून घेत तिचा विनयभंग केला, अशी फिर्याद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, हावळे यांनी ॲड. आल्हाद अंदोरे, ॲड.अथर्व अंदोरे यांचेमार्फत सत्र न्यायालयात अपिल दाखल केले. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्याचे अवलोकनही कायदेशीर पध्दतीने केले गेले नसल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन तदर्थ सत्र न्यायाधीश सूरज केंद्रे यांनी आरोपी हावळे यांची शिक्षा निलंबित करून त्यांची जामिनावर मुक्तता केली.

आरोपीतर्फे ॲड. आल्हाद अंदोरे, ॲड. अथर्व अंदोरे व ॲड. सुयश पुळूजकर तर सरकारतर्फे ॲड.अल्पना कुलकर्णी हे काम पाहत आहेत.

## जिल्हा परिषदेत 'स्वीकृत' जागांवर राजकीय रंगत

- भाजपाला चार, राष्ट्रवादी-शिवसेनेला प्रत्येकी एक जागा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर राजकीय रंगत वाढली आहे. सोलापूर जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्यांच्या सहा ते सात जागा असण्याची शक्यता असून, त्यापैकी चार जागा भाजपच्या वाट्याला येऊ शकतात, असा अंदाज वर्तविला जात आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत किमान पाच व कमाल सात, तर पंचायत समितीत किमान दोन व कमाल चार सदस्य स्वीकृत केले जाणार आहेत. स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचे निकष, अधिकार व इतर नियमावली लवकरच जाहीर होणार असून, सर्वसाधारण सभेत त्यांच्या नावांची घोषणा केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

६८ सदस्यीय सोलापूर जिल्हा परिषदेत भाजपने ३८ जागांवर विजय मिळविला आहे. त्यामुळे स्वीकृत सदस्यांच्या चार जागा भाजपला मिळू शकतात, असा अंदाज आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ११ व शिवसेनेचे ८ सदस्य निवडून आले असल्याने या दोन्ही पक्षांना प्रत्येकी एक जागा मिळणार आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पाच, सांगोला तालुका विकास आघाडीचे तीन, करमाळा तालुका विकास आघाडीचे दोन आणि पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा एक सदस्य असे सहा सदस्य विजयी झाले आहेत. त्यामुळे उर्वरित जागेसाठी चुरस वाढण्याची चिन्हे आहेत.

### 'जुने-नवे' असा अंतर्गत क्लेम
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांपूर्वी जिल्ह्यातील काही प्रमुख नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. या नव्या चेहऱ्यांमुळे पक्षाला यश मिळाल्याचे मानले जाते. त्यामुळे स्वीकृत सदस्यपदासाठी भाजपामध्ये 'जुने-नवे' असा अंतर्गत क्लेम दिसून येत आहे.

### पालकमंत्र्यांची भूमिका महत्वाची
स्वीकृत सदस्य, अध्यक्ष-उपाध्यक्ष यांसह विषय समित्यांच्या सभापती निवडीत राजकीय समतोल साधण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. या सर्व निर्णयांमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भूमि का महत्त्वाची ठरणार असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## दौंड-कलबुर्गी विशेष गाड्यांची सेवा सुरु ठेवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे होळी उत्सव आणि उन्हाळी सुट्ट्यांमध्ये दौंड-कलबुरगि विशेष गाड्यांची सेवा सुरू ठेवणार आहे.

यामध्ये दौंड-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष गाड्या २८.०२.२०२६ पर्यंत आठवड्यातून ५ दिवस (गुरुवार आणि रविवार वगळता) धावण्यासाठी अधिसूचित केल्या होत्या त्या आता १५.०७.२०२६ पर्यंत धावतील. दौंड-कलबुरगि अनारक्षित दैनिक विशेष गाड्या २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दर गुरुवार आणि रविवारी धावण्यासाठी अधिसूचित केल्या होत्या त्या आता १५.०७.२०२६ धावतील. या गाड्यांच्या वेळा, रचना आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

## महत्वाचे...

### मार्केट यार्ड येथून रिक्षा गेली चोरीला

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

मार्केट यार्ड येथे २५ हजार रुपयांची काळ्यापिवळ्या रंगाची बजाज ऑटो रिक्षा ही हँडलॉक करून ठेवली होती. सदर रिक्षा चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. दि.२४ फेब्रुवारी रोजी मार्केट यार्ड येथून बापू राम सावंत वय ४९ रा.१५४ रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर यांच्या ताब्यातील बजाज ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.१३ सी.टी.१५६६ ही रिक्षा मार्केट यार्ड येथे हँडलॉक करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने ती रिक्षा चोरून नेली. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

### शहराच्या मध्यवर्ती भागातून दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

होम मैदान येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी मोटरसायकल ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याची घटना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी घडली असून याबाबतचा गुन्हा दाखल झाला आहे. दि. १६ जानेवारी रोजी शेषराव रामलिंग कांबळे राहणार जय भवानी नगर डोकी, धाराशिव यांच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एम एच १३ ए वाय ५४५३ ही होम मैदान या ठिकाणी हँडलला करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने शेषराव यांची ३५ हजार रुपयांची काळ्या रंगाची, निळा पट्टा असलेली हिरो फॅशन मोटरसायकल चोरून नेली असल्याचा गुन्हा सदर बाजार पोलीस ठाण्यात दि. २७ फेब्रुवारी रोजी दाखल झाला आहे. पुढील तपास सरतापे करत आहेत.

### हँडल लॉक केलेली दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

राहत्या घरासमोरून हँडलॉक केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या ची घटना शहरात घडली असून याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दि. २६ फेब्रुवारी रोजी विनायक बालराज गांजी, रा. साईबाबा चौक यांच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एम एच १३ बी यु ३४१५ ही राहत्या घरा समोरून हँडल लॉक करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने ग्रे रंगाची होंडा शाईन मोटरसायकल ६० हजार रुपयांची राहत्या घरासमोरून हँडलॉक केलेली चोरून नेल्याने अज्ञात चोरट्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात दि. २७ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे याबाबतचा पुढील तपास शेख करत आहेत.






**श्रीकृष्ण-रुक्मिणी कल्याणोत्सवम्**
जुना विडी घरकुल परिसरातील सागर सावकार श्रीकृष्ण देवस्थान म्च्या वतीने शनिवारी श्रीकृष्ण रुक्मिणी कल्याणोत्सव संपन्न झाला. (छायाचित्र-केवल तिवारी)

## पती-पत्नीच्या मृत्यूचं गूढ उलगडलं चिठ्ठीतून

### संशयित आरोपीला विजयपूर येथून घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कलावती नगर येथे पती-पत्नीने विष पिऊन आपले आयुष्य संपवले होते. पोलिसांनी ताबडतोब तपासाची चक्र फिरवून कर्नाटकातील विजयपूर येथत्रील एका तरुणाला ताब्यात घेतलं. अभिषेक दत्तात्रय कोरे असं संशयित तरुणाचं नाव आहे. लिहिलेल्या चिठ्ठीतून धक्कादायक माहिती समोर आली आहे.

कर्नाटक राज्यातील विजयपूर येथील तरुणाने ओळख वाढवून त्रास दिल्याचे चिठ्ठीत स्पष्ट नमूद केले आहे. एमआयडीसी पोलिसांत रात्री उशिरा अभिषेक दत्तात्रय कोरे वय २६, रा. विजयपूर याच्याविरुद्ध जीव देण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. विजयपूर येथून त्याला अटक करत शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले.

सोमनाथ पाटील आणि श्रीदेवी पाटील या पती पत्नीला दोन मुली आहेत. मोठी मुलगी इयत्ता पाचवीत तर धाकटी इयत्ता



तिसरीत शिकते. बाहेर जाताना ते घराला बाहेरुन कुलूप लावून गेले होते.

ते रात्री घरी परतले तेव्हा मुली झोपी गेल्या होत्या. सकाळी त्या जेव्हा उठल्या तेव्हा आई बेशुद्ध अवस्थेत तर वडील तोंडाला फेस आल्याच्या स्थितीत होते. ते पाहून दोन्ही मुली घाबरल्या आणि त्यांनी तातडीने आजोबा आणि काकांना फोन केला.

### ओळखीचा गैरफायदा
संशयित आरोपी अभिषेक कोरे याच्याविरुद्ध एका महिलेवर अत्याचार केल्याचा गुन्हा सांगोला पोलिस ठाण्यात दाखल आहे. त्याने पीडित महिलेशी ओळख वाढवली. त्याचा गैरफायदा घेऊन तिच्यावर अत्याचार केले. अभिषेक दत्तात्रय कोरे असं संशयित तरुणाचं नाव आहे. लिहिलेल्या चिठ्ठीतून माहिती समोर आली आहे.

### पती-पत्नीला अभिषेकचा मोठा त्रास होता
सोमनाथ आणि श्रीदेवी यांना अभिषेक कोरे याचा मोठा त्रास होता, अशा अशयाची चिठ्ठी पोलिसांना मिळाली. अभिषेक याच्या त्रासाला कंटाळून त्यांनी जीव दिल्याचे प्राथमिक तपासातून दिसत आहे.

### आणखी माहिती येणार समोर
अभिषेक कोरे याच्याविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात आयुष्य संपवण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. विजयपूर येथून ताब्यात घेवून कोर्टात हजर केले आहे, तपासातून आणखी माहिती समोर येणार आहे, असे पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी सांगितले.




## रेल्वेच्या विद्युतीकरणासाठी ८ चाकी टॉवर वॅगनचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

इलेक्ट्रिक ट्रॅक्शन पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि ऑपरेशनल विश्वासार्हता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन (टीआरडी) विभागासाठी एक नवीन ८-चाकी टॉवर वॅगन समाविष्ट केले आहे.

टॉवर वॅगन पारंपारिक १÷२५ केव्ही एसी ट्रॅक्शन सिस्टीमपासून प्रगत २÷२५ केव्ही एसी ट्रॅक्शन सिस्टीममध्ये ओएचई नेटवर्कचे अपग्रेडेशन करण्यास मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. भविष्यातील वाहतूक वाढ, वीज मागणी वाढणे आणि सुधारित ऊर्जा कार्यक्षमता पूर्ण करण्यासाठी हे तांत्रिक संक्रमण अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे विभाग पुढील पिढीच्या रेल्वे ऑपरेशन्ससाठी तयार होईल.या प्रगत ८ चाकी टॉवर वॅगनच्या समावेशासह, सोलापूर विभाग आता एकूण ११ टॉवर वॅगन चालवतो, ज्यामुळे त्याच्या विद्युतीकृत मार्गांवर ओव्हरहेड इक्विपमेंट (जक्ए) तपासणी, प्रतिबंधात्मक देखभाल आणि पुनर्संचयित उपक्रम करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या मजबूत होते.

टॉवर वॅगनची वाढलेली उपलब्धता अधिक वारंवार तपासणी आणि महत्त्वाच्या जक्ए मालमत्तेची वेळेवर प्रतिबंधात्मक देखभाल करण्यास सक्षम करेल यावर भर देण्यात आला आहे. वेळेवर काम करणे, कार्यक्षमता वाढवणे आणि एकूण सुरक्षा मानके सुधारून या उपक्रमाचा प्रवासी आणि मालवाहतूक सेवा दोघांनाही थेट फायदा होईल. सोलापूरच्या अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM$^{2}$) यांनी विद्युत आणि TRD विभागांच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत टॉवर वॅगनचे उद्घाटन करण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३७०

आपण न वजे हरिकीर्तना।
आणि कां वारी जातां जना।।
त्याच्या पापा जाणा। ठेंगणा महामेरू तो ।।

प्रत्येकाला चांगले आवडत असले तरी अनेक लोक कळूनही चांगुलपणाचा स्विकार करीत नाहीत. आज करू, उद्या करू म्हणत आयुष्य संपण्याची वेळे येते तरीपण चांगुलपणाचा स्विकार करणे अनेकांना जमत नाही. स्वत:ला चांगुलपण न जमणारे हे लोक त्यांची ही उणीव स्वत:पर्यंतच मर्यादित ठेवतात असे नाही. तर बऱ्याचवेळा चांगले वागणाऱ्यांनाही चांगुलपणाच्या मार्गावर चालू देत नाहीत. अर्थात स्वत:ही चांगले वागत नाहीत आणि चांगले वागणाऱ्यांना किंवा चांगुलपणाच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही आडकाठी निर्माण करतात. आपल्या आयुष्यात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये, तसेच आजपासून तरी चांगल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करावा, अशी मनाशी गाठ बांधून कांही लोक सुमार्गावर येण्याचा प्रयत्न करतात. अशा वाईटातून चांगले होणाऱ्यांना मदत केली पाहिजे. त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. पण मानसिक दरिद्री लोक अशा लोकांना नाव ठेवतात, त्यांची टिंगल टवाळी करतात. अशा लोकांचे हे वर्तन केवळ पापाचे ढिग वाढवणे असेच असते. त्या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



आपण न वजे हरिकीर्तना।
आणि कां वाटी जातां जना ।।
त्याच्या पापा जाणा। ठेंगणा महामेरू तो ।।

आपल्या दुष्कृत्याने पापाचा महामेरू वाढत आहे, याची जाण कालांतराने का होईना; पण अनेक राक्षसांना झाली. पण लोकशाहीत जगणाऱ्या अनेक लोकांना होत नाही, याचे आश्चर्य वाटते. अनेक वीरांनी आपले प्राण गमावून देशाला पारतंत्र्यातून मुक्त करून तुम्हा आम्हाला माणूस म्हणून आनंदाने जगता येण्याची संधी निर्माण करून दिली. या संधीचा दुरुपयोग करणे म्हणजे वेडेपणा नव्हे तर काय? आपणही माणूस म्हणून जगायचे नाही आणि एखादा माणूसकीच्या मार्गावर येत असेल तर त्यालाही या सन्मार्गावर येऊ द्यायचे नाही, अशी वृत्ती जोपासणारे लोक समाजात आहेत. म्हणून संत महात्म्यांना कटू शब्द बोलावे लागतात. खरे म्हणजे आपण चुकीच्या पध्दतीने वागत आहोत व इतरांनाही चांगल्या मार्गाने आपण वागू देत नाहीत. याची जाण कळत न कळत अशा लोकांना होत असते. तरी पण स्वार्थापोटी, खोटारड्या मीपणापोटी हे लोक अशी दुष्कृत्य वृत्ती सोडत नाहीत. मूळात अशा वृत्तीला आपण स्वत:च कारणीभूत असल्याने अशी वृत्ती सोडण्यासाठी आपणच पुढाकार घ्यायला हवा. वाईट मार्गावरून चांगल्या मार्गावर येण्यासाठी खोटारडा मोठेपणा, मी पणा, स्वार्थ सोडण्यात कसलाच कमीपणा नसतो. आपणच निर्माण केलेल्या जाळ्यात अडकून मरण्यापेक्षा ते मीपणाचे जाळे काढून टाकून माणूस म्हणून जगणे कधीही चांगले असते. आपल्यावर ज्ञानोबा-तुकोबांची कृपा आहे. आपली मानसिक तयारी असेल तर ही कृपा आपणास कधीच दु:खी होऊ देणार नाही, याचा आम्हाला आत्मविश्वास आहे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. १ मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. त्रयोदशी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- पुण्य (०८.३४)**
**योग - शोभन (१४.३२)**
**करण - कौलव (०७.५४)**
**राहू काल : रविवार दु.४.३० ते ६.००**
**दिनविशेष : प्रदोष.**
**१९९२: बोस्निया व हेर्झे गोविनाला युगोस्लाव्हियापासून स्वातंत्र्य मिळाले.**
**१९९८: दाक्षिणात्य गायिका एम. एस. सुब्बलक्ष्मी यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला.**
**२००२: पेसेटा हे चलन सोडून देऊन स्पेनने यूरो हे चलन स्वीकारले.**



## अक्षय तृतीयेपूर्वी महात्मा श्री बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे काम पूर्ण करा

### कामासाठी निधी कमी पडू देणार नाही : महापौर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

महात्मा श्री बसवेश्वर महाराज यांचा पुतळा उभारणी व परिसर सुशोभीकरणाची कामे युद्धपातळीवर सुरू असून यामध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये. या कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. अक्षय तृतीयेपूर्वी महात्मा श्री बसवेश्वर महाराजांचा पुतळा बसविण्याचे तसेच परिसरातील सुशोभीकरणाची सर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

महापौर विनायक कोंड्याल यांनी आज महात्मा श्री बसवेश्वर महाराज पुतळा परिसराची प्रत्यक्ष पाहणी करून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या ठिकाणी बांधण्यात येणारा चबुतरा तसेच बसविण्यात येणाऱ्या पुतळ्याचे काम योग्य पातळीवर सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर,नगरसेवक अक्षय आजीखाने,नगर अभियंता सारिका अकुलवार, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवाणजी, जगदीश पाटील, गणेश चिंचोळी, आनंद मुस्तारे, रेवनसिद्ध आवजे, माजी नगरसेवक अमित पाटील, भीमाशंकर पद्मगोंडा, चंद्रशेखर कंदकूर, सागर अतनूरे,गुरराज पडमगोंडा,सतीश पारेली,अमित चडचणकर, बसवराज चडचण उपस्थित होते. महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, महात्मा बसवेश्वर महाराजांचे विचार समाजासाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या पुतळा उभारणी व सुशोभीकरणासाठी कोणताही निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# बाजार समितीत बेदाणा हंगामाची दमदार सुरुवात

## पहिल्याच दिवशी ६० टन आवक, प्रतिकिलो ४०० रुपयांचा उच्चांक



**कुमठेच्या शेतकऱ्याला सर्वाधिक दर**

कुमठे (ता. उत्तर सोलापूर) येथील शेतकरी सुरेश फुलमाळी यांच्या बेदाण्याला प्रतिकिलो ४०० रुपये असा सर्वाधिक दर मिळाल्याची माहिती सचिव अतुलसिंग रजपूत यांनी दिली.

**हवामानाचा परिणाम; दरात किंचित दबाव**

गेल्या आठवड्यातील बदलत्या हवामानाचा नव्या मालाच्या गुणवत्तेवर परिणाम झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. वाढत्या आवकेमुळे दरावर काहीसा दबाव निर्माण झाला असला, तरी चांगल्या प्रतीच्या मालाला समाधानकारक दर मिळत आहे. येत्या काही दिवसांत आवक वाढण्याची शक्यता असून, दरात प्रतिकिलो १५ ते २० रुपयांची घट होऊ शकते. मात्र, एकूणच यंदा दर स्थिर राहतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला.

अरुण बिराजदार यांनी सांगितले की, पहिल्या सौद्यात ४०० रुपयांचा उच्चांक मिळाला आहे. पुढील सौदे दर गुरुवारी दुपारी दोन वाजता होतील. द्राक्ष बागायतदारांनी आपला दर्जेदार माल विक्रीस आणावा. बाजारातील पहिल्याच दिवशीच्या उत्साहवर्धक प्रतिसादामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ फेब्रुवारी-**

सोलापूर बाजार समितीत यंदाच्या बेदाणा हंगामाला उत्साहात सुरुवात झाली असून, पहिल्याच दिवशी सुमारे ६० टन मालाची आवक झाली. त्यापैकी १,१९० बॉक्स (सुमारे १७ टन ८५० किलो) बेदाण्याची विक्री झाली. या सौद्यात प्रतिकिलो ४०० रुपये असा हंगामातील सर्वोच्च दर नोंदविला गेला, अशी माहिती बाजार समितीने दिली.

दरम्यान, सांगली व तासगाव बाजारानंतर आता सोलापुरातही बेदाणा सौद्याला प्रारंभ झाला. बाजार समितीचे सचिव अतुल रजपूत यांच्या हस्ते सौद्याचा शुभारंभ झाला. यावेळी बेदाणा व्यापारी संघाचे अध्यक्ष अरुण बिराजदार उपस्थित होते. श्री सिद्धेश्वर सोलापूर बाजार समितीत १,६६५ बॉक्स माल विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. त्यातील १,१९० बॉक्सची विक्री झाली. बेदाण्याला प्रतिकिलो २७० ते ४०० रुपये दर मिळाला. हंगाम सुरू होण्यापूर्वी तासगाव बाजारात ४०० रुपयांचा दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या.

## एसपीएस स्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

एसपीएस इंग्लिश स्कूल येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या संगीता कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमासाठी स्वाती कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलांनी करून सी. वी. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शन भरवले होते. विविध वैज्ञानिक मॉडेल्स, चार्ट्स आणि प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांनी आपली कल्पकता सादर केली.



कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. कात्यायनी भोईटे हिने आभार मानले. सूत्रसंचालन आयुष जानगवळी याने केले.



## यमाईदेवी शाळेत मराठी भाषा दिन साजरा

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे वि. वा.शिरवाडकर म्हणजे कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी,ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता जाधव, विद्या लांबतुरे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदीप चव्हाण उपस्थित होते.

## धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे आज स्वच्छता अभियान

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तालुका अलिबाग जिल्हा रायगड यांच्यावतीने दि. १ मार्च रोजी सोलापूर शहरातील विविध ठिकाणी शासकीय कार्यालय, सिव्हिल हॉस्पिटल सर्व समाजाच्या स्मशानभूमी आदी ठिकाणी स्वच्छता अभियान राबवण्यात येणार आहे.

पद्मश्री पुरस्कार सन्मानित महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल नियुक्त स्वच्छता दूत महाराष्ट्र भूषण डॉक्टर अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉक्टर सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एक मार्च रोजी तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मदिनानिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. शहर व परिसरातील जवळपास २५ श्री सदस्य सहभागी होऊन स्वच्छता मोहीम राबवणार आहेत.

## मेहता प्रशालेत मराठी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

कै.वि.मो मेहता प्रशालेत मराठी दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रामचंद्र धर्मसाले लाभले होते. कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.



मराठी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी मराठी भाषेशी निगडित विविध घटकांचे सादरीकरण केले. कुसुमाग्रजांची माहिती ईश्वरी पुरोहित, पुस्तक परिक्षण सादरीकरण स्वराज हिरेमठ, अनुप्रास अलंकार इयत्ता ७ वी व विद्यार्थ्यांनी बोली भाषेचे संवाद सादरीकरण केले. मराठी नॉनस्टॉप मनस्वी सुर्डीकर व अन्विता पोतदार, कु ईश्वरी पाटील काव्यवाचन, सायली थोरात, रिद्धी शिंदे, शर्वरी पुरोहित, अखिलेश कुलकर्णी व कीर्ती कुंभार व मराठी शिक्षक यांनी गीतांचे व नृत्यांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन रितिका रेवे व रिशिता इरकशेट्टी यांनी तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय अमेय गुंड तर आभार नक्षत्र जाधव याने मानले. कार्यक्रमास शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होते.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये मराठी दिन साजरा

**सोलापूर दि. २८ फेब्रुवारी-**

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल येथे मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. मराठी भाषेचा गोडवा दर्शविणारे कीर्तन सादर करण्यात आले. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी संतांची वेषभूषा साकारत संतांचे अभंग सादर केले. विद्यार्थ्यांचे एकपात्री नाटक लक्षवेधी ठरले. मराठी शिक्षक तसेच मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शांतकुमार साबळे, मिनाक्षी भगरे, अबोली देशमुख यांनी परिश्रम घेतले.

## ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटमध्ये ऑनलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

येथील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागामार्फत इंडस्ट्री ५.० आणि मानव-केंद्रित शाश्वत बांधकाम या विषयावर आयोजित करण्यात आलेली तीन दिवसीय ऑनलाइन कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली. या कार्यशाळेत विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील १०० हून अधिक प्राध्यापक आणि संशोधकांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील प्रा. विजयकुमार सैनी उपस्थित होते.

प्रा. विजयकुमार सैनी यांनी 'इंडस्ट्री ५.०' साठी आवश्यक धोरणात्मक आराखडा, नैतिकता आणि भविष्यकालीन कौशल्ये यावर प्रकाश टाकला. डॉ. वाय. एम. पाटील यांनी मानव-केंद्रित बांधकाम रचना तत्त्वांची माहिती दिली. के.एल.ई. टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीच प्रा. मल्लिकार्जुन इंडी यांनी एआय, बीआयएम आणि डिजिटल ट्विन्सद्वारे स्मार्ट व लवचिक इमारतींची निर्मिती कशी करावी, यावर तांत्रिक विश्लेषण केले. बांधकाम क्षेत्रातील ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि मानव-मशीन सहकार्य या विषयावर डॉ. शैलेश शिरगुंप्पीकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच एन.आय.टी. दिल्ली येथील डॉ. अजय कुमार यांनी बांधकाम उद्योगातील इंडस्ट्री ५.० मधील परिवर्तनांवर व्याख्यान दिले. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद एस. पाटील, डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे स्वागत विभागप्रमुख प्रा. तृप्ती मसलेकर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. कल्याणी मामड्याल यांनी केले. समन्वयक प्रा. अक्षया घाळीमठ यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रविण हेडगिरे, प्रा. प्रशांत स्वामी, प्रा. अनिल लिगाडे, प्रा. श्रीशैल बिराजदार, प्रा. विवेक भोगडे, प्रा. सागर अष्टेकर, राजकुमार मनुरे, स्नेहल लोकरे आणि शुभम कानडे यांनी परिश्रम घेतले.

## चोरी झालेल्या ५३ मोबाईलचा घेतला शोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

ग्रामीण पोलीस दलाचे अधिपत्याखालील पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये राहणेस असलेल्या नागरिकांचे गहाळ किंवा चोरीला गेलेल्या विविध कंपनीच्या ५३ अँन्ड्रॉईड मोबाईलचा शोध लावण्यात सोलापूर ग्रामीण सायबर पोलीसांना यश आले आहे.

पोउपनि अमितकुमार करपे यांचे नेतृत्वाखाली सायबर पोलीस ठाणेकडील सी.ई.आय.आर. पोर्टल टीम ने विशेष मोहीम राबवुन जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत गहाळ झालेले मोबाईल सी.ई.आय.आर. पोर्टलव्दारे तांत्रिक विश्लेषण केले व हरविलेल्या मोबाईलचा शोध घेवून विविध कंपनीचे ५३ मोबाईल त्यांची एकुण किंमत ७,९५,०००/- रूपये किंमतीचे मोबाईल हॅन्डसेट हस्तगत केले. सदरचे मोबाईल संबंधित मोबाईलचे मुळ खरेदीदार यांचे ताब्यात पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे हस्ते सुपुर्त करण्यात आले असुन हरवलेले मोबाईल पुन्हाः मिळाल्याने मोबाईल धारकातून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. सदर कामगिरी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण कडील पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, सी.ई.आय.आर. पोर्टलचे कामकाज पाहणारे पोशि जाधव यांनी केली आहे.



## मराठी भाषा ही महाराष्ट्राची शान : शेख

**सोलापूर दि. २८ फेब्रुवारी-**

शाळेत आपण आपल्या मातृभाषेप्रमाणेच मराठी भाषेलाही महत्त्व दिले पाहिजे. मराठीतून लिहिणे आणि वाचणे सर्वांनाच आले पाहिजे, कारण मराठी भाषा ही महाराष्ट्राची शान आहे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाचे अध्यक्ष फैय्याज शेख यांनी केले. महानगरपालिका मुलांची उर्दू केंद्र शाळा कॅम्प (लष्कर) आणि वृत्तपत्र लेखक मंचच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मुख्याध्यापिका महेजबीन मुल्ला अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. सुनील पुजारी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अरुण धुमाळ यांनी केले. प्रांजली मोहीकर यांनी स्वतः रचित कविता सादर केली. कार्यक्रमास प्रेमचंद्र मेने, रामकृष्ण आघोर, मल्लिनाथ किणगी यांची प्रमुख उपस्थिती होती. आरेफा शेख, फरहीन चौधरी, रेहाना शेख, जीनत पटेल आणि नईम मुछाले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. आभार अशोक म्हमाणे यांनी मानले.

## मराठी दिनानिमित्त 'दयानंद'मध्ये काव्यवाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, मराठी विभाग व डी. जी. बी. दयानंद विधी महाविद्यालय तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कवी कटकधोंड यांनी मराठी ही प्रदीर्घकालीन, वैभवसंपन्न, ऐतिहासिक परंपरा लाभलेली ज्ञानभाषा आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. एस. जे. गायकवाड या होत्या.



यावेळी त्यांनी कवी कुसुमाग्रज यांचा जीवनपट भावपूर्ण शब्दात उलगडून दाखवला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वि. वा. शिरवाडकर : व्यक्ती आणि वाग्मय या विषयावर लक्ष्मी ककमारे, समृद्धी ककमारे, निकिता वाघमारे, अक्षरा चंदनशिवे या विद्यार्थिनिनी केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत यावेळी करण्यात आले. विद्यार्थी काव्यवाचन उपक्रमांतर्गत सोनाली पाठक, पायल फिस्के, निकिता निकंबे, सपना शागालोलू, शैलेंद्र पाटील, रमेश काटे, अरविंद पाटील विद्यार्थ्यांनी काव्यवाचन केले. प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सोलापूरच्या अध्यक्ष डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड यांनी केले. आभार लक्ष्मी ककमारे हिने केले तर सूत्रसंचालन प्रा. आनंद मसलखांब यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, लेखाधिकारी विश्वनाथ बिराजदार, प्रा. शैलजा दंतकाळे, प्रा. रवी चलवादी, प्रा. रेखा मलजी, दीपिका परदेशी, प्रा. स्वप्ना कोटली, शुभम कोरे उपस्थित होते.



## कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये विज्ञान दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. २८ फेब्रुवारी-**

कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूट राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थ्यांनी विज्ञान यावर वेगवेगळे विचार मांडले आणि विज्ञानाच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील माहिती दिली. सी.व्ही. रमण यांच्याबद्दल माहिती देऊन त्यांच्या संशोधनाचे कार्य सांगितले. विज्ञानातील नोबेल पारितोषिक मिळवणारी भारतातील ही एकमेव व्यक्ती असून सर्वांनी अभिवादन केले. वल्लभ कुलकर्णी यांनी या दिवसाचे उद्दिष्ट विषद केले. सी. व्ही. रमण यांची स्मृति कायम ध्यानी ठेवण्याचे काम आपले सर्वांचे आहे, असे सांगून कार्यक्रमाची सांगता झाली.

## महत्वाचे...




### करकंबच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**करकंब, दि.२८ फेब्रुवारी-**
करकंब (ता. पंढरपूर) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजीराजे, छत्रपती संभाजीराजे, डॉ. आंबेडकर, म. फुले, लो.टिळक, संत, मावळ्यांच्या वेशभूषेत विविध ऐतिहासिक, धार्मिक प्रसंग सादर केले. तसेच मराठी गीतांवर नृत्य सादर करत मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार लक्ष्मण जाधव, सचिन शिंदे उपस्थित होते. यावेळी शाळा सुधार समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा. तानाजी ठोंबरे यांना विद्रोही साहित्य संमेलनाचा जीवनगौरव पुरस्कार

**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**



दि. २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नांदेड येथे होत असलेल्या २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनामध्ये कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. प्रा. ठोंबरे यांनी महात्मा फुले यांची शैक्षणिक भूमिका, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकरांचे साहित्य विचार, शाहिर अमर शेख, कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य, कॉम्रेड ए.बी. बर्धन अशा विविध विषयांवर पुस्तके लिहिली आहेत. ठोंबरे यांनी संपूर्ण हयात मार्क्स- फूले -आंबेडकरवादी विद्रोही विचाराने दलित , कामगार, शेतकरी, विद्यार्थी, युवकांच्या चळवळीमध्ये त्यांनी काम केले आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य म्हणून देखील त्यांनी काम केले आहे.




### भाषा बोलण्याने समृध्द होते : प्रा. शिंदे

**जेऊर, दि. २८ फेब्रुवारी-**
करमाळ्याच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील विज्ञान विभाग प्रमुख प्रा. विष्णु शिंदे हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.पी. माने हे होते. कार्यक्रमासाठी मराठी विभाग प्रमुख प्रा. नितीन तळपाडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. पृथ्वीराज इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन अनिता देशमुख यांनी तर आभार डॉ. ज्ञानेश्वर सुपेकर यांनी मानले.




### रोटरी क्लबतर्फे व्होकेशनल सर्व्हिस अवॉर्ड प्रदान

**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**
येथील रोटरी क्लब पंढरपूरच्या वतीने व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १५ मान्यवर उद्योजकांना 'व्होकेशनल सर्व्हिस अवॉर्ड' (व्यावसायिक सेवा पुरस्कार) देऊन गौरविण्यात आले. हा दिमाखदार सोहळा रोटरी भवन येथे पार पडला. आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी आमदार दत्तात्रय सावंत म्हणाले की, उद्योजक हा समाजाचा कणा असतो. प्रतिकूल परिस्थितीत आपला व्यवसाय उभा करून इतरांना रोजगार देण्याचे मोठे काम हे उद्योजक करत आहेत. रोटरी क्लबने त्यांच्या या कष्टाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे ही कौतुकास्पद बाब आहे. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक क्लब चे अध्यक्ष डॉ वैभव सादिगले यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. संगीता पाटील यांनी केले व कार्यक्रम यशस्वी कार्यण्याकरिता मार्गदर्शक डॉ, प्रा. कैलास करांडे यांचे सहकार्य लाभले, आभार सचिव मयुर परिचारक यांनी मानले.



### आदर्श ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे जेईई मेन्समध्ये यश

**कुर्डूवाडी, दि. २८ फेब्रुवारी-**
आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज,कुर्डूवाडी येथील विद्यार्थ्यांनी गएए मेन परीक्षामध्ये उल्लेखनीय यश संपादन करून ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स च्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उत्कृष्ट टक्केवारीमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. यामध्ये सुमेध हिवराळे याने ९०.३३ पर्सेंटाइल, आकाश नाईकुडे याने ८०.००पर्सेंटाइल, तर कृष्णा ढेकळे याने ७५.००पर्सेंटाइल मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. अमोल सुरवसे प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, प्राचार्य शकिलाबी सय्यद यांनी अभिनंदन केले.

# पाच वर्षांपासून बेपत्ता असलेल्या २५ तरुणींचा शोध

## प्रशिक्षणार्थी महिला पोलिस उपनिरीक्षक डॉ. आरती कणिरे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २८ फेब्रुवारी-**
मंगळवेढा शहर आणि ग्रामीण भागात सन २०२० ते २०२५ या कालावधीत जवळपास २५ तरुणीस बेपत्ता झाल्याच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये नोंदल्या होत्या. या सर्व प्रकरणांची नोंद कुटुंबीयांनी दिली होती, ज्यामुळे स्थानिक पातळीवर चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. डॉ.आरती कणिरे यांनी लोकेशन ट्रॅकिंग आणि सी.डी. आर. (कॉल डिटेल रेकॉर्ड) च्या माध्यमातून प्रत्येक प्रकरणाचा तपास करून सर्व तरुणींना शोधून काढले.

या तपास प्रक्रियेत डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रत्येक गावातील पोलीस पाटलांचेही सहकार्य मिळाले, ज्यामुळे तपासाला वेग आला. ही यशस्वी कारवाई मंगळवेढा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे उदाहरण आहे. डॉ. आरती कणिरे यांचे पार्श्वभूमी अशी की,डॉ. आरती कणिरे या कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील इंगळी गावच्या शेतकरी कुटुंबातील आहेत.

वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी पोलिस उपनिरीक्षक पद मिळवले, ज्यात शिक्षणातील खंड, संसाराची जबाबदारी आणि कोविड महामारीसारखी अडचणी पार केल्या. ३८९ जणांच्या बॅचमध्ये ५८वी रँक मिळवत त्यांनी गावाचे नाव उज्वल केले. प्रशिक्षणार्थी म्हणून मंगळवेढा येथे रूजू झाल्यावर त्यांनी ताबडतोब बेपत्ता तरुणींच्या प्रकरणांना प्राधान्य दिले. स्थानिक पत्रकारांनी सोलापूरचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडे महिला अधिकारी नेमण्याची मागणी केली होती, ज्याची दखल घेऊन त्यांची नेमणूक झाली. त्यांच्या जिद्दीने ग्रामीण महिलांसाठी प्रेरणा निर्माण झाली आहे. ठळक प्रकरणांची



माहितीसन २०२६ मध्ये शहर परिसरातून बेपत्ता झालेली १९ वर्षीय तरुणी आळंदी येथे २१ वर्षीय तरुणासोबत सापडली. त्यांनी लग्न केले होते, आणि सुज्ञ असल्याने पालकांच्या ताब्यात सोडण्यात आले. हे प्रकरण प्रेम-संबंधांवर आधारित होते.

दुसऱ्या प्रकरणात २० वर्षीय तरुणी मोहोळ हद्दीत सापडली आणि नातेवाईकांकडे परतली. तिसऱ्या घटनेत ३५ वर्षीय विवाहिता तीन मुलांसह इंदापूर येथे आढळली. चौकशीत निष्पन्न झाले की, पती मोबाईल न देण्यामुळे भांडणे होत होती, त्याला कंटाळून ती निघून गेली होती.शनिवार पेठ येथील २२ वर्षीय तरुणी आणि माचणूर परिसरातील ऊसतोड टोळीतील तरुणी (लातूर येथे सापडली) या प्रकरणांनाही ताब्यात घेऊन सोडण्यात आले.

ऊसतोड टोळीतील तरुणीने व्हिडिओ कॉलवर लग्नाची माहिती दिली होती.स्थानिक संदर्भ आणि आव्हानेमंगळवेढा तालुक्यात पूर्वी बेपत्ता तरुणींच्या प्रकरणांची संख्या वाढत होती, जसे २०२२ मध्ये शहरातून १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची नोंद आहे. अशा घटना प्रेम, कौटुंबिक कलह किंवा इतर कारणांमुळे घडतात.पूर्वी मंगळवेढा पोलीस ठाण्यात महिला अधिकारी नसल्याने अडचणी येत होत्या. डॉ.आरती कणिरे यांच्या नेमणुकीने हे बदलले. तालुक्यातील पोलीस पाटील आणि स्थानिकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले.सामाजिक संदेश आणि भविष्यातील उपायही कारवाई पालकांना दिलासा देणारी आहे. तरुण वयात प्रेम-संबंध वाढत आहेत, तरी संवाद आणि सतर्कता आवश्यक आहे. पोलीसांनी वेळीच माहिती देण्याचे आवाहन केले आहे.मंगळवेढा पोलीस दलाने अवैध धंदे, गुन्हे नियंत्रणात ठेवण्यातही यश मिळवले आहे. डॉ.आरती कणिरे यांसारख्या अधिकाऱ्यांमुळे महिला सुरक्षिततेवर भर दिला जाईल.

तालुक्यातील पोलीस यंत्रणामंगळवेढा उपविभागीय पोलीस कार्यालयात विविध बदल झाले आहेत. पूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या बदलीनंतर नवीन नेतृत्वाने गुन्हेगारी कमी केली. सांगोला आणि मंगळवेढा स्टेशनने वाळू, दारू धंद्यावर कारवाई केली.सोलापूर परिक्षेत्राची तपासणीत समाधान व्यक्त झाले. अशा यशकथा तालुक्यातील नागरिकांसाठी प्रेरणादायी आहेत.

## बार्शी मुद्रक संघाच्या अध्यक्षपदी कुणकेश्वर बिनविरोध

### सर्वसाधारण सभेत झाला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**
बार्शी मुद्रक संघाची सर्वसाधारण शुक्रवारी सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी नुतन पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध निवड करण्यात आली.



अध्यक्ष दिपक कुणके, उपाध्यक्ष संजय चव्हाण, सचिव संतोष तोडकरी तर खजिनदार ज्ञानेश्वर बोबडे यांची निवड करण्यात आली. मुद्रकांसाठी भरीव काम करण्याची अपेक्षा सर्व सदस्यांनी व्यक्त केली तर अध्यक्षीय भाषणात मुद्रण क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान याचा उपयोग करुन मुद्रण क्षेत्रातील व्यवसायीकांना माहिती मिळण्यासाठी सर्व मुद्रकांमध्ये समन्वय साधून विविध उपक्रम राबवु, मुद्रण क्षेत्रातील मोठ्या व्यवसायीकांशी समन्वय साधून बार्शी मुद्रण हब बनविण्यासाठी प्रयत्न करणार, असे मनोगत व्यक्त केले. यावेळी संतोष दोशी, शंकरराव लटके, नंदकिशोर राऊत, पियुष कोटेचा, महादेव चव्हाण, साईनाथ साखरे, राहुल भालके, अमोल आजबे, किरण गुरसुळकर, विजय वायचळ, विनोद घाडगे, बालाजी पाटील, आप्पा नायकोजी, सागर मुके, सागर काशीवद, युवराज जाधव, करीम जिनेरी, महेश सोनार, सचिन आजबे, गुरु साखरे, बंडू चव्हाण, अनिरुद्ध सासवडे आदि उपस्थित होते.




## वेळापुरात जनजागृती रथाद्वारे पंचायतराज अभियानाचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २८ फेब्रुवारी-**
महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत वेळापूर गावात जनजागृती रथाचे पालखी मैदान येथे करण्यात आले.यावेळी सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते रथाचे पूजन करून अभियानाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

लोकसहभाग व श्रमदानातून विकासाची गती वाढवणे, सुशासनयुक्त व सक्षम ग्रामपंचायत घडवणे, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, मनरेगा व इतर शासकीय योजनांचा प्रभावी अभिसरण करून प्रत्येक घटकापर्यंत लाभ पोहोचवणे, गाव पातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण करणे तसेच उपजीविका विकास व सामाजिक न्याय सुनिश्चित करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या अभियानात वेळापूर गावाने सक्रिय सहभाग नोंदवावा, प्रत्येक नागरिकाने स्वच्छता, पाणी संवर्धन, हरित गाव आणि सामाजिक सलोखा यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने वेळापूरला आदर्श व समृद्ध गाव बनवूया. आपण सर्वांनी एकत्र येऊन समृद्ध महाराष्ट्र घडविण्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन सरपंच बनसोडे यांनी केले.

यावेळी उपसरपंच नानासो मुंगूसकर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, लक्ष करिअर ॲकॅडमीचे संस्थापक अध्यक्ष धनराज सावंत, ग्रामपंचायत सदस्य अमृतराव माने-देशमुख, बिभिषन मुंगूसकर, किरण काळे, सूर्याजी माने-देशमुख, उदय माने देशमुख, साकिब मुलाणी, अरबाज कोरबू, अमोल साळवी, रशीद दरवेशी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्वांनी हातात खराटा घेऊन स्वच्छता मोहीम राबवली.

## विकासात्मक उपक्रमांचा निती आयोगाकडून आढावा

### सल्लागार मुग्धा नरकर यांनी केला अक्कलकोट तालुका दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ फेब्रुवारी-**
तालुक्यात आकांक्षित कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी विविध विकासात्मक उपक्रमांच्या आढावा घेण्यासाठी निती आयोगाच्या सल्लागार श्रीमती मुग्धा नरकर यांनी भेटी देऊन अक्कलकोट तालुक्यात दौरा केल्या.

पंचायत समिती अक्कलकोट येथे तालुकास्तरावरील अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या दरम्यान श्रीमती मुग्धा नरकर यांनी उपस्थितींना मार्गदर्शन करून संपूर्णतः अभियान २.० यी ६ निर्देशांक यशस्वीरित्या साध्य करण्यासाठी विभागीय समन्वयक, नियमित देखरेख, मैदानी फॉलो अप तसेच नियोजित कृती आराखडा चाली प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी समुदाय सहभागाला समावेश करणे गरजेचे असल्याची सांगितल्या.

त्यांनी सर्व विभागांना निर्धारित उदिष्टे व निकषांनुसार वेळेने कार्यवाही करण्याचे, नबोध नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे निर्देष दिले. तसेच डेटा आधारित नियोजन व सातत्यपूर्ण मूल्यांकन प्रणाली अधिक सक्षम करण्यावर त्यांनी विशेष




भर देण्याबाबत सांगितले.

दरम्यान श्रीमती मुग्धा नरकर यांनी जेऊर येथील ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी केंद्र, जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, एएनसी नोंदणी तपासणी, प्रसूतीगृहाची व्यवस्था, उच्च जोखीम गर्भवती महिलांची ओळख व त्यांच्यासाठी उपलब्ध सेवांची प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. यावेळी संपूर्णतः अभियान २.० च्या अनुषंगाने अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय उपलब्धतता, पाण्याची सुविधा, आहार वाटप, बालकांचे पोषण व्यवस्थापन, मुलांसाठी पूरक पोषण योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या योजनांची व्यवस्था, बालकांच्या वाढ, मोजमाप (ग्रोथ मॉनिटरिंग), पूर्व शिक्षणाची गुणवत्ता इ. बाबींचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, महिला व बाल विकास प्रकल्प अधिकरी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता ग्रमीण पाणी पुरवठा, तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग पंचायत समिनी, गावचे उप सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, उमेद अभियानाचे तालुका अभियान बलस्थापक यांची उपस्थिती होती.



## पंचप्पा कल्याणशेट्टी संकुलात स्वा.सावरकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ फेब्रुवारी-**
भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विनायक दामोदर सावरकर क्रांतिकारक, विचारवंत आणि साहित्यिक म्हणून ओळखले जातात,त्यांच्या व्यक्तिमत्त्वात धैर्य, संघटनशक्ती आणि तत्त्वनिष्ठा यांचा सुंदर संगम दिसून येत असल्यामुळे पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात त्यांच्या पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सेमी इंग्लिश विभाग प्राथमिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिमापूजन, व्याख्यान व चित्रपट आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, दिगंबर जगताप उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केल्यानंतर ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, सावरकरांनी अभिनव भारत ही गुप्त क्रांतिकारी संघटना स्थापन करून तरुणांना सशस्त्र क्रांतीसाठी प्रेरित केले. ब्रिटिश सरकारने त्यांना अंदमानातील सेल्युलर तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा दिली. तुरुंगात असताना त्यांनी अनेक कविता आणि साहित्यनिर्मिती केली. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केले तसेच पतितपावन मंदिर उभारून सर्व समाजघटकांना प्रवेश दिला. त्यांच्या लेखन, भाषण आणि कृतीतून देशभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक जागृतीचा संदेश मिळतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले आभार मनिषा सुरवसे यांनी मानले. कार्यक्रमास सिद्रामप्पा पाटील, राजकुमार गवळी, रविकिरण दंतकाळे, श्रीदेवी मायनाळे आदी उपस्थित होते.



## सोजर मधील 'हिपा' प्रमाणपत्र कार्यशाळेत ५४ विद्यार्थी सहभागी

### जागतिक आरोग्य मानकांचे ५४ दिले प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ फेब्रुवारी-**
येथील सोजर फार्मसी कॉलेज, खांडवी कॅम्पसमध्ये अंतिम वर्षाच्या बी.फार्म. आणि डी.फार्म. विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसीय 'हिपा'(एचआयपी) प्रमाणपत्र आणि करिअर मार्गदर्शन कार्यशाळेत ५४ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

'माइंडवर्क्स ग्लोबल टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित केला होता. २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यानच्या या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक कमल कुमार यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने 'मेडिकल समरायझेशन' आणि अमेरिकन आरोग्य क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा 'हिपा' कायदा व त्याचे पालन यावर प्रशिक्षण देण्यात आले. केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांची कॉर्पोरेट जगासाठी तयारी व्हावी या उद्देशाने 'ॲप्टिट्युड' तयारी आणि 'मॉक इंटरव्ह्यू' (नमुना मुलाखत) सत्रांचेही आयोजन करण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत झाली. कार्यक्रमाचे नियोजन अध्यक्ष अरुणदादा बारबोले आणि सचिव कल्पनाताई बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.समन्वयक डॉ. सुजित करपे यांनी उपक्रमाचे महत्त्व विशद केले. तर प्लेसमेंट समन्वयक शुभम मगर यांनी संयोजन केले. साळवी यांनी सूत्रसंचालन केले.

## पिलीव परिसरातील अपघाताची मालिका कधी थांबणार? एकही गतिरोधक नसल्यामुळेच होताहेत अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२८ फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव गावातून सातारा-पंढरपूर हा महामार्ग जातो . जेव्हापासून या महामार्गाचे काम झाले आहे तेव्हापासून पिलीव परीसरात सतत अपघात होत आहेत. याठिकाणी पिलीव बायपास व बागवान टेकाजवळ सतत अपघात होत आहेत. या दोन्ही ठिकाणी अपघातामुळे अनेकांचे बळी गेले आहेत. या रस्त्यावर कुठेही गतिरोधक नाही.

पिलीव बसस्थानक असो की पेट्रोल पंपाजवळील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज असो किंवा पिलीव येथील अहिल्यादेवी चौक असो कोणत्याही अगदी मुख्य ठिकाणी एकही गतिरोधकच नाही .या सतत वर्दळ किंवा गर्दीच्या ठिकाणी सुद्धा एकही गतिरोधक बसविण्याची तसदी महामार्ग प्रशासनाने घेतली नाही यामुळे अगदी बसस्थानक असो किंवा शाळा परिसरात सुद्धा वाहने प्रचंड वेगाने जातात यामुळे याठिकाणी सतत अपघाताची मालीका सुरूच आहे.

> पिलीव परिसरातील गतिरोधकाविषयी पुणे येथील एमएसआरडीसीच्या पोतदा यांच्याशी संजय पाटील यांनी संपर्क साधला असता बसस्थानक व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयासमोर गतिरोधक बसवायचे असतील तर माळशिरस पोलीस निरीक्षकांचे पत्र व लोकेशन पाठवा त्याठिकाणी रबरी गतिरोधक बनवुन देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या रस्त्याचे महामार्गामधये रुपांतर झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचा अखत्यारीत हे येत नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगीतले .याबाबत पिलीव परिसरातील नागरिकांनी पुणे येथील कार्यालयाकडे अपुर्ण कामे,बसस्थानकावरील लाईट, गतिरोधकाबाबत लेखी तक्रार करुन आंदोलनाचा इशारा दिला होता. तरीही प्रशासनाने कसल्याही प्रकारची दखल घेतलीच नाही. यामुळे पिलीव परिसरातील नागरिक अक्षरश हतबल झाले असुन सध्या नागरिक चांगलेच आक्रमक झाले असुन आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. संबंधित प्रशासन अजुन किती बळी घालविण्याची वाट पहात आहे असा नाराजीचा सूर नागरिकांमधुन निघत आहे. २६ फेब्रुवारी रोजी रात्री झालेल्या अपघातात दोन तरुणांना नुकताच आपला जीव गमवावा लागला आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोटचे कार्तिकी अन् शुभम ठरले 'नासा'चे 'व्हर्च्युअल गेस्ट'

**अक्कलकोट, दि. २८ फेब्रुवारी-**

तालुक्यातील कार्तिकी मोहन मलंग आणि शुभम मोहन मलंग या दोन विद्यार्थ्यांची नावे थेट चंद्र मोहिमेसाठी पाठविण्यात येणार आहेत. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्था 'नासा'च्या महत्त्वाकांक्षी मोहिमे अंतर्गत या विद्यार्थ्यांचा 'व्हर्चुअल गेस्ट' म्हणून सहभाग नोंदविण्यात आला आहे.

नासाने जगभरातील नागरिकांना ऑनलाईन नोंदणीद्वारे या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देत कार्तिकी आणि शुभम यांनी नोंदणी पूर्ण केली. त्यानंतर नासाकडून त्यांच्या नावांचे अधिकृत 'बोर्डिंग पास' पाठविण्यात आले आहेत. कार्तिकी ही इयत्ता सहावीमध्ये मंगरुळे प्रशालेत शिक्षण घेत आहे. तर शुभम इयत्ता तिसरीमध्ये लायन्स क्लब प्रशालेत आहे. त्यांच्या या


कार्तिकी मलंग शुभम तेलंग

यशामुळे शाळांसह अक्कलकोट तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर पडली आहे. या ऐतिहासिक मोहिमेत सहभागी झालेल्या व्यक्तींची नावे विशेष एसडी कार्डमध्ये संग्रहित करून जीळेप अंतराळयानाद्वारे चंद्राच्या दिशेने पाठविण्यात येणार आहेत. तब्बल ५४ वर्षांनंतर नासा पुन्हा एकदा अंतराळवीरांना चंद्रावर पाठविण्याच्या तयारीत असून, या मोहिमेत अक्कलकोटच्या विद्यार्थ्यांची नावे समाविष्ट होणे ही तालुक्यासाठी गौरवाची बाब मानली जात आहे.या यशामागे आई-वडील प्रा. शुभांगी मोहन मलंग आणि प्रा. मोहन मलंग यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



# बार्शी नगरपरिषदेचा करवाढ नसलेला अर्थसंकल्प मंजूर

### ६९८ कोटी १२ लाख १३ हजार १४७ रुपयांची तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २८ फेब्रुवारी-**

बार्शी नगर परिषदेचा कोणतीही करवाढ नसलेला सन २०२६-२७ चा ६९८ कोटी १२ लाख १३ हजार १४७ रुपयांचा अर्थसंकल्प शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी रोजी कै. भाऊसाहेब झाडबुके सभागृहात पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. तब्बल तीन तास चाललेल्या या सभेत सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी, आरोप-प्रत्यारोप झाले.

सभेच्या प्रारंभी पिठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांनी अर्थसंकल्प सादर करताना अभिभाषणात महिलांना केंद्रस्थानी ठेवून, शहराचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने कोणतीही करवाढ व दरवाढ न करता हा अर्थसंकल्प मांडल्याचे सांगितले. अर्थसंकल्पात शासनाकडून प्राप्त होणारे विविध प्रकारचे अनुदानित अंशदानी तसेच विविध योजना अंतर्गत कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य इत्यादी द्वारे ४९८ कोटी ७१ लाख ४२ हजार भांडवली जमेस धरून नगरपरिषदेचा सन २०२६- २७ मध्ये एकूण ५१२ कोटी ८६ लाख ४२ हजार ४०४ रुपये उत्पन्न अपेक्षित धरण्यात आलेले आहे. प्रारंभिक शिल्लक जमा धरता एकूण ६९८ कोटी १२ लाख १३ हजार १४७ रुपयाची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

**विरोधकांचा आरोप : फुगवलेले आकडे**

अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे यांनी तब्बल ४३ मिनिटांचे अभ्यासपूर्ण भाषण करत महसुली व भांडवली जमा यामध्ये आकडे फुगवून सादर केल्याचा आरोप केला. अधिकारी वर्ग सत्ताधारी आणि विरोधी नगरसेवकांची दिशाभूल करत आहेत का ? असा सवाल केला. अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा तक्ता नसून शहराच्या विकासाचा कायदेशीर आराखडा आहे. कररुपी पैसा हा जनतेचा असून आपण त्याचे विश्वस्त आहोत, असे त्यांनी नमूद केले. जिल्हा नियोजन समितीचे बजेट सुमारे ७०० कोटी असताना बार्शी नगरपरिषदेचा ६९८ कोटींचा अर्थसंकल्प वास्तववादी नसल्याची टीका त्यांनी केली. अनेक योजनांना प्रशासकीय, तांत्रिक मान्यता नसताना तरतुद दाखविल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. बार्शी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात २५ टक्के देवस्थान, २५ टक्के नगरपरिषद व ५० टक्के राज्य शासन निधी अशी तरतूद असल्याचे सांगत आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी नमूद केले. उजनी पाणीपुरवठा योजनेच्या नवीन पाइपलाईन संदर्भात शासनाकडून ८० टक्के अनुदान अपेक्षित असताना संबंधित ठेकेदारास ८० टक्केपेक्षा अधिक बिल अदा झाल्याचा आरोप करत संभाव्य अनियमिततेचा संशय त्यांनी व्यक्त केला. शहरभर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी तरतूद करावी, वाहतूक समस्येसाठी सिग्नल व्यवस्था वाढवावी. पर्यावरण संवर्धन व धूळ प्रदूषणावर भरीव उपाययोजना. सामाजिक संस्थांना स्मशानभूमी, शाळा व बगीचा दत्तक देण्याची योजना. बार्शी शहरातील बारा ज्योतिर्लिंग असलेल्या परिसरातील रस्त्यांवर कमानी उभाराव्यात. दस्तगीर दर्ग्याच्या दुरुस्तीसाठी निधी द्यावा असा मागण्याही त्यांनी केल्या. विजय राऊत यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले.

या अर्थसंकल्पात बार्शी शहराचा सर्वांगीण विकासाचा रोडमॅप तयार असल्याचे त्यांनी सांगितले. अर्थसंकल्पाचे स्वागत करत शहरातील प्रत्येक भागातील विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, तसेच निधी वाटपात भेदभाव होणार नाही, अशी ग्वाही दिली. शासनाच्या योजना १०० टक्के राबविण्याचा प्रयत्न होईल, असेही त्यांनी सांगितले. महिलांसाठी अलीपुर रोड व उपळाई रोड येथे नवीन स्वच्छतागृहे उभारण्याची घोषणा त्यांनी केली.

**सभागृहात खडाजंगी :** माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले यांनी हा अर्थसंकल्प नियोजनशून्य व भ्रष्टाचाराने भरलेला असल्याचा आरोप करत गटार दुरुस्ती, भुयारी गटार योजना, घरपट्टी-नळपट्टी वसुलीतील तफावत, अपूर्ण कामे यांवर प्रश्न उपस्थित केले. यावर सत्ताधारी नगरसेवक विजय चव्हाण, संदेश काकडे, दीपक राऊत, अमोल चव्हाण, भैय्या बारंगुळे व उपनगराध्यक्ष रोहित पाटील यांनी आक्रमक प्रत्युत्तर दिल्याने काही काळ सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. गोंधळाच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका विद्या बंगाळे यांनी सभागृहाचे गांभीर्य राखण्याचे आवाहन केले. ५० टक्के महिला सदस्य उपस्थित असताना अशा प्रकारचा गोंधळ योग्य नाही. सभागृहात विरोधी नगरसेवक ज्योतिर्लिंग कसबे, आणि विद्या बंगाळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजनेतून ११ कोटीची तरतूद आहे तर याच ठिकाणी हा खर्च व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. भीम नगर, सिद्धार्थ नगर आणि अण्णाभाऊ साठे नगर या भागात नव्याने गटारी आणि सिमेंट रस्ते व इतर मूलभूत सुविधा व्हाव्यात, अशी मागणी नगरसेवक ज्योतिर्लिंग कसबे, विद्या बंगाळे यांनी केली.



**महिला व बालकल्याणावर भर**

सत्ताधारी नगरसेविका कांचन मोहिते यांनी महिला व बालकल्याण विषयक योजनांमध्ये अधिक तरतूद करण्याची मागणी केली. विरोधी नगरसेवक अनिकेत कारंडे यांनी पाणीपुरवठा विभागातील वाल्व ओपनरवरील वाढत्या खर्चाबाबत प्रश्न उपस्थित केला. संदेश काकडे यांनी अर्थसंकल्पातील तरतुदी योग्य असल्याचे स्पष्ट केले. या सभेत नगरसेवक भारत पवार, महेदिमियां लांडगे, सायरा मुल्ला, रागिनी पाचपुते, आकाश राऊत, मुज्जमिल पठाण आदींनी सहभाग घेतला.

## विजयी सदस्यांचा उपमुख्यमंत्री शिंदेंनी केला सत्कार

### अक्कलकोट जि.प. व पं.स. सदस्यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२८ फेब्रुवारी-**

अक्कलकोटच्या जनतेने शिवसेनेवर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मंत्रालयात येताना ठोस प्रस्ताव आणि विकासकामांची यादी घेऊन या. जनतेचे कामे सांगा, मी कामासाठी कुठेही कमी पडणार नाही. अक्कलकोटच्या प्रगतीसाठी कोणतीही अडचण येऊ देणार नाही, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अक्कलकोटच्या शिष्टमंडळाला दिले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांनी ठाणे येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. यावेळी वागदरी जिल्हा परिषद गटाचे सदस्य प्रवीण तानवडे व सलगर जिल्हा परिषद गटाचे सदस्य शिवराज म्हेत्रे, पंचयात समिती सदस्य गणेश मोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे व लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, माजी जिल्हा परिषद पक्ष नेता आनंद तानवडे, प्रविण तानवडे उपस्थित होते. यावेळी त्यांनी स्थानिक नेतृत्वाला बळ दिले असून शिवसेना आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. अक्कलकोट तालुक्याच्या विकासासाठी मंत्रालयस्तरावर आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल असे सांगत तालुक्याच्या विकासाचा शब्द दिला. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी प्रवीण तानवडे व शिवराज म्हेत्रे यांचा जिल्हा परिषद निवडणुकीत विजय संपादन केल्याबद्दल मंत्री गोगावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेती रस्ता कामे गावाअंतर्गत कामे व इतर कुठलीही कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाईल असे आश्वासन मंत्री गोगावले यांनी दिले.

यावेळी लिंगराज स्वामी, प्रशांत तानवडे, अनिल जिरगे, संजय होळे, सुशील फुलारी, रामेश्वर पाटील, मदन राठोड, राजू राठोड, संगप्पा चानकोटे, दीपक कवडे, विजय बिराजदार, इराया स्वामी, बसवराज मंजुळकर, ॲड अमित कोथिंबीरे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.


**ठाणे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीप्रसंगी सिध्दाराम म्हेत्रे, प्रवीण तानवडे, आनंद तानवडे, शिवराज म्हेत्रे, प्रशांत तानवडे व अन्य.**

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र सहसंपर्क प्रमुखपदी सतीश सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. २८ फेब्रुवारी-**

शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्राच्या सहसंपर्क प्रमुखपदी सांगोलचे सतीश सावंत यांची निवड करण्यात आली असून कक्षाचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.



शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात १० टक्के राखीव खाटा उपलब्ध करून देणे, निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पूर्णता मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्यासंदर्भातील मदत, महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करणे संदर्भातील मार्गदर्शन करून सदैव तत्पर राहावे. तसेच गंभीर व महागड्या शस्त्रक्रिया करावयाच्या असलेल्या गोरगरीब रुग्णांना भरीव प्रमाणात आर्थिक सहाय्य व्हावे याकरिता पंतप्रधान वैद्यकीय सहाय्यता निधी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, सर रतन टाटा ट्रस्ट यासारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी थेट बाळासाहेब भवन येथील मुख्य कार्यालयात संपर्क साधावा असे या पत्रात संस्थापक अध्यक्ष मंगेश चिवटे व कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांनी नमूद केले आहे.

सदर निवडी नंतर सतीश सावंत यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

लवकरच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या सांगोला तहसील कार्यालयासमोरील संपर्क कार्यालयात रुग्णांच्या मदतीसाठी २४ तास उपलब्ध राहुन रुग्णांना मदत करणार आहे.
**- सतीश सावंत,**
सहसंपर्क प्रमुख, पश्चिम महाराष्ट्र

## सारोळे येथे एकता महिला मंचतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२८ फेब्रुवारी-**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रखर राष्ट्रभक्त आणि क्रांतीसूर्य स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सारोळे (ता.बार्शी) येथे 'एकता महिला मंच' च्यावतीने अभिवादन करण्यात आले.

सुरुवातीला स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ने मजसी ने परत मातृभूमीला यांसारख्या त्यांच्या अजरामर गीतांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या क्रांती कार्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत, अशी भावना व्यक्त करण्यात आली. एकता महिला मंचचे प्रभावती साबळे, पूजा भोसले, गीता पाटील, सोजरबाई भोसले, साक्षी दळवी, राजकन्या जाधव, निकिता जाधव आदींसह गावातील इतर महिला उपस्थित होत्या. ग्रामीण भागातील महिलांमध्ये देशभक्तीची जाणीव जागृत ठेवण्यासाठी आणि महापुरुषांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज असल्याचे मत सारोळे येथील प्रमुख प्रभावती साबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रप्रेमाच्या घोषणांनी करण्यात आली.



## मोहोळच्या शुभम गाडेला कराटे स्पर्धेत सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ,दि.२८ फेब्रुवारी-**

धुळे येथे झालेल्या आंतरविभागीय कराटे स्पर्धेत सोलापूरच्या ऑर्चिड इंजिनिअरिंग कॉलेजचा विद्यार्थी, मोहोळचा रहिवासी शुमभ मच्छिंद्र गाडे याने ५४ किलो वजनी गटात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. धुळे येथे झालेल्या स्पर्धेत त्याने यश मिळवले आहे.



आता त्याची निवड कुरुक्षेत्र हरियाणा येथे येत्या दि.२ ते ७ मार्च रोजी होणाऱ्या रोजी आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी झाली आहे. शुभम गाडे याने आत्तापर्यंत विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन नेत्रदीपक यश मिळवले आहे. या अगोदर धुळे येथे नोव्हेंबर २०२५झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेत त्याने सुवर्णपदक पटकावले होते. तर चंदिगड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय वुशू स्पर्धेमध्ये कांस्य पदक मिळवले होते. येणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शुभमला कोणते पदक मिळते याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. त्याचे मार्गदर्शक म्हणून ऑर्चिडकॉलेजचे क्रीडा विभागाचे प्राध्यापक सचिन गायकवाड, सुस्ते येथील क्रीडा अकॅडमीचे माधव शेरेकर आणि मोहोळ येथील प्रशिक्षक शाहूराजे देशमुख व सुदाम शिंगाडे सर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याने मिळवलेल्या अशाबद्दल कौतुक होत आहे.

## महाराजस्व अभियानात प्रलंबित कामे लागणार मार्गी : तहसीलदार भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२८ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रात शिवजयंतीच्या निमित्ताने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' जाहीर करण्यात आले असून, याद्वारे महसूल विभागाच्या १५ महत्त्वाच्या सेवा एका दिवसात निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवल्याची माहिती माढा तहसिलदार संजय भोसले यांनी दिली.

**मोडनिंब मंडल कार्यालयात झाली बैठक**

मोडनिंब मंडळ कार्यालयात नुकतीच बैठक झाली. 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्यांची प्रलंबित कामे मार्गी लावली जात असल्याचे तहसिलदार भोसले यांनी सांगितले. यावेळी मोडनिंब मंडल अधिकारी बिभिषण वागज, मोडनिंब तलाठी मोहसीन हेड्डे, बावी तलाठी मनोहर मोहिते, तुळशी तलाठी उमेश बनसोडे, अरण तलाठी शैलेश लोमटे, बैरागवाडी तलाठी शितल अवताडे, रोपळे तलाठी विवेकानंद आखाडे, मोडनिंब येथील सर्व सेतू चालक, सर्व ग्राम महसूल सेवक व सर्व पोलीस पाटील उपस्थित होते.

मोडनिंब मंडल स्तरावर १७ एप्रिल रोजी राजवाडा हॉल मोडनिंब येथे शिबिर भरवले जाणार आहे. तरी मोडनिंब मंडळातील सर्व गावातील लोकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार भोसले यांनी केले. प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८-अ उताऱ्यांचे वाटप, उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा, नवीन व्यवस्थापनानुसार 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबतच्या प्रकरणांचा निपटारा, पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ग्रीस्टॅक आणि पी.एम. किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्यावत केली जाणार आहेत. अकृषिक (छ) परवानगीही या शिबिरातून दिली जाणार आहे.

## जेईई मेन्समध्ये वैभवी कोळी ९९.३० पर्सेंटाईलसह पंढरपुरात प्रथम

### प्रा.परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ फेब्रुवारी-**

यशाची परंपरा जपणाऱ्या येथील प्रा.व्हि.डि. परिचारक व प्रा. मंदार वि.परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटने (गएए चरळपी ) जेईई मेन्स २०२६ परिक्षेत पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. प्रा. परिचारक सरांच्या विद्यार्थ्यांनी पंढरपूर शहरात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत भव्य यश संपादन केले आहे. कु. वैभवी पांडुरंग कोळी हिने ९९.३० पर्सेंटाईल मिळवत पंढरपूरात प्रथम क्रमांक पटकावला, तर कु. ईशान गणेश बाळेकर याने ९७.३१ पर्सेंटाईल मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. या भरीव यशामुळे क्लासचे, पालकांचे तसेच पंढरपूर शहराचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास आणि प्रा. परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटवरील दृढ विश्वास हे प्रमुख घटक ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना असे सांगितले की, दर आठवड्याला घेण्यात आलेल्या परिक्षा, मॉक टेस्ट, सराव परिक्षा तसेच डाऊट सॉल्व्हिंग सत्रांमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि संकल्पना अधिक भक्कम झाल्या. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे नियमित विश्लेषण व वैयक्तिक मार्गदर्शनामुळे त्यांना योग्य दिशेने अभ्यास करता आला. प्रा. परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटला शिक्षण क्षेत्रातील ४३ वर्षांची विश्वासार्ह परंपरा लाभलेली असून गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध वातावरण व अनुभवी शिक्षकवर्ग ही क्लासची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकवर्गाला दिले आहे.

आगामी काळातही अशीच उज्ज्वल कामगिरी करण्याचा विश्वास प्रा. परिचारक सरांच्या ब्रिलियंट करियर इंस्टिट्यूटच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.




## सभामंडपातील चित्रे सुरक्षित; मंदिर समितीचा खुलासा

**पंढरपूर, दि. २८ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासनाच्या निधीतून विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, बाजीराव पडसाळी तसेच विठ्ठल सभामंडप जतन व दुरुस्तीची कामे पूर्णत्वास आली आहेत.

तथापि, सभामंडपातील संरचनात्मक दुरुस्ती व संवर्धनाची कामे सुरू असताना चित्रांचे कोणतेही नुकसान होऊ नये, तसेच त्यांची मूळ अवस्था सुरक्षित राहावी यासाठी संबंधित चित्रे तात्पुरत्या स्वरूपात काळजीपूर्वक काढून सुरक्षित स्थळी संरक्षित करून ठेवण्यात आली आहेत. चित्रांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन, सभामंडपातील कामे पूर्ण झाल्यानंतर सदरची ऐतिहासिक चित्रे मूळ ठिकाणी पूर्ववत पद्धतीने पुन्हा स्थापित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी शेळके यांनी दिली.